न्यायाधिशाच्या शेजारींच **आर्थर ईटन** बसला होता, व **रोज** कठड्यांत शिरतांच त्यानें तिजकडे सारखी टक लावून, जणूं तिचे अंतःकरणांत काय चाललें आहे हें हुडकून काढण्याचाच यत्न केला. एकाद्या काळ्या छायेप्रमाणें त्याच्या चर्येवर खिन्नतेनें आपलें ठाणें दिलें होतें. तिला पाहतांच तिला अपराधी कसें ह्मणावें, व आपल्या मनाची झालेली खात्री तरी खोटी कशी ह्मणावी, ह्या बुचकळ्यांत तो पडला.

तो गोंधळून जाऊन अतिशय कष्टी झाला. त्याचा निश्चय ह्मणून कांहींच होईना. मनाच्या इतक्या भयंकर वृत्ति, अशा बाहेरून दिसणाऱ्या गरिबीखालीं झाकल्या जाव्या हें फारच वाईट असें त्याला एकदां वाटलें; आणि त्यानें आपली दृष्टि तिजकडून फिरविली.

म्याजिस्ट्रेटच्या उजव्या बाजूस एका खुर्चीवर एक ब्यारिस्टर आपला जागा

घालून बसला होता. हा ठेंगणा असून अं- गानें सडपातळ व फिक्या वर्णाचा होता. त्याचे डोळे सारखे फिरत असून, वरचेवर तो तेथें बसलेल्या प्रत्येक मनुष्याच्या तोंडाकडे पाही. ह्याचें नांव शार्पले. व ब्रेसबाईकडून पांचशें गिनी मिळतांच ग्रम्लेनें ह्याला गुंतवून टाकलें होतें. त्यानें खटल्याच्या संबंधानें ह्याला कांहीं समजून दिलें नव्हतें; तरी एकंदर चवकशीकडे बारकाईनें लक्ष देऊन सरकारतर्फेचा पुरावा खोटा पाडण्याची ग्रम्लेनें त्यास सूचना केली होती.

चौकशीस प्रारंभ झाला. कैदीस न्यायाधिशानें नांव विचारलें. त्यावरो- वर ब्यारिस्टरानें उभें राहून तिचें नांव रोज फास्टर असल्याचें सांगून, आपण तिच्या वतीनें काम चालविण्यास आलों आहोंत असेंही कळविलें. आप- ली पक्षकार, ब्रेसबाई इच्या सुप्रसिद्ध दुकानीं कांहीं आठवडे नौकरीस होती; व ह्या मुलीच्या हातून असा घाणेरडा गुन्हा होणार नाहीं अशी त्या सचोटी- च्या दुकानदारणीची पूर्ण खात्री अ- सल्यामुळें तिनेंच आपणास ह्या मुली- च्या वतीनें काम चालविण्यास सां- गितलें आहे असें सांगून, कांहीं तरी वेडीवाकडी चूक होऊन, ह्या बिचारी- ला विनाकारण पकडण्यांत आलें अ- सावें, सबब तिला बंधमुक्त करावें, अशी त्यानें आपल्या धंद्यांतील लो- कांच्या तऱ्हेप्रमाणें हळूच हासून न्या- याधिशास विनंति केली.

ह्यावर ग्रम्लेसाहेब आपल्या फुट- क्या मडक्याच्या आवाजासारख्या स्व- रानें "ब्यारिस्टर साहेब ह्मणतात तसेंच आहे" असें ह्मणाले व आपण ब्रे- सबाईकडे ह्या पोरीबद्दल चवकशी केली असून, ती थोर व वजनदार बाई ही पोर फारच उत्तम स्वभावाची व कोणताही गुन्हा केव्हांही न करण्यारखी आहे असें आपणाजवळ ह्मणाल्याचें कळवून, तशी ती साक्षही देईल असेंही ह्या पोलिसच्या मुख्य अंमलदारानें ह्या वेळीं बोलण्यास कमी केलें नाहीं. ह्या- वर न्यायाधीश साहेबांनीं "ठीक आहे, आपण पुढें पाहूं. सध्यां आरोप काय आहे तो एकूं" असें ह्मटलें.

ह्यानंतर शिरस्तेदारानें आर्थर ईटनला पुकारण्याचा हुकूम करतांच तो उठून उ- भा राहिला; व पुढील हकीकत सांगण्यास त्यानें प्रारंभ केला:-

"लंडनच्या उत्तरेकडील भागांत बार्नस्बेरी बागेजवळ आमच्या कांहीं इमा- रतींचीं कामें चाललीं आहेत. तिकडे तीं कामें पाहण्यास मी काल संध्याकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास गेलों. मा- झ्याबरोबर माझा जामदार हडले हा होता. काम करणारे लोक आधींच काम आटो- पून गेले असून, तेथें दुसरें कोणीही न- व्हतें. हडलेनें कंदील लावला, व त्या दि- वशीं काय नवें काम झालें तें आह्मीं त्या कंदिलाच्या उजेडानें पाहिलें. ह्या इमारती- च्या मध्यभागीं एक अंगण असून, त्याला चार बाजू आहेत. ह्यांतील एका बाजूनें आह्मी जात असतां, भिंतीच्या कामांत कांहीं तरी चूक आहे असें मला वाटून,

ती पाहण्यासाठीं मी डडलेपासून कंदील घेऊन थोडा थांबलों. डडले पुढें चाललाच होता, व तो अंगणांत जाऊन पोहोंचतो न पोहोंचतो तोंच मोठ्यानें ओरडला आणि धाडकन् खालीं पडला. मी लागलींच धांवलों व अंगणांत जाऊन पोहोंचतो तों दुसऱ्या वाटेनें काळा पोषाख केलेली कोणी एक स्त्री पळून जातांना माझ्या दृष्टीस पडली. मीं तिचा पाठलाग केला नाहीं डडले मरून तेथें पडला होता, त्याजकडे पाहून मी अगदीं दुःखित होऊन एक क्षणभर स्तब्ध उभा राहिलों. माझ्यानें बोलवेना कीं हालवेना. मी जसा कांहीं खिळून गेलों. शेवटीं माझ्या त्या वेळच्या मनोविकारामुळें-च मला वाचा फुटली, आणि माझ्या हातांपायांनाही चलनवलन आलें. खून झाला अशी ओरड करून मी त्या रक्तबंबाळ झालेल्या प्रेताजवळ बसलों. पुढें कसा वेळ गेला हें माझ्यानें सांगवत नाहीं—तरी फारसा वेळ गेला नसावा—इतक्यांत कांहीं मजुरांनीं काळा पोषाख केलेली एक स्त्री पकडून आणली. तिचा काळा पोषाख पाहून व तिच्या किंकाळ्या ऐकून तिनेंच खून केला असावा असें मला वाटलें, व त्या वेळीं मीं तसें ह्मटलें असेंही मला वाटतें."

उलट प्रश्न झाल्यावरून "आपण पळून जाणाऱ्या स्त्रीचा चेहरा पाहिला नाहीं" असें आर्थरनें कबूल केलें. व "आपण पहिल्यानें अंगणांतून पळून जातांना पाहिलेली बाई आणि हल्लीं कठड्यांत उभी असलेली मुलगी ह्या एकच आहेत अशी शपथ वाहणार नाहीं; आणि ह्या पोरीच्याच हातून खून झाला असें आपल्याच्यानें ह्मणवणार नाहीं" असेंही तो ह्मणाला.

पुनः ब्यारिस्टरनें विचारल्यावरून "आपल्या जामदाराची व आरोपीची बिलकूल ओळख नसून, त्याचा खून करण्यास तिला कांहींही कारण नाहीं" अशी आपली समजूत असल्याचेंही त्यानें कळविलें. "डडलेचा खून केला त्या वेळीं आपणही खून करणाराच्या नजरेस पडलोंच असूं; तेव्हां त्याजजवळ कांहीं पैसे असतील ते बुचाडण्याकरितां हा खून झाला असावा" अशीही त्यानें आपली खात्री असल्याचें कळविलें. त्या दिवशींची हकीकत सांगण्यापूर्वी "आपण तिला कधींही पाहिलें नाहीं, व डडलेनेंही तिचें नांव पूर्वी आपणाजवळ केव्हांही घेतलें नाहीं; आणि त्या दोघांना तर आपण एक ठिकाणीं केव्हांही पाहिलें नाहीं" असेंही ह्या वेळीं ईडनच्या तोंडून ब्यारिस्टरनें वदविलें.

पुढें ज्या मजुरांनीं रोजला पकडलें त्यांच्या साक्षी झाल्या; व त्यांनीं तिला पकडल्याच्या वेळची हकीकत सांगितली. त्या वेळीं आर्थर ईडननें पाहिलेली बाई उत्तरेच्या अंगच्या वाटेनें पळून गेली असतां, रोजला दक्षिणेच्या अंगच्या वाटेंत पकडलें, असें ब्यारिस्टरनें विचारलेल्या प्रश्नांवरून बाहेर पडलें.

ह्यानंतर ज्या डाक्टरानें डडलेची जखम तपासली होती, त्याची साक्ष झाली. त्यानें सर्व जखमेचें वर्णन करून, "टोला मारणाराच्या मनगटांत चां-

गळाच जोर असावा, किंवा टोला मारण्याच्या वेळीं त्याला संताप तरी फार आलेला असावा" असा आपला अभिप्राय दिला.

डाक्टराचा तो अभिप्राय ऐकतांच तेथें असलेल्या सर्व लोकांनीं रोजकडे पुनः पाहिलें; व तिच्या गोंडस पण कोमल हातांत तसला प्राणघातक टोला मारण्याची शक्ति नाहीं, व तिच्या चर्येवरून तिच्यांत तसल्या दुष्ट वासनाही नाहींत अशी सर्वांची खात्री झाली.

ब्यारिस्टरानें ह्या वेळीं डाक्टराकडून, ज्या दुपाती सुरीनें हा खून झाला ती मागून घेतली, व तिचें एक पातें मोडलेलें असून, दुसऱ्यानें ही जखम केलेली होती असें दाखविलें.

पुढें काय प्रश्न विचारावा ह्याचा विचार करण्यासाठीं वेळ मिळावा ह्मणून ब्यारिस्टर त्या सुरीकडे पाहण्याचें उगीच सोंग करीत असतां, तिच्या मुठीवर त्याला कांहीं दिसलें. तेव्हां त्यानें पाणी व रुमाल मागवून, तिजवरील रक्त आपल्याच हातानें धुऊन काढलें; व पुनः मुठीकडे निरखून पाहून, जें त्याला दिसलें तें त्यानें ग्रम्लेला दाखविलें, व त्यानें तें आपला दुय्यम माब्ज ह्याला दाखवून, तिघांचें त्या संबंधानें कांहीं खलबत झालें. पण तें काय झालें तें मात्र बाहेर कोणासही कळलें नाहीं. तिघांनींही आपली खात्री झाल्यासारखें दाखविलें, व ब्यारिस्टरानें आपला झगा अंगावर घेऊन बोलण्यास सुरवात केली:–

" हल्लीं कांहीं विलक्षण प्रकार दृष्टोत्पत्तीस आला असून, त्याजबद्दल येथें आतांच सांगणें सोयीचें होणार नाहीं. सबब, नामदार साहेबांची हरकत नसेल तर खटला दोन तास तहकूब ठेवून पुनः चार वाजतां घ्यावा, व तोंपर्यंत हा चाकू असाच कागदांत गुंडाळलेला आपल्या खणांत कुलपांत असावा."

ही गोष्ट न्यायाधिशानें कबूल केली व ब्यारिस्टरानें ग्रम्ले व माब्ज ह्यांजकडे हळूच पाहिलें; व ते दोघेही लागलींच तेथून नाहींसे झाले. नंतर ब्यारिस्टरानें एका कागदावर कांहीं लिहून त्याची घडी घालून तो न्यायाधिशाजवळ दिला. त्यानें त्याजवरील मजकूर वाचला, व तो वाचतांच त्याला अतिशय आश्चर्य वाटून पुढें काय करावें ह्याजविषयीं त्याचा निश्चयच होईना.

रोज फास्टरचे व सर्व लोकांचे डोळे न्यायाधिशाकडे वळले व आरोपीचें हित आहे अशी कांहीं तरी गोष्ट घडली असून, ती कळण्याविषयीं सर्वांस मोठी उत्कंठा लागली.

न्यायाधिशाचा थोडासा गोंधळ झाला आहे असें पाहून ब्यारिस्टर पुनः उभा राहून, योग्य आदबीनें ह्मणाला: " माझी विनंति नामदारांस कबूल होत नाहीं त्या अर्थीं आपली परवानगी आहे असें समजून मी लिहून कळविलेली विनंति वहिवाटीप्रमाणें मोठ्यानें बोलून करतों."

न्यायाधिशानें कागदाकडे पाहून तो आर्थर ईडनच्या हवालीं केला. त्यानें तो पाहतांच त्याला अतोनात आश्चर्य वाटून, त्याचें तोंड कित्येक वेळां फिक्कें पडलें. कांहीं वेळ तर त्याची बोबडीच वळली. शेवटीं तो मोठा तिरस्कार दाखवू-

न ह्मणाला: " माझी ह्या गोष्टीला नाकबुली आहे."

पुढें म्याजिस्ट्रेटनें त्याला न बोलण्याविषयीं हुकूम करून खटला तहकूब ठेवला, व मंडळीस जावयास सांगितलें.

ह्या हुकमाची बजावणी चालली असतां नेहमींच्या संप्रदायाप्रमाणें खूपच गर्दी उडाली; व ह्या गर्दीमुळें **आर्थर ईटन** न्यायाधिशास व ब्यारिस्टरांस जें कांहीं बोलत होता तें कोणासही ऐकूं आलें नाहीं.

**रोज फास्टर**ला आंतल्या एका खोलींत नेलें. तेथें **ब्रेस**बाई आगटीजवळ हळू हळू रडत बसली होती. तिला पाहतांच आपल्या सर्व दुःखाचें मूळ ही, अशी **रोज**ला आठवण होऊन ती मागें सरली. पण **ग्रस्ले**नें पूर्वीं सांगितलेल्या कांहीं गोष्टींची तिला आठवण होऊन ती तिजजवळ गेली.

**ब्रेस**बाईनें तिला घट्ट उराशीं धरून मोठ्या कळवळ्यानें ह्मटलें: " **रोज**बाई, माझ्या हातून जें जें घडलें त्याची मला क्षमा कर."

**रोज**च्याही डोळ्यांतून ह्या वेळीं पाणी वाहूं लागून ती ह्मणाली: " बाईसाहेब, मी कांहीं खुनशी स्वभावाची नाहीं. पण तुमच्यामुळें मजवर जे जे प्रसंग गुदरले आहेत त्यांजबद्दल जर तुह्मास खरोखरच वाईट वाटत असेल तर, आपणां ख्रिस्ती धर्मांतील लोकांस योग्यच असें समजून, मी तुमचे सर्व अपराध विसरून जाऊन तुह्माला क्षमा करतें. आणि मजवर एवढी दया करून माझा खटला चालविण्यास ब्यारिस्टर केला व **ग्रस्ले**बरोबर मला निरोप पाठवून धीर दिलात ह्याबद्दल मी तुमचे आभार मानतें. तुह्मीं आणि राजपुत्रानें त्याला पुष्कळ मोठी रक्कम देऊन, माझ्या निर्दोषतेबद्दल सर्वांची खात्री करून देण्यास तुह्मीं त्याला सांगितलें, व तुमची माझ्या चांगुलपणाबद्दल पूर्ण खात्री आहे, ह्या गोष्टी कांहीं कमी समाधान देणाऱ्या नाहींत. मी काल रात्रीं अशी कां भटकत होतें ह्याबद्दल मला प्रश्न विचारतील, तेव्हां तुमच्या आणि राजपुत्राच्या नांवाचा संबंध मी आणूं नये अशी त्यानें मजजवळ विनंति केली असून, माझ्यावरील आरोप अगदीं खोटा व निराधार आहे असें स्पष्ट ठरेल तेव्हां मला शंभर गिनी देण्यास तुह्मीं त्याला सांगितलें असून, मी ह्मणेन तेथें मला सुरक्षितपणें पोहोंचविण्याची तुह्मीं त्याला कामगिरी सांगितली आहे असेंही मी त्याजजवळून ऐकलें; आणि ह्या सर्व गोष्टींबद्दल मी तुमची फार फार ऋणी आहें."

**ब्रेस**—आनंदतें, मला आणि राजपुत्राला किती पश्चात्ताप झाला आहे हें तुला ह्यावरून कळेल. तूं मला क्षमा केलीच आहेस, तरी पण पुनः मला आपली मैत्रीण समज असें आतां माझ्यानें ह्मणवणार नाहीं. तरी पण मी खऱ्या मित्राप्रमाणें तुजशीं वागेन; आणि देव करो व तुजवरच्या ह्या आरोपाविषयींचा खोटेपणा स्पष्ट सिद्ध होवो.

**रोज**—कां बरें? कांहीं शंका आहे कीं काय तसें होण्याची? खटला एकाएकीं तहकूब कां ठेवला? त्या सुरीबद्दल एवढी वाटाघाट कशाची झाली?

आणि आर्थर ईटन तरी इतका कावरा-बावरा कां झाला ?

ब्रेस–मुली, मी चवकशीच्या वेळीं बाहेर नव्हतें हें तूं विसरलीस वाटतें. मी प्रारंभापासून येथें आंत बसलें होतें. आणि काय काय बाहेर झालें हें मला बिलकूल ठाऊक नाहीं. तरी पण कांहीं तरी विलक्षण गोष्ट उघडकीस आली असून, तिजमुळें तुझें पुष्कळ हित होणार आहे; व पुनः खटल्यास सुरुवात होईल तेव्हां कांहीं तरी चमत्कारिक प्रकार बाहेर पडतील ह्याबद्दल मला शंका नाहीं. तूं कांहीं भिऊं नकोस, आणि अशी दुःखीकष्टीही होऊं नकोस.

---

## भाग १२१.

### एक उदार अंतःकरणाची स्त्री.

बोस्ट्रीटमधल्या म्याजिस्ट्रेट कचेरींत मागील भागांत सांगितलेल्या गोष्टी घडत असतां कार्ल्टून राजवाड्यांत एक चमत्कारिक गोष्ट घडली. तिची हकीकत वाचकांना कळविण्यासाठीं थोडें थांबलें पाहिजे. नुकतेच दोन प्रहरचे बारा वाजून गेले असून, राजपुत्र सकाळचा पोषाख करून तयार झाला होता. इतक्यांत चोरजिन्याच्या दरवाजावर कोणीं थाप मारली ती ऐकतांच त्यानें जर्मनला लावून देऊन आपण जिन्याचें दार उघडलें; व आंत वाचकांच्या नेहमींच्या ओळखीची लेडी शिरली.

“अहाहा! तूं का गोड मैत्रिणी !” अशा शब्दांनीं राजपुत्रानें तिचें स्वागत —जो तिला पुढें बोलणार इतक्यांत तिची त्या वेळची फार रागावलेली व अतिशय उग्र झालेली मुद्रा पाहून, मलतासिकलती थट्टा तिला ह्या वेळीं खपणार नाहीं असें त्यानें ओळखलें; व आपलें बोलणें मध्येंच थांबविलें. लागलेंच त्यानें दार बंद केलें, आणि मोठ्या ताव्यानें उभें राहून विचारलें: “इतक्या थोड्या नासांच्या अवधींत लेडबाईचें मला दुसऱ्यानें दर्शन कां मिळत आहे व त्यांची चर्याही इतकी त्रासलेली कां दिसते? असें विचारण्यास कांहीं हरकत नाहीं ना?”

लेडिशिया–त्याजकडे टक लावून ह्मणाली: “आपल्या मनास वाईट वाटण्यासारखे कांहीं दोष आपल्या अंगीं आहेत काय ?”

राजपुत्र–पडल्या आहेत माझ्या हातून लहान सहान गोष्टी. आणि त्यांतल्या कांहींत तुमचाही संबंध आहे. त्या स्नानागारांतील प्रसंगाची व काल रात्रीं घडलेल्या प्रसंगाची आपणास आठवण आहेना ?

लेडीशियेला ह्या बोलण्याचा तिरस्कार वाटून तिची मुद्रा लाल झाली व ती ह्मणाली: “हं, बोला तुह्मा लागेल तितकें तुह्मी मला टोंचून. पण काल रात्रीं मी येथें येऊन गेल्यापासून तुह्माला कांहीं शंका वाटूं लागल्या आहेत काय ?

राजपुत्र–तुह्मी येथें प्रेम दर्शविण्याकरितां व सुख देण्याकरितां आलां असल्यामुळें तुमच्या येण्याच्या संबंधानें मला कांहीं शंका वाटल्या नाहींत.

पण तुमच्या ज.ण्याच्या तऱ्हेवरून मात्र मला शंका वाटूं लागल्या आहेत.

त्याला खोंचेल अशा तऱ्हेनें हासून **लेटिशिया** ह्मणाली: " आणि जी दारू आपण प्यालांत तिजबद्दल कांहीं शंका वाटते का ! "

त्रासून जाऊन राजपुत्र ह्मणाला: " देवा शपथ ! मला आठवतें आतां. पण जाऊं दे. **लेटिशिया**,तूं आज अशी वेगळ्या तऱ्हेनें कां वागतेस ? आजची तुझी तऱ्हा कांहीं निराळीच आहे. माझ्याकडून असा तुझा अपराध तरी काय झाला आहे ! "

**लेटिशिया**—काय अपराध झाला आहे तो तुह्माला माहीत आहेच. पण अशा रीतीनें बोलणें वाढविण्यांत अर्थ नाहीं. मी काल रात्रीं येथें आलें तो कांहीं उद्देशानें आलें होतें ही गोष्ट खरी असून, माझे ते उद्देश सिद्धीसही गेले. एकादा उद्देश मीं मनांत धरून कांहीं काम करण्याचा निश्चय केला कीं, प्रेमाच्या संबंधांत जरी मी तऱ्हांच वश होतें तरी, माझीं कामें शेवटास नेल्याशिवाय मी रहात नाहीं. थोडक्यांतच मी आपणास सांगतें. **मॉगल्स**ला मी आपणाकडून ह्या देशीं परत तरी आणवीन, नाहीं तर त्याला असा परदेशीं घालवल्याबद्दल सूड तरी घेईन.

एकाद्या पिशाचाप्रमाणें तिजकडे पाहून राजपुत्र ह्मणाला: " हां, ही शंका मला आलीच होती. पण माझ्याशीं वैर बांधण्यापूर्वी नीट विचार कर. एकाद्या किड्याप्रमाणें मी तुला चिरडून टाकीन! "

" हं, करा आपल्या हातून काय होईल तें. मी आपल्या धमक्यांना मुळींच भीत नाहीं. " **लेटिशिया** ह्मणाली.

रागानें तिचें तोंड अगदीं लाल झालें, आणि अंगांतील तंग झगा फाटून तिचे उरोज बाहेर पडतात कीं काय अशी शंका उत्पन्न होण्याइतके ते फुगले. ती ह्मणाली: " असे रागावून मजकडे पाहूं नका. तुमच्या डोळ्यांतून विजा निघत आहेत असें जरी दिसत आहे तरी त्यांनीं कांहीं माणसें मरणार नाहींत तुह्मी ह्मणाल त्या शस्त्रांनीं तुमच्याशीं युद्ध करण्यास मी तयार आहें. पाहिजे असेल तर तरवारीनें मजशीं लढा, पाहिजे असेल तर पिस्तुलांनीं लढा. पण ठाऊक आहे मला तुमचें शौर्य. मी कितीही बोललें तरी तुह्माला मुळींच वीरश्री चढावयाची नाहीं. पण विश्वासघात आणि दगाबाजी ह्यांत तुमचें विशेष प्राविण्य असून, त्यांची तुह्माला फारच आवड आहे, तुह्मी सापासारखे आहांत—ते कसे आपणांतून भरकन् पळून जातात आणि मग हळूच चोरून एकाद्याला चावतात. पण तुमच्या आवडत्या खटपटींनीं तुमच्याशीं सामना करावयाचा असेल तर त्यालाही माझी हरकत नाहीं. "

राजपुत्रही ह्या वेळीं रागानें लाल होऊन ह्मणाला: " असलीं दुरुत्तर मी सोसून घेणार नाहीं. ह्यासाठीं

येथून चालती हो. नाहीं तर मी आपल्या हुजऱ्यास बोलावून तुला गचांड्या मारून हाकून देऊन."

शांत पण निश्चयाच्या स्वरानें **लेटिशिया** ह्मणाली:" बोलवा तर खरे आंत कोणाला, कीं त्याला चाबकाखालीं घोड्यासारखा बडवीन; आणि पुनः तुह्मी असा अपमानाचा एकही शब्द बोलल्यांत तर तुमचीही यथास्थित कणीक तिंबीन! कारण, तुह्मी माझ्या तावडींत पुरे पुरे सांपडला आहांत."

ही राजकुलीन विषयांध स्वारी रागानें लट लट कांपूं लागली. पण आपल्या रागाची साक्ष पटविण्याचें त्याला बिलकूल धैर्य होईना. तिचा कांहीं तरी पक्का निश्चय ठरला असून, तो शेवटास नेण्यासाठीं अवश्य लागणारी शक्ति तिजमध्यें आहे, व आपणाशीं ती एवढ्या जोरानें गोष्टी सांगते त्या अर्थी तिजजवळ तशींच कांहीं साधनेंही असतील असें त्याला वाटून तो गप्प राहिला.

**लेटिशिया**—युवराजजी, ऐका मी काय सांगतें तें, आणि मग ओळखा मी उगीच बढाई मारतें, कीं माझ्यांत खरीच करामत आहे तें. मला तुमचा अतोनात तिटकारा आला आहे. तरी रात्रीं मी येथें आलें; आणि माझा हेतु मला शेवटास न्यावयाचा होता ह्मणून खुशाल तुह्माकडून आंवळून घेतलें; व तुह्मास चांगलें झोपीं पाडावयाचें होतें ह्यासाठीं प्रथम तुमच्या ओठारीं निजन तुह्मास दारू प्यावयास लावली. तींत मीं पाहिल्यानेंच गुंगीचें औषध घालून ठेवलें होतें. हा माझ्याकडून फार वाईट प्रकारचा विश्वासघात झाला हें खरें; परंतु तुमच्या शेंकडों रीतींनीं उपयोगी पडलेल्या स्नेह्याशीं तुह्मीं जो विश्वासघात केला त्याच्या पासंगालासुद्धां हा माझा विश्वासघात लागणार नाहीं. असो. काय उद्देशानें मी येथें आलें हें तुह्माला आतां कळविलें पाहिजे. ह्मणजे तुह्मी माझ्या तावडींत कसे सांपडला आहांत हें तुह्माला कळेल. युवराजजी, तुमचीं अत्यंत गुप्त व अत्यंत महत्वाचीं अशीं पत्रें रात्रीं मीं आपल्या हातीं आणून ठेविलीं आहेत.

एकाद्या हातोड्याचा डोक्यावर दणका द्यावा तसें राजपुत्राला झालें. आपले सारे हेतु शेवटास नेईपर्यंत अशा हुशारीनें हस्तगत करून घेतलेल्या साधनांचा उपयोग करून घेतल्याशिवाय लेडवाई राहणार नाहीं अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली.

**लेडी**--मीगलसला तुह्मी परदेशीं धाडलें आहेत हें मीं कसें ओळखलें हें तुह्माला कळविलें पाहिजे. तो रहात होता त्या घराच्या मालकिणीला परवां, फारच थोडक्यांत लिहिलेलें असें एक पत्र आलें. परंतु सरकाराविरुद्ध कांहीं खटपटी करीत असल्याचा **मीगलसवर** आरोप केलेला असून, सरकारानें मेहेर नजर करून त्याला उत्तर अमेरिकेंत धाडलें व तेथून पुनः परत न येण्याचें त्यानें

कबूल केलें आहे, अशी त्या पत्रांत त्यानें बातमी कळविली होती. हें पत्र तिनें मला दाखविलें; व कांहीं तरी दगा आहे असें या पत्रावरून मला उघड दिसून आलें. तरी पण तुमच्याचकडून ही दगाबाजी झाली असेल असें मला पहिल्यानें वाटलें नाहीं. मीगल्स तुमचा इमानी नोकर असून, तो तुमच्या फारच उपयोगीं पडतो, तेव्हां त्याला येथून नाहींसा करावा असें तुमच्या सारख्या बादशाही तब्येतीच्या एखाद्या मनुष्याला वाटून, त्यानें कांहीं तरी खटपट केली असावी असें मला वाटलें. पण ज्या दिवशीं मीगल्स येथून गेला त्याच दिवशीं तुमचा जामदार जर्मेन त्याच्या येथें आला असून, कांहीं गुळगुळीत बतावणी करून निघून गेला असें जेव्हां मीं ऐकलें तेव्हां माझ्या मनांत वेगळ्या शंका आल्या. पुढें मीं मीगल्सच्या मेजाचे खण शोधून पाहिले, आणि माझ्या पूर्वी ते कोणीं तरी उघडले असावेत अशी माझी खात्री झाली; व खरा प्रकार ओळखण्यास कांहींच पंचाईत पडली नाहीं. तो लक्षांत येतांच स्वतःच्या कामापेक्षांही आपल्या मित्राचें काम जास्त झटून करण्याचा मीं निश्चय केला. काल सकाळींच मी लढाईला सुरुवात केली, आणि पहिला डाव माझ्या व जूचा आहे. बाजू थोडी कठीण दिसली. पण माझें मोठें काम झालें. तुमचे महत्वाचे कागद माझ्या हातीं आहेत. आणि आतां माझा ... असून, माझ्या पायाखालीं आहे. पराजित झालेल्या माझ्या शत्रूस मी तहाच्या शर्ती सांगण्यास आलें आहें.

अगदीं घोगऱ्या शब्दांनीं राजपुत्र ह्मणाला: "मीगल्सशीं मी जो वागलों ते अगदीं योग्य वागलों. पहिल्यानें ते कागद त्यानें मजजवळून चोरून नेले; आणि ह्याच कागदांच्या जोरावर तूं आणि त्यानें माझ्या बापास वाकविलें आहे."

लेडिशिया शांतपणानें व निश्चयानें ह्मणाली: "त्या गोष्टींबद्दल व्यर्थ वाद घालण्याची माझी इच्छा नाहीं. ते सारे कागद आज माझ्या हातीं आहेत एवढें तुह्माला सांगितलें ह्मणजे माझें काम झालें. एका गरीब पोरीचें अंतःकरण प्रथम ओढून घेऊन तिचा शेवटीं सर्वस्वी गळा कापून आपणाकडे निवळ अधमपणा व मांगपणा तुमच्या वडिलांनीं पतकरल्याची साक्ष ज्या दाखल्यावरून पटत आहे तो लाईटफूटशीं त्यांचें लग्न झाल्याचा दाखला, तसेंच फिट्झहर्बर्टबाईशीं तुमचें लग्न झाल्याचा दाखला,—कीं, जो प्रसिद्ध केला असतां गादीवरचा तुमचा वारसाच उडेल—हे सारे माझ्या हातीं आहेत. तसेंच, फिट्झहर्बर्टबाईचें आणि बेलोच्या मार्क्विसचें प्रेम जडल्याची व तिला मूलही झाल्याची शाबिती करणारीं पत्रें हींही माझ्या हातीं आहेत.

राजपुत्र संतापानें मुठी आवळून व दांत करकरा चावत ...

सांचो निंदा करतेस काय चांडाळणी !

असें ह्मणून त्यानें तिजवर हात उगारला. पण मोठ्यानें खदखद हांसून ती ह्मणाली: " हं, संतापा, रागावा, मी तुमच्या रागाला मुळींच भीक घालीत नाहीं. आत्तांसुद्धां तीं पत्रें माझ्या बरोबर आहेत. माझी लूट माझ्या बरोबर असते. "

**राजपुत्र**—तर मग तीं मी तुझ्याजवळून हिसकून घेईन. तीं घेऊन तुला परत न जाऊं देतां मी तुझा खून सुद्धां करीन—तुझ्या शरीराचे तुकडे तुकडे करीन !

असें ह्मणून एखाद्या वाघाप्रमाणें किंकाळी फोडून तो तिच्या अंगावर धावला. पण रानांतल्या हरिणीसारखी चपळाई करून ती बाजूला सरली; आणि तिनें आपल्या पोषाखाखालीं लपवून आणलेला खंजीर राजपुत्राच्या दृष्टीस पाडला.

" हं, पुढें येऊन माझ्या अंगाला हात तर लावा, कीं हा तुमच्या उरांत शिरतो कीं नाहीं तें तुह्माला कळून येईल. " **लेटिशिया** ह्मणाली. तिची चर्या ह्या वेळीं अति भयंकर दिसूं लागली.

काय करावें हें राजपुत्राला सुचेना, व थोडीं पळें तो स्तब्ध उभा राहिला. तिच्या हातांत तो खंजीर नसता तर त्यानें तिचा तेथें खूनही केला असता. परंतु तो साऱ्या मुलखाचा भित्रा असल्या कारणानें खंजीर पाहतांच तो भिऊन गेला. आणि ह्मणाला: " **लेटिशिया**, आपण एकमेकांशीं अशा रीतीनें भांडावें हें ठीक नाहीं. ठरवूं ये तर आपण आपलें भांडण कसें मिटवावयाचें तें. "

**लेटिशिया**—होय, पण मी सांगतें आपलें भांडण कसें मिटेल तें. आणि मी सावध नसतांही माझ्या अंगावर तुह्मी चालून आलां तरी त्याची मला परवा नाहीं, हें तुह्माला दाखविण्यासाठीं हा आपला खंजीर मी पुन: म्यानांत घालून आपल्या खिशांत घालतें पहा.

" मी गळेकापू आहें असें तुला वाटतें होय ! " राजपुत्र त्वेषानें तिजकडे पाहून ह्मणाला.

**लेटिशिया**—आपण मला विचारतांच त्या अर्थीं मी मोकळ्या मनानें आपणास सांगतें कीं, आपल्या हातून होणार नाहीं असा गुन्हाच नाहीं अशी माझी समजूत आहे!

हे शब्द ऐकतांच राजपुत्राच्या अंगाची लाही झाली. त्याला धैर्य असतें तर त्यानें तिचा खून केला असता, किंवा तिला **मॉंगल्स**च्या भेटीला **अमेरिकें**त पाठविलें असतें. परंतु तसें करण्याची त्याची छाती होईना. तिजजवळ त्याचीं पत्रें होतीं, आणि हीं तिनें प्रसिद्ध केलीं असतीं तर त्याची छी थू होऊन गादीलाही तो मुकला असता. सबब, आपला राग त्याला आवरून धरावा लागला, आपला तिरस्कार जागच्या जागींच शमवावा लागला आणि तोंडाशीं आलेले शब्द माघारीं

द्यावे लागले. आणि सर्व **युरोपांतील** पहिल्या प्रतीच्या राजपुत्राची ही अशी मानहानि होणें त्याला कांहीं थोडी शिक्षा होती असें नाहीं.

बराच वेळ गेल्यावर राजपुत्र ह्मणाला: "जाऊं दे, आपण मुद्द्याच्याच गोष्टीबद्दल काय तो विचार करूं. सांग कोणत्या शर्तींवर तूं समेट करणार?"

**लेटिशिया**—शर्ती कांहीं फार नाहींत. **मीगल्स**ला परत आपल्या देशीं आणावें आणि पुनः त्याला आपल्या मित्रमंडळींत मिसळूं द्यावें. शिवाय, तुमच्या लग्नाच्या दिवशीं त्याला सरदारी देववून, वर्षाची पांच हजार पौंडांची नेमणूक करून द्यावी. ह्या गोष्टी घडून येतील तेव्हां तुमचे कागद तुमच्या हातीं पडतील. तुम्हीं कितीही आश्वासनें दिलींत, आणि प्रधानमंडळीकडून ह्या व्यवस्था करवितों ह्मणून ह्मटलेंत, तरी मी त्याजवर विश्वास ठेवणार नाहीं. कारण वाईट राजे आणि दुष्ट राजपुत्र असले म्हणजे प्रधानमंडळीही त्यांच्याच वळणावर जाणार, ह्यासाठीं माझ्या ह्मणण्याप्रमाणें प्रत्यक्ष व्यवस्था होईपर्यंत कागद आपल्या हातीं पडणार नाहींत.

**राजपुत्र**—पण सरदारी आणि नेमणूक देवविण्याची व्यवस्था कशी होईल?

**लेटिशिया**—आपल्या हातून ती होत नसेल तर मी करून घेईन. तुमच्यासाठीं एकाला सरदारी आणि नेमणूक मिळवून देवविण्याचें काम त्या कागदांच्या जोरावर ह्यापूर्वीच मीं केलें आहे.

**राजपुत्र**—नको नको, ते श्रम मी तुला देत नाहीं. आपल्या राजाचा अपमान मी तुजकडून होऊं देणार नाहीं.

**लेटिशिया**—ठीक आहे तर. करा ह्या व्यवस्था आणि मिळवा आपले कागद परत. पण वाटेंत किंवा कोठें तरी माझा खून करवून हे कागद परत मिळविण्याच्या तुमच्या मनांत कल्पना आल्या असल्या तर त्या मात्र आतां व्यर्थ आहेत हें तुह्माला मी बजावून ठेवतें. सारे कागद मी सुरक्षित ठिकाणीं लपवून ठेवले आहेत; आणि माझा खून झाला तरी ते तुमच्या हातीं लागणार नाहींत. मात्र ते भलत्याच लोकांच्या हातीं लागून त्यांजकडून ते बाहेर फुटल्याशिवाय राहणार नाहींत. ह्यासाठीं नीट विचार करून काय करणें तें करा.

असें ह्मणून **लेटिशिया** उठली व चोरजिन्यानें चालती झाली. आपल्या मनांतील सर्व बेत तिनें इतक्या सपाट्यानें ओळखले ह्याचें राजपुत्रास अतोनात आश्चर्य वाटून, भीतीनें तो अगदीं व्याकुळ झाला.

जातां जातां **लेटिशिया** मध्येंच थांबून ह्मणाली: "पण मीं कळविल्याप्रमाणें व्यवस्था होण्याची मुदत ठरली पाहिजे. हीं कामें लांबणीवर पडून उपयोग नाहीं. **मीगल्स**ला बहुतकरून

लढाऊ जहाजावरून अमेरिकेस पाठविलें असेल. इंग्लंडच्या लोकांकडून पैसे उपटून तयार राखलेल्या आरमाराचा असा अनाथांना दडपून टाकण्याच्या कामीं उपयोग होतोना? धिक्कार असो अशा प्रजेचें पितृतुल्य पालन करणाऱ्या राजपुरुषांना! पण जाऊं द्या ह्या गोष्टी. मीगलसला तावडतोब आणण्यासाठीं दुसरें जहाज पाठवा. आणि आजपासून सहा आठवड्यांच्या आंत मीगलसला परत आणवून मला भेटवा. ह्याप्रमाणें न होईल तर कागद प्रसिद्ध झाल्याशिवाय राहणार नाहींत."

ह्याप्रमाणें बोलून लेटिशिया चालती झाली. राजपुत्राला ह्या वेळीं स्वतःचा आणि सर्व जगाचा अतोनात कंटाळा वाटूं लागला, तो अगदीं खिन्न झाला, व निराशेनें त्याचें मन अतिशयच उदासीन झालें.

---

## भाग १२५.

### मजुराची बायको आणि मुलें.

गेल्या दोन भागांत वर्णिलेल्या गोष्टी घडल्या त्याच वेळीं आणखीही एक गोष्ट घडली; व रोज फास्टरच्या चवकशीची पुढील हकीकत कळविण्यापूर्वीं ही गोष्ट सांगितल्याशिवाय सोय नाहीं.

दोन प्रहरचे बारा वाजून गेल्यावर रोज फास्टरला न्यायाधिशापुढें उभें केलें; आणि इकडे कार्ल्टन वाड्यांत लेटिशियानें आपल्या मनाच्या धोरणाची साक्ष पटविण्यास सुरवात केली, त्याच वेळीं मेलमाथ मजुराची बायको आणि मुलें माळ्यावरच्या खोलींत रहात होतीं. तेथें एक अत्यंत हृदयद्रावक गोष्ट घडून आली. खुद्द मेलमाथ तेथें नव्हता. मीगलसनें जसें पत्र लिहिलें होतें तशाच प्रकारचें पत्र ह्यानेंही लिहिलें असून, तें त्याच्या बायकोच्या हातीं ह्या वेळीं होतें, आणि तें तिला मरणाच्या वेदनांप्रमाणें दुःख देत होतें. तिला आपण वैधव्याच्या फेऱ्यांत सांपडलों असें वाटून, आपल्या प्राणाहून प्रिय असलेला पति आणि आपल्या पोरांवर प्रेम करणारा त्यांचा बाप निराशेनें अगदीं वेडावून गेला असेल असें तिनें ओळखलें. आपल्या तान्ह्या लेकरास उराशीं घट्ट धरून आणि आपल्या इतर तीन मुलांकडे आंसवांनीं भरून आलेल्या डोळ्यांनीं पाहून ती दुःख करीत असत तिचें काळीज अगदीं फाटून जातें कीं काय असें दिसलें.

बिचारी ही त्या मजुराची बायको दुखण्यांत पडलेली होती, आणि अशा वेळीं तिजवर चांगल्या सशक्त व धडधाकट बायकोलाही दुःसह असा प्रसंग यावा, ह्मणजे तिला यमधर्मानें बोलावणेंच यावें असें होतें.

मेलमाथनें एके रात्रीं मीगलसला लुटलें होतें. परंतु ह्याच्या अडचणींतून ह्याची सुटका व्हावी ह्मणून तें सारें द्रव्य आपणाजवळच ठेवण्यास त्यानें ह्याला पूर्ण परवानगी दिली होती, ह्या गोष्टी आमच्या वाचकांना आठवत असतीलच. हें सोनें मिळाल्यावर ह्या मजुरानें कांहीं

जरूरीच्या जिनसा विकत घेतल्या होत्या. पण आपणास काम लागेपर्यंत आपल्या जवळची पुंजी संपूं नये अशा हेतूनें त्यानें बिऱ्हाड मात्र पालटलें नव्हतें. त्याची सरकारी कचेरींत चवकशी करण्याचें सोंग होऊन त्याला **वुलविच** येथें रवानीं केलें व तेथून त्यास होडीवर चढविलें असतां त्यानें जिवावर उदार होऊन, अगदीं काळोख असतांही **टेम्स** नदींत उडी टाकली त्या वेळीं त्याजजवळची सारी शिलक त्याच्या बरोबरच होती. त्यानें सरकारच्या जुलमी कामगारांच्या सांगण्याप्रमाणें आपल्या बायकोला पत्र लिहिलें आणि तें आपल्या बायकोकडे पोहोंचविण्यासाठीं पोलीसशिपायाच्या हवालीं केलें. त्या वेळीं तिला देण्यासाठीं ती रकमही त्यानें त्याजजवळ दिली. पण त्या चोरानें पत्र तेवढें जिकडच्या तिकडे पोहोंचतें करून रकम मात्र आपणच ठेवून घेतली. तिच्यांतली एक पैही त्या बिचारीच्या हातीं पडूं दिली नाहीं!

ह्याप्रमाणें झाल्यामुळें मध्यंतरीं जें सामान विकत घेतलें होतें तें व ह्या बाईनें सावकाराकडून सोडवून आणलेले कपडे हें सारें पुनः गुजरीवाल्याचे दुकानीं जाऊन त्याजकडून जें थोडें बहुत मिळालें त्याजवर तिनें आपली तूर्तातूर्तची गरज भागविली. दुष्ट दारिद्र्याच्या सर्व स्वाहा करणाऱ्या घशांत एकेक जिन्नस हळूहळू पडत असून, घरधनीन आपणाकडे डोळे वासून पहात आहे असें ह्या हतभागिनीच्या दृष्टीस पडतांच ती मरावयासही राजी झाली असती. परंतु आपल्या अनाथ पोरांना संभाळण्यासाठीं कोणी तरी पाहिजे ह्मणून लांबवितां येईल तितकें आपलें आयुष्य लांबविणें तिला भागच होतें.

ह्याप्रमाणें होतां होतां त्या माळ्याच्या खोलीबद्दलचें भिकार भाडें भरण्याचा दिवस आला. हा दिवस ह्मणजे **रोजची** चवकशी सुरू झाली तोच. त्या वेळीं चोहोंकडच्या घड्याळांचे बाराचे ठोके पडताहेत न पडताहेत तोंच घराची मालकीण **थामस**बाई दारावर थाप मारून आंत आली. व प्रारंभीं थोड्या गोड स्वरानें ह्मणाली: "कसें काय **मेलनाथ**-बाई, तुमची तब्बेत कशी आहे?"

"माझी प्रकृति जास्तच बिघडत चालली आहे **थामस**बाई. दुःखानें आणि काळजीनें माझें मन करपून गेलें आहे. आणि बाई, आज तुमच्या भाड्याची भिकार रकम चुकती करण्यापुरते देखील पैसे मजजवळ नाहींत." **मेलमाथ**बाई रडत रडत ह्मणाली.

ह्या अभागी कुटुंबांतील प्रत्येक जिन्नस हळूहळू मोडावयास जात आहे हें ह्या बाईनें पाहिलें असल्यामुळें हा प्रसंग येईल हें तिला ठाऊकच होतें, आणि ह्मणूनच तिनें त्रासून तेथल्या भिंतीवर हात आपटून ह्मटलें: "हें असें होणार हें मी ओळखलेंच होतें. रस्त्यांत एकाद्यानें मला लुटावें तशीच आज माझी अवस्था झाली आहे!"

**मेलमाथ**बाई—बाई,

असें कां ह्मणतां ! आह्मी गरीब आहोंत तरी प्रामाणिक आहोंत, आणि तुमचे पैसे आह्मी बुडविणार नाहीं.

**थामस**—गरीब लोकांत प्रामाणिकपणा आहे कोठें ? माझ्या देखत हळूहळू तुह्मी आपल्या जिनसा विकावयास पाठविल्या, त्या माझ्या भाड्याच्या फेडीसाठीं राखून ठेविल्या असत्या तर चाललें नसतें काय ? त्या विकून मिळविलेल्या पैशानें आपल्या पोटाला भाकरी घेण्याच्या अगोदर माझ्या भाड्याची फेड करावयाची होती. आतां मी आपल्या कारभाऱ्याला संध्याकाळीं काय सांगूं ? भाड्याच्या एकंदर रकमेच्या भरतीला हा एवढा तुमचा सवा रुपयाच कमी आहे.

**मेलमाथ**बाई—बाई, थोडे दिवस दम धरा. ह्या अवकाशांत आमचें नशीब कांहीं तरी उघडेल.

**थामस**—तुमचें नशीब उघडेल ! नांव कशाला घेतां त्याचें ? तुमच्या पाठीस सरकार हात धुवून लागलें आहे; आणि तुह्मी सर्वांना कुत्र्याच्या तोंडीं दिल्याशिवाय तें राहणार नाहीं. पण, ही गोष्ट मी आपल्या घरीं होऊं देणार नाहीं. आतांच कर वसूल करणारा कामगार येऊन गेला; आणि तुमच्यासारख्या सरकारावर उठणाऱ्या लोकांना आपल्या घरांत बिऱ्हाडाला जागा दिल्याबद्दल तो मला रागें भरला. तेव्हां आतां तुह्माला येथें ठेवावयाची सोय नाहीं. हं, निघा तुह्मी माझ्या घरांतून! करा बिऱ्हाड खालीं; हं, उठा ! !

**मेलमाथ**बाई—बाई, दया करा हो दया करा! अहो, मजवर नसली करावयाची तरी ह्या गरीब तान्ह्याकडे पाहून—ह्या बिचाऱ्या पोरांकडे पाहून—तरी दया करा!

अगदीं रागाच्या भरांत येऊन **थामस**बाई मोठ्यानें ओरडून ह्मणाली: "नाहीं, तें कांहीं होणार नाहीं. निघा येथून! नाहीं तर मी शिपाई बोलावून आणून त्याजकडून तुह्माला घालवून देईन!"

**मेलमाथ**बाई—चलारे मुलांनो, ह्या बाई जा ह्मणतात तर चला आपण जाऊं; आणि रस्त्यांत भीक मागून आपलीं पोटें भरूं!

पण हे शब्द बोलून ती उठली आणि दाराशीं गेली मात्र; तोंच तेथें तिचे पाय घोटाळूं लागून ती पडली. आपणावर भीक मागण्याचा प्रसंग येणार हें तिनें ओळखून ठेवलेंच होतें. पण ती वेळ प्रत्यक्ष येऊन ठेपली तेव्हां तिचा सारा धीर सुटला, आणि तिच्यानें पाऊलही टाकवेना. तिचें रक्त गोठल्यासारखें झालें आणि तिचें मन अगदींच व्यग्र झालें.

ती पडली होती तरी तशा स्थितींत त्या कठोर घरधनिणीनें तिजवर शिव्यांचा वर्षाव चालविला. आणि ती भिकारी ह्मणून तिची यथास्थित निंदा चालविली!

देवा! ह्या सुधारलेल्या देशांत—ह्या धर्मप्रसारार्थ निघालेल्या मंडळ्यांनीं गजबजलेल्या देशांत—प्रार्थनेसाठीं देवळांत न जाणाऱ्या लोकांना शिक्षा देण्यासाठीं कायदे असलेल्या ह्या देशांत—गरीबी हा दोष समजला जावा का? हें दीन मजुराचें कुटुंब अत्यंत निराश्रित स्थितींत व अत्यं

जरूरीच्या जिनसा विकत घेतल्या होत्या. पण आपणास काम लागेपर्यंत आपल्या जवळची पुंजी संपूं नये अशा हेतूनें त्यानें बिऱ्हाड मात्र पालटलें नव्हतें. त्याची सरकारी कचेरींत चवकशी करण्याचें सोंग होऊन त्याला बुलविच येथें त्यांनीं केलें व तेथून त्यास होडीवर चढविलें असतां त्यानें जिवावर उदार होऊन, अगदीं काळोख असतांही टेम्स नदींत उडी टाकली या वेळीं त्याजजवळची सारी शिल्लक त्याच्या बरोबरच होती. ह्यानें सरकारच्या जुलमी कामगारांच्या सांगण्याप्रमाणें आपल्या बायकोला पत्र लिहिलें आणि तें आपल्या बायकोकडे पोहोंचविण्यासाठीं पोलीसशिपायाच्या हवालीं केलें. त्या वेळीं तिला देण्यासाठीं ती रक्कमही त्यानें त्याजजवळ दिली. पण त्या चोरानें पत्र तेवढें जिकडच्या तिकडे पोहोंचतें करून रकम मात्र आपणच ठेवून घेतली. तिच्यांतली एक पैही त्या बिचारीच्या हातीं पडूं दिली नाहीं!

ह्याप्रमाणें झाल्यामुळें मध्यंतरीं जें सामान विकत घेतलें होतें तें व ह्या बाईनें सावकाराकडून सोडवून आणलेले कपडे हे सारे पुनः गुजरीवाल्याचे दुकानीं जाऊन त्याजकडून जें थोडें बहुत मिळालें त्याजवर तिनें आपली तूर्तातूर्तची गरज भागविली. दुष्ट दारिद्र्याच्या सर्व स्वाद्या करणाऱ्या घरांत एकेक जिन्नस हळूहळू पडत असून, घरधनीन आपणाकडे डोळे वासून पहात आहे असें ...

मरावयासही राजी झाली असती. परंतु आपल्या अनाथ पोरांना संभाळण्यासाठीं कोणी तरी पाहिजे ह्मणून लांबवितां येईल तितकें आपलें आयुष्य लांबावेणें तिला भागच होतें.

ह्याप्रमाणें होतां होतां त्या माळ्याच्या खोलीबद्दलचें भिकार भाडें भरण्याचा दिवस आला. हा दिवस ह्मणजे रोजची चवकशी सुरू झाली तोच. त्या वेळीं चोहोंकडच्या घड्याळांचे बाराचे ठोके पडताहेत न पडताहेत तोंच घराची मालकीण थामसबाई दारावर थाप मारून आंत आली. व प्रारंभीं थोड्या गोड स्वरानें ह्मणाली: "कसें काय मेलमाथबाई, तुमची तब्येत कशी आहे?"

"माझी प्रकृति जास्तच बिघडत चालली आहे थामसबाई. दुःखानें आणि काळजीनें माझें मन करपून गेलें आहे. आणि बाई, आज तुमच्या भाड्याची भिकार रकम चुकती करण्यापुरते देखील पैसे मजजवळ नाहींत." मेलमाथबाई रडत रडत ह्मणाली.

ह्या अभागी कुटुंबांतील प्रत्येक जिन्नस हळहळू मोडावयास जात आहे हें ह्या बाईनें पाहिलें असल्यामुळें हा प्रसंग येईल हें तिला ठाऊकच होतें, आणि ह्मणूनच तिनें त्रासून तेथल्या भिंतीवर हात आपटून ह्मटलें: "हें असें होणार हें मीं ओळखलेंच होतें. त्यांत एकाद्यानें मला लुटावें तशीच आज माझी अवस्था झाली आहे!"

असें कां ह्मणतां ! आह्मी गरीब आहोंत तरी प्रामाणिक आहोंत, आणि तुमचे पैसे आह्मी बुडविणार नाहीं.

**थामस**—गरीब लोकांत प्रामाणिकपणा आहे कोठें ? माझ्या देखत हळूहळू तुह्मी आपल्या जिनसा विकावयास पाठविल्या, त्या माझ्या भाड्याच्या फेडीसाठीं राखून ठेविल्या असत्या तर चाललें नसतें काय ? त्या विकून मिळविलेल्या पैशानें आपल्या पोटाला भाकरी घेण्याच्या अगोदर माझ्या भाड्याची फेड करावयाची होती. आतां मी आपल्या कारभाऱ्याला संध्याकाळीं काय सांगू ? भाड्याच्या एकंदर रकमेच्या भरतीला हा एवढा तुमचा सवा रुपयाच कमी आहे.

**मेलमाथ**बाई—बाई, थोडे दिवस दम धरा. ह्या अवकाशांत आमचें नशीब कांहीं तरी उघडेल.

**थामस**—तुमचें नशीब उघडेल ! नांव कशाला घेतां त्याचें ? तुमच्या पाठीस सरकार हात धुवून लागलें आहे; आणि तुह्मां सर्वांना कुत्र्याच्या तोंडीं दिल्याशिवाय तें राहणार नाहीं. पण, ही गोष्ट मी आपल्या घरीं होऊं देणार नाहीं. आतांच कर वसूल करणारा कामगार येऊन गेला; आणि तुमच्यासारख्या सरकारावर उठणाऱ्या लोकांना आपल्या घरांत बिऱ्हाडाला जागा दिल्याबद्दल तो मला रागें भरला. तेव्हां आतां तुह्माला येथें ठेवावयाची सोय नाहीं. हं, निघा तुह्मी माझ्या घरांतून! करा बिऱ्हाड खालीं; हं, उठा ! !

**मेलमाथ**बाई—बाई, दया करा हो दया करा! अहो, मजवर नसली करावयाची तरी ह्या गरीब तान्ह्याकडे पाहून—ह्या बिचाऱ्या पोरांकडे पाहून—तरी दया करा!

अगदीं रागाच्या भरांत येऊन **थामस**बाई मोठ्यानें ओरडून ह्मणाली: "नाहीं, तें कांहीं होणार नाहीं. निघा येथून! नाहीं तर मी शिपाई बोलावून आणून त्याजकडून तुह्माला घालवून देईन!"

**मेलमाथ**बाई—चलारे मुलांनो, ह्या बाई जा ह्मणतात तर चला आपण जाऊं; आणि रस्त्यांत भीक मागून आपलीं पोटें भरूं!

पण हे शब्द बोलून ती उठली आणि दाराशीं गेली मात्र; तोंच तेथें तिचे पाय घोटाळूं लागून ती पडली. आपणावर भीक मागण्याचा प्रसंग येणार हें तिनें ओळखून ठेवलेंच होतें. पण ती वेळ प्रत्यक्ष येऊन ठेपली तेव्हां तिचा सारा धीर सुटला, आणि तिच्यानें पाऊलही टाकवेना. तिचें रक्त गोठल्यासारखें झालें आणि तिचें मन अगदींच व्यग्र झालें,

ती पडली होती तरी तशा स्थितींत त्या कठोर घरधनिणीनें तिजवर शिव्यांचा वर्षाव चालविला. आणि ती भिकारी ह्मणून तिची यथास्थित निंदा चालविली!

देवा! ह्या सुधारलेल्या देशांत—ह्या धर्मप्रसारार्थ निघालेल्या मंडळ्यांनीं गजबजलेल्या देशांत—प्रार्थनेसाठीं देवळांत न जाणाऱ्या लोकांना शिक्षा देण्यासाठीं कायदे असलेल्या ह्या देशांत—गरीबी हा दोष समजला जावा का? हें दीन मजुराचें कुटुंब अत्यंत निराश्रित स्थितींत व अत्यंत

असतां तिची मुलगी थडीनें काकडून खालीं फरशीवर पडली. तेव्हां मुलानें आईच्या हातास हिसका देऊन बहिणीची ती दशा तिला दाखविली. तिनें तिला तशी पडलेली पाहतांच, आपलें तान्हें मूल थोरल्या मुलाच्या हातीं देऊन मुलीला उचलून आपल्या मांडीवर घेतलें; आणि तिच्या थंड झालेल्या तोंडावर आपलें तोंड ठेवून तिचे मुके घेण्यास प्रारंभ केला.

हा प्रकार पाहून कोमल अंत:करणाच्या मनुष्यास किती तरी द्रव फुटण्यासारखा होता !

पण ह्या बाईला आणि तिच्या त्या थंडावलेल्या मुलीला आपण तूर्त येथें असेंच सोडलें पाहिजे.

---

## भग १२६.

### खरा गुन्हेगार कोण ?

त्या पुष्कळ व विलक्षण भानगडीच्या दिवशीं सायंकाळचे चार वाजल्याबरोबर **बोस्ट्रीट**मधल्या पोलिस कचेरींत पुनः **रोज फास्टर**च्या खटल्याची चवकशी सुरू झाली. ही तरुण व सुंदर मुलगी पुनः आरोपीच्या कठड्यांत मोठ्या धिमेपणानें शिरली. तिची चर्या ह्या वेळीं शांत दिसत होती, तरी वर्ण अगदीं फिक्कट पडलेला होता. मात्र तिच्या ब्यारिस्टरानें तिजकडे जेव्हां धीर देण्याच्या हेतूनें पाहिलें तेव्हां तिच्या शुभ्र गालांवर गुलाबी रंगाची झाक चढली. आपल्यावरील आरोप खोटा ठरण्याचा पुष्काळच संभव आहे असें तिला त्याच्या पाहण्याच्या तऱ्हेवरून वाटलें. आणि आपण अत्यंत निरपराधी आहोंत अशी तिची पूर्वीचीच पक्की खात्री असल्या कारणानें ब्यारिस्टरच्या ह्या पाहण्यानें तिला चांगलीच आशा उत्पन्न झाली. आणि एकाद्या कोमेजलेल्या फुलावर दहिंवराचें थेंब पडून तें जसें पुनः टवटवीत व्हावें, तशी तिची स्थिति झाली.

**रोज**नें घाबऱ्या घाबऱ्या हळूच एकंदर कचेरीकडे पाहिलें, तेव्हां ती सकाळच्याप्रमाणें अगदीं गजबजून गेली आहे असें तिच्या नजरेस आलें. तरी **आर्थर ईटन** ह्या वेळीं म्याजिस्ट्रेटच्या शेजारीं बसलेला नाहीं; व **पीटर ग्रम्ले** आणि त्याचा दुय्यम **माऊज** हे दोघेही कचेरींत हजर नाहींत असें तिनें पाहिल्यावर, तिला ह्या दोनही गोष्टींत कांहीं तरी अर्थ आहे असें वाटूं लागलें.

म्याजिस्ट्रेटनें कामास सुरुवात करण्याविषयीं ब्यारिस्टरास सूचना केल्यावरून त्यानें आपला झगा खांद्यांवर घेऊन **आर्थर**ला प्रश्न विचारण्याची सुरुवात केली.

" साक्षीदाराच्या कठड्यांत मी उभा राहूं कीं काय ? " **आर्थर**नें विचारलें.

हा प्रश्न विचारतांना त्याची एकंदर तऱ्हा पालटून गेल्याचें तेथील प्रत्येकाच्या नजरेस आलें. त्याच्या डोळ्यांत थोडी चंचलता दिसूं लागली होती. त्याचे ओठ आणि सर्वांग थोडथोडें कांपत होतें, आणि ह्या सर्व कारणांमुळें जमलेल्या तमाम लोकांना चमत्कारिकच शंका येऊं लागल्या होत्या.

कठीण हवा पडली असतांही रस्त्यांत उघडें पडलें. थंडीनें कुडकुडणाऱ्या व भुकेनें तरमळणाऱ्या त्या मुलांस भिक मागण्यास शिकविण्याचें परम उद्वेगकारक काम करण्याचें त्या दुर्दैवी मातेच्या नशीबीं अखेरीस आलें !

त्यांच्या भिक मागण्याच्या ह्या प्रारंभीच्या दिवशीं ही मंडळी **व्हाईट हाल**मध्यें भिक मागण्यास उभी राहिली. ह्या दैन्यावस्थेचें त्या मुलांच्या आईला किती वाईट वाटत होतें हें तिच्या चर्येवरून स्पष्ट दिसत होतें.

इंग्लंडांतील मजुरांची स्थिति किती तरी हालाची आणि अपेष्टेची आहे ! त्यांनीं सकाळीं उठावें, सारा दिवस कष्ट करावे, भिकार खाणें खावें, अगदींच हलकें मद्य प्यावें, आणि घामाच्या धारा लोटपर्यंत श्रम करून रात्रीं पुरेशी झोप न मिळतां पुन: सकाळीं उठावें; आणि ह्याप्रमाणें नित्यश: क्रम चालवावा. तरी शेवटीं फायदा काय? त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्या कपाळचे हाल आणि अपेष्टा चुकत नाहींत! त्यांचें दारिद्र्य नाहींसें होत नाहीं! त्यांचा हात थोडा बंद पडला कीं, साऱ्यांना भिक मागण्याचा प्रसंग येतो! आणि शेवटीं मजुरखान्यांत अथवा कारागृहांत त्यांचा अंतही होऊन, भिकाऱ्यांच्या प्रेतांप्रमाणें ह्यांच्याही प्रेतांना सरकारी पैशानें मूठमाती मिळते! ह्यांच्यामागें ह्यांच्या मुलाबाळांचीही अशीच अवस्था होऊन त्यांनाही असेच हाल भोगावे लागतात, आणि त्यांचाही शेवट असाच होतो!

बिचाऱ्या गरिबांनीं श्रीमंत स्थितींतील आळशी लोकांकरितां शेंकडों कपडे विणावे, पण स्वत: मात्र थंडींत कुडकुडत पडावें ! माळ्यांनीं उत्तम उत्तम फळें तयार करून श्रीमंतांच्या मेजांवरील ताटांची सोय करावी, पण स्वत: उपोषणें करीत पडावें! हें रास्त आहेना?

देवाची शपथ ! ही स्थिति फार वाईट आहे. अशी स्थिति पाहून गरीब मजूर लोक देवावर विश्वास ठेविनासे झाले, आणि देव नाहींच असें ह्मणूं लागले, अथवा राज्यांत बंड करूं लागून लोकसत्ताक राज्य असावें असें ह्मणूं लागले तर त्यांत नवल तें कोणतें?

पण **व्हाइट हाल**च्या फरशीवर इंग्लंडच्या प्रजाजनांनीं आपल्या राजास फाशीं देऊन आपला कीर्तिध्वज उभारला तेथें **मेलमाथ**बाईला आपण तसेंच सोडून दिलें आहे, तिजकडे आतां आपणांस वळलें पाहिजे. तिचें तान्हें लेंकरूं तिच्या कडेवर असून, तिचा थोरला मुलगा आणि मुलगी तिच्या उजव्या बाजूस होतीं, व तिचा दुसरा मुलगा तिच्या डाव्या बाजूस उभा होता.

भिक मागण्यासाठीं ती जात असतां तिजजवळून शेंकडों गाड्या गेल्या. त्यांत बसलेल्या मंडळींकडे पाहून आंतल्या मुलांनीं गाड्यांत बसण्यासारखें काय केलें, व आपल्या मुलांनीं भिक मागत फिरावें असें त्यांजकडून तरी काय घडलें इत्यादि विचार तिच्या मनांत अनेक वेळां आले.

पण ह्याप्रमाणें तिचे विचार चालले

थोडेंबहुत खोंचून बोलण्याच्या स्वरानें **शार्पले** ( ब्यारिस्टरचें नांव ) ह्मणाला: " नको, तसें करण्याची कांहीं गरज नाहीं. निदान आतां तरी आपण आहांत तेथेंच बसा. "

असें ह्मणून त्यानें पुनः **रोज**कडे पाहून तिला धीर देण्याचा यत्न केला. पण त्यानें आपणाकडे पाहिलें व त्या पाहण्याचाही अर्थ कांहीं वेगळाच आहे, असें **रोज**च्या चट्कन् लक्षांत येऊन ती बरीच घाबरली; **ईटन**ला खोंचून बोलण्यास त्यानें सुरुवात केलीच होती, व आपणाकडेही तो अशा मुद्रेनें पाहूं लागला; तेव्हां लवकरच आपल्या जागेंत **आर्थर ईटन**लाही उभें राहण्याची पाळी येणार कीं काय अशी तिच्या मनांत शंका येऊन ती भ्याली. आपणावरील आरोप निराधार ठरावा असें जरी तिला मनापासून वाटत होतें तरी, आपणाविरुद्ध असलेल्या मुख्य साक्षीदाराच्याच हातून गुन्हा घडलेला असावा ही कल्पना तिला उद्वेग देणारी होती. तिच्या डोळ्यांपुढें अंधारी आली, आणि तिला चक्कर आल्यासारखें होऊन तिच्या मनालाही वाईट वाटलें. कारण **आर्थर ईटन**ला ज्याप्रमाणें तिजबद्दल अतोनात वाईट वाटत होतें, तसेंच तिलाही त्याजवर एखादें संकट यावें ह्याचें वाईट वाटूं लागलें. त्याजसारख्या निष्कपट मुद्रेच्या, उदार, थोर अंतःकरणाची साक्ष पटविणाऱ्या दृष्टीच्या व अगदीं देवासारख्या दिसणाऱ्या तरुण गृहस्थाच्या हातून असा घोर अपराध घडावा, ह्मणजे माणसाच्या बाहेरच्या स्वरूपांत कांहींच अर्थ उरला नाहीं, अशी तिच्या मनांत कल्पना येऊन, ही कल्पनाही तिच्या मनास खाऊं लागली.

पण ह्याप्रमाणें जरी तिचें मन अस्वस्थ झालें होतें आणि तिची चर्याही व्यग्र झाली होती तरी क्षणार्धांत ती स्वस्थ झाली, आणि त्या प्रसंगास योग्य असेच तिचे विचार पुनः झाले.

असो. ह्याच वेळीं **शार्पले**नें **ईटन**ला विचारलें: " त्या अंगणाला चार वाटा होत्या, आणि तुह्मी पाहिलेली बाई उत्तरेच्या वाटेनें गेली, व ह्या आरोपीला दक्षिणेकडील वाटेनें ती जात असतां पकडलें, ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेतना ?"

**ईटन**—होय, ह्याप्रमाणें प्रकार आहेत खरे; व कठड्यांतील अल्पवयी पोरीवरील आरोप निराधार ठरला तर त्याचा मला अत्यंत आनंद होईल हें पुनः मी एकवार सांगतों.

**शार्पले**—तुमची तशी इच्छा असेल तर त्याप्रमाणें घडूनही येईल. पण आपलें आणि आपल्या जामदाराचें कधींच कांहीं भांडणातंडण नव्हतें ?

**ईटन**—माझ्या जामदाराकडून माझा अपराध झालेला आहे हें खरें; पण त्याजबद्दल एक अक्षरही माझ्याकडून बाहेर पडणार नाहीं.

ब्यारिस्टरानें मनांत कांहीं एक हेतु न धरितां हा प्रश्न विचारला होता. आणि त्याला उत्तरही विशेष महत्वाचें येईल अशी त्याची कल्पनाही नव्हती. सबब, हें उत्तर ऐकतांच त्याला पराकाष्ठे-

चें आश्चर्य वाटलें, आणि कचेरींत जमलेल्या मंडळींचीही तशीच स्थिति झाली.

**शार्पले**—तर मग तुमच्या जामदारानें तुमचा कांहीं गुन्हा केला आहे. सांगा बरें त्याची कांहीं हकीकत.

ह्या प्रश्नाचा रोख काय आहे आणि एकंदर खटल्याचें स्वरूप कोणीकडे जात आहे ह्या गोष्टी **आर्थर**च्या मनांत येऊन त्याला फारच वाईट वाटलें. आपण विचारलेला प्रश्न सहजगत्या विचारला नसून मुद्दाम विचारला आहे, व खरा गुन्हेगारच आपण कायद्याच्या जाळ्यांत आडकावून देण्याचा यत्न करीत आहों, असें जमलेल्या सर्व लोकांस वाटून चुकलें आहे, अशी **शार्पले**नें आपल्या मनाची समजूत करून घेतली,आणि आपल्या प्रश्नाचें उत्तर देण्याबद्दल **आर्थर**ला पुनः सुचविलें.

**आर्थर**ची चित्तवृत्ति इतका वेळ व्यग्र झाली होती, ती पुनः स्थिर करून त्यानें मोठ्या धिमेपणानें आपल्या जामदाराकडून आपला काय अपराध झाला हें सांगण्याचें नाकारलें. असा—वृत्ति स्थिर करून उत्तर देण्याचें नाकारण्याचा-प्रकार पक्क्या लबाडांना जसा साधतो तसाच तो, मनाच्या खऱ्या उदारपणाचाही परिणाम असतो; व हल्लींच्या प्रसंगीं ह्या दुसऱ्याच कारणामुळें हा प्रकार घडला होता. तरी पण जमलेल्या लोकांना खरें कारणें ठाऊक नसल्यामुळें, भयंकर गुन्हे करणारे लोक आपले गुन्हे छपविण्यासाठीं मोठ्या संभावितपणाचा आव कधीं कधीं आणितात, त्यांतलाच हा प्रकार आहे असें सर्वांना वाटलें.

म्याजिस्ट्रेटनें **आर्थर**ला आपली स्थिति फारच बिकट आणि अडचणीची झाली असून, अशा स्थितींतील लोकांनीं खरी हकीकत स्पष्टपणें व विस्तारपूर्वक सांगितली पाहिजे असें विशेष आग्रहानें कळविल्यामुळें, **आर्थर** अत्यंत तिरस्काराच्या स्वरानें ह्मणालाः "माझ्याबद्दल शंका घेण्यास ब्यारिस्टर साहेबांस काय करणें आहेत हें ते स्पष्टपणें कळवितील तर त्यांच्या प्रश्नाचें उत्तर कसें द्यावें हें तरी मला समजेल."

**म्याजिस्ट्रेट**—पण ह्या अशा पहिल्या संबंधाच्या गोष्टीबद्दल तुह्माला प्रश्न विचारण्याचा त्यांना हक्क आहे.

बराच वेळ विचार करून **आर्थर** ह्मणालाः "तर मग आपल्याला मी इतकेंच कळवितों कीं, कांहीं दिवसांपूर्वी **डडले**चा मला फारच राग यावा असें विशेषच कारण घडलें होतें. परंतु मीं त्याच्या अपराधाची क्षमा केली, आणि ह्या माझ्या करण्याचा फारच उत्तम परिणाम घडला. त्याजवर माझा पूर्ण विश्वास पुनः बसला; आणि ज्या इमारतींत त्याचा हल्लीं खून झाला आहे त्या इमारती पुऱ्या होऊन, त्यांतील संस्था सुरू झाली असती ह्मणजे, तिची व्यवस्था पाहण्याचा सर्व भार मी त्याजवरच सोंपविणार होतों. ह्या एका गोष्टीवरून माझा त्याजवर किती विश्वास होता हें कळून येणार आहे."

**ग्रस्ले** व **माब्ज** हे अद्यापि परत येत नाहींत ह्याचें ब्यारिस्टराला नवल

वाटून त्यानें आर्थरला पुनः विचारलें: " मला तुह्माला दुसरा एक प्रश्न विचारावयाचा आहे. इव्हलेची आणि हल्लींच्या आरोपीची बिलकुल ओळख नव्हती, आणि त्याचा खून तिनें करावा असें कांहींही कारण तुह्माला सांगतां येत नाहीं, असें तुह्मीं सकाळीं सांगितलेंच आहे. पण दुसऱ्या कोणा स्त्रीची आणि ह्या इव्हलेची ओळख असल्याचें तुह्मास ठाऊक आहे काय? त्याजवर दुसऱ्या कोणा स्त्रीचें प्रेम होतें काय? अथवा त्याचा सूड उगविण्यास दुसऱ्या कोणा स्त्रीला कांहीं तसें कारण असल्याचें तुह्मास ठाऊक आहे काय?"

" होय, आहे तसें घडण्यासारखें." आर्थर पुटपुटला.

चट्कन् याला एका गोष्टीचें स्मरण होऊन, अंधेऱ्या खोलींत विजेचा प्रकाश पडावा तसें त्याच्या अंतःकरणांत झालें. फर्नांदा—ती खुनशी—ती कधींही क्षमा न करणारी—फर्नांदाच हें काम करण्यास खास आली असावी असें त्याला वाटूं लागलें. जुळून आलेल्या एकंदर गोष्टींवरून रोजनेंच हा गुन्हा केला असावा अशी आपल्या मनाची समजूत करून घेण्याचें त्याला इतका वेळ भाग पडलें होतें. पण तीच गुन्हेगार असावी असें दाखविणाऱ्या गोष्टींचें जाळें आतां तिच्या भोंवतालून निघून ह्याच्या भोंवतीं गुंडाळूं लागलें होतें. पण शार्पलेनें कितीही खटपट केली आणि कसाही आव आणला तरी आपण निर्दोष आहोंत अशी त्याची पक्की खात्री होती यामुळें इव्हलेचा खून फर्नांदाकडूनच झाला असावा असें त्याच्या मनांत आतां येऊं लागलें. ब्यारिस्टरनें सहजगत्या विचारलें. त्या प्रश्नामुळें कोणा तरी दुसऱ्या स्त्रीच्या हातून हें कृत्य घडलें असावें, आणि रोज अत्यंत निरपराधी असावी; व ती निरपराधी असली तर फर्नांडानेंच खून केला असावा अशी त्याची अगदीं खात्री झाली ह्मटलें तरी चालेल. हे सर्व विचार त्याच्या मनांत एका निमिषार्धांत आले; आणि त्यांजमुळें त्याचें मन अत्यंत खिन्न होऊन, त्यानें आपल्या कपाळास क्षणभर हात लावला.

पण त्याजकडून सरळ उत्तर न मिळाल्यामुळें ब्यारिस्टर थोडा उतावीळ झाला; आणि यानें पुनः आपला प्रश्न विचारून त्याचें उत्तर देण्याविषयीं आर्थरला फारच आग्रह केला.

ब्यारिस्टरच्या प्रश्नाचें उत्तर द्यावें असें आर्थरच्या मनांत आलें. बोलण्यासाठीं त्यानें ओठ उघडले, आणि जीभ ही हालूं लागली. इतक्यांत त्याच्या मनांत पुनः दुसरे विचार आले. इव्हलेला फर्नांदेनें मारलें असावें असें आपणास वाटतें असें कळविलें तर, तसें कां वाटतें हें सांगावें लागेल; आणि तसें करणें ह्मणजे, ज्या गोष्टींबद्दल आपण इव्हलेला क्षमा केली असून, त्या विसरून जाण्याचें वचन दिलें, त्या सर्वांचा पुनः पाढा वाचावा लागेल. तसें झालें कीं, इव्हलेचीं सर्व कृत्यें उघडकीस येऊन त्याची छीथू होणार, व फर्नांदेवर गुन्ह्याची

शाविती होऊन, तिला शिक्षा झाल्याशिवाय राहणार नाहीं; आणि तिजकडून खरोखरच गुन्हा घडला असला तर ह्या सर्व गोष्टी झाल्या तरी हरकत नाहीं असें त्याला वाटलें. पण तिजकडून हा गुन्हा घडला नसला तर मात्र सर्व गोष्टी विनाकारण बाहेर येणार. आणि त्या बाहेर आल्या कीं, हल्लींच्या नाहीं तरी मागच्या गुन्ह्याबद्दल फर्नांडेला शिक्षा झाल्याशिवाय राहणार नाहीं, असें त्यानें पक्कें ओळखलें. त्या गुन्ह्याबद्दल तिला शिक्षा होणें ह्मणजे, ज्या गोष्टी आपल्यामुळें तिच्या हातून घडल्या, आणि ज्यांची आपणही तिला क्षमा केली त्यांची प्रसिद्धि करून, हल्लीं चांगल्या अब्रूनें दिवस काढण्यास तिनें प्रारंभ केला असतांही तिची बेअब्रू होण्यास व तिला शिक्षा मिळण्यास आपण कारण होऊं असें त्यास वाटलें; आणि लागलीच त्यानें आपला पहिला विचार पालटून पुनः मौन धरलें.

तो उत्तर देत नाहीं, आणि ब्यारिस्टरानें प्रश्न विचारतांच त्याचा फारच गोंधळ झाला असें पाहून, म्याजिस्ट्रेटचें मत त्याच्या विरुद्ध झालें; व जमलेल्या सर्व लोकांनाही त्याजविषयीं फारच शंका येऊं लागल्या.

**ब्यारिस्टर**—ह्या गृहस्थांकडून योग्य उत्तर मिळण्याची अशा धरणें व्यर्थ आहे. तथापि **डडले**चा जर त्याच्याच सुरीनें खून झाला आहे तर हें कसें घडलें एवढेंच त्यांनीं सांगावें असा माझा त्यांना एकच प्रश्न आहे.

पराकाष्ठेचें आश्चर्य वाटून **आर्थर** ह्मणाला: "त्याच्याच चाकूनें."

**आर्थर**ला जरी ह्याप्रमाणें अतोनात आश्चर्य वाटलें तरी त्याच्या मनोविकाराचें खरें स्वरूप लोकांच्या लक्षांत न येतां, त्यांनीं तो अगदीं घाबरून गेला आहे असेंच अनुमान केलें. आणि त्याच्याच हातून गुन्हा घडला असल्यामुळें त्यानें असें बावरावें हें रास्तच आहे असें त्यांना वाटलें.

"होय, त्याच्याच सुरीनें त्याचा खून झाला आहे. न्यायाधीश साहेबांनीं तो सुरी काढून एकवार पहावी." ब्यारिस्टर ह्मणाला.

त्याच्या विनंतीस मान देऊन न्यायाधीश तो सुरी नीट पहात असतां सर्व लोकांस ती गोष्ट कळण्याची अत्यंत उत्कंठा लागून, तें इतके स्वस्थ बसले कीं, या वेळीं तेथें एखादी टांचणी पडली असती तर तिचा देखील नाद स्पष्ट ऐकूं आला असता.

**रोज फास्टर**चें काळीज धडधड उडूं लागलें; आणि तिलाही खरा प्रकार कळण्याविषयीं अत्यंत उत्कंठा लागली.

न्यायाधिशानें सुरीकडे निरखून पाहिल्यावर तो ह्मणाला: "होय, **बुइल्यम डडले**च्या नांवाचीं आद्याक्षरें ह्या सुरीच्या मुठीवर खोदलेलीं आहेत खरीं."

सर्व लोकांना अतिशय आश्चर्य वाटून ते कुजबुजूं लागले; आणि लवकरच **रोज फास्टर**ची निर्दोषता न्या-

याविशाच्या नजरेस येईल असें सुचविण्याकरितांच कीं काय सर्वजण तिजकडे पाहूं लागले.

लागलींच लोकांची दृष्टि तिजकडून निघून आर्थर ईडनकडे वळली. तो तर आश्चर्यानें चकित झाला. आपण स्वप्नांत असून, पराकाष्ठेच्या दुर्वार्ता, अनेक हाल आणि विलक्षण त्रास ह्यांच्या गर्त्यांत सांपडलों आहों असें त्याला वाटलें. सुरीवर वुइल्यमचेंच नांव असल्यां कारणानें काय अनुमान निघण्यासारखें आहे ह्याची कल्पना त्यालाही होऊन चुकली. डडलेनें आपल्या हातानें आपणास मारून घेतलें नसून, कोणी तरी त्याचा खून केला, आणि तोही त्याच्याच सुरीनें झाला; तेव्हां त्याजशीं निकट संबंध असलेल्या आणि त्याच्याच बरोबर त्याच्या वाड्यांत रहात असलेल्या कोणाकडून तरी हा खून झाला असावा असें उघड दिसत होतें.

ब्यारिस्टर—न्यायाधीशसाहेब, ह्या सुरीच्या मुठीवरलीं तीं अक्षरें मीं वाचलीं, ह्मणूनच खटला तहकूब ठेवण्याविषयीं आणि ह्या तपासणीचें काम पुरें होईपर्यंत ईडनसाहेबांना येथेंच बसवून घेण्याविषयीं मीं आपणास विनंति केली. आपण त्या वेळीं माझी विनंति मान्य केली नसती तर ईडन साहेबांना एकदम पकडण्याबद्दल मीं आपणाजवळ मागणें केलें असतें.

तिरस्कारानें ईडनचे गाल लाल झाले आणि तो ह्मणालाः " मजवर असल्या भयंकर गुन्ह्याचा आरोप करण्यास तुह्मी धजणार नाहीं. मी अत्यंत निरपराधी आहें इतकेंच नाहीं; तर असा गुन्हा माझ्या हातून घडणारही नाहीं. "

खटल्यास हल्लीं आलेलें स्वरूप पाहून आपली निर्दोषता पूर्णपणें व्यक्त झाली ह्याचा रोजला आनंद झाला तरी, ईडनवर आरोप येत आहे हें पाहून तिला तितकेंच दुःखही झालें; आणि ह्या उभय विकारांनीं हा वेळपर्यंत तिनें धरलेलें सर्व धैर्य नष्ट होऊन, तिच्या डोळ्यांतून खळ खळ अश्रु वाहूं लागले. आणि स्फुंदत स्फुंदत ती म्हणालीः " मी देखील अशीच निरपराधी आहें. "

" मुली स्वस्थ हो, स्वस्थ हो " असें कोणी ओळखीच्या स्वराचें मनुष्य ह्मणत आहे असें ऐकून रोजनें झटकन् वर पाहिलें. तों कठड्यांत आपणाजवळ ब्रेसबाई उभी आहे असें तिच्या दृष्टीस पडलें.

ह्याच सुमारास पिटर ग्रब्ज आणि मार्डन हे दोघे तेथें आले, आणि ब्यारिस्टराजवळ जाऊन थोडा वेळ ते त्याच्याशीं बोलले. ब्रेसबाईनें स्नेह व ममता दाखवून रोजला हळूच म्हटलेंः " तूं अतां येथें फार वेळ राहणार नाहींस असें माझें मन मला सांगतें. "

रोजनें कृतज्ञतेच्या मुद्रेनें तिजकडे पाहिलें; आणि ब्रेसबाई इतकी दुष्ट व उलट्या काळजाची बायको होती तरी, आपल्यामुळें त्या अनाथ पोरीवर हीं सारीं संकटें आलीं, व हे सर्व हाल तिला भोगावे लागले ह्याचें स्मरण

होतांच तिला पश्चात्ताप होऊन तिचें मन कष्टी झालें.

म्याजिस्ट्रेटचे आभार मानून ब्यारिस्टर म्हणाला: " हल्लीं एक फारच महत्वाची नवीन गोष्ट कळली आहे, आणि पिटर ग्रम्ले ह्यांची साक्ष घेणें जरूर आहे."

लागलींच ग्रम्ले साक्षीदाराच्या कठड्यांत शिरला, आणि चालीप्रमाणें त्यानें शपथ घेतल्यावर ब्यारिस्टरच्या प्रश्नाचें उत्तर देतांना तो ह्मणाला: " मी आणि माझा जोडीदार मांडज असे दोघे सकाळीं लार्ड मार्चमंट ह्यांच्या वाड्यांत गेलों होतों. तेथें मी डडलेच्या खोलीचा झाडा घेतला व नामदार ईडनच्याही खोलीचा घेतला; तेव्हां ईडनसाहेबांच्या निजावयाच्या खोलीमध्यें पेटीच्या खणांत सुरीचें एक मोडकें पात सांपडलें."

हें पातें त्याच्या हातून शिरस्तेदारानें घेऊन न्यायाधिशाजवळ दिलें. त्यानें तें आपल्याजवळील सुरीला लावून पाहिलें, व तें त्याच सुरीचें पातें आहे असें दिसून येतांच, सर्व गोष्टींचा जो मेळ बसला त्याजवरून ईडननेंच डडलेचा खून केला असावा असें उघड होऊं लागलें. त्यामुळें सर्व लोकांना विलक्षण आश्चर्य वाटून अत्यंत तिरस्कारही वाटला. आणि पूर्वी जो नुसता संशय वाटत होता त्याला आतां खात्रीचें स्वरूप येऊन लोकांत कुजबुज सुरू झाली. तो दिसण्यांत इतका निष्कपट व गरीब दिसत असतां त्याजकडून असा भयंकर गुन्हा घडला, आणि स्वतःच्या हातून तो घडला असतांही एका अनाथ व निरपराध मुलीवर त्यानें त्याचें खापर फोडण्याचा यत्न करावा ह्याचा सर्वांनाच संताप आला.

हा सर्व प्रकार पाहून आर्थर ईडनची क्षणभर वाचाच बंद झाल्यासारखी झाली. पण लागलींच तो स्थिर होऊन ह्मणाला: " थांबा थांबा, न्यायाधीशसाहेब, मला थोडें बोलण्याची परवानगी असावी."

ब्यारिस्टर—तुमच्या वर्तनानें जें बोलावयाचें असेल तें इतक्यांत बाहेर फोडूं नका.

ईडन त्रासाच्या आणि रागाच्या स्वरानें ह्मणाला: " माझ्या वर्तनानें ह्मणजे ? ह्याचा अर्थ तरी काय ?"

थोड्या कडक स्वरानें आणि त्रासलेल्या मुद्रेनें म्याजिस्ट्रेट ह्मणाला: " त्यांच्या ह्मणण्याचा अर्थ मी लवकरच तुह्माला स्पष्टपणें कळवीन. पण पिंजऱ्यांत असलेल्या आरोपीविरुद्ध बिलकूल पुरावा नाहीं, इतकेंच नाहीं; तर त्या बिचारीला क्षणभर तरी असल्या भयंकर गुन्ह्याच्या आरोपाचें ओझें वहावें लागून, विनाकारण तिच्या नांवाला दुष्कृत्याचा अल्प काळ तरी स्पर्श झाला ह्याचें मला फार वाईट वाटतें हें प्रथम कळविलें पाहिजे. तिला मी सोडून देतों आणि तिजबद्दल माझ्या मनांत यत्किंचितही संशय उरला नाहीं असें उघडपणें कळवितों."

हे शब्द ऐकतांच सर्वांना आनंद होऊन **रोज** **ब्रेस**बाईच्या गळां पडून रडूं लागली.

लोक **आर्थर**कडे सारखे टवकारून पहात होते आणि मोठ्या तिरस्कारानें हासत होते. तरी तिकडे लक्ष न देतां, **आर्थर ईटन** अधीर स्वरानें ह्मणालाः " आणि **रोज फास्टर** बाईची निरपराधिता उत्तम रीतीनें व्यक्त झाली आहे ह्याचा मलाही पराकाष्ठेचा संतोष होत आहे. आणि त्यांना इतका वेळ जो त्रास, जी अडचण आणि जी काळजी भोगणें पडलें त्या सर्वांना मी पर्यायानें कारण झालों ह्याजबद्दल मनापासून मी त्यांची क्षमा मागतों. "

पण आपली निर्दोषता व्यक्त झाल्याच्या आनंदानें **रोज**चें मन इतकें व्यग्र झालें होतें कीं, **ब्रेस**बाईला ह्या वेळीं तिला, दोन प्रहरीं त्यांची गांठ पडली होती त्या खोलींत घेऊन जावें लागलें. ह्यामुळें **आर्थर** काय बोलला हें तिनें मुळींच ऐकलें नाहीं.

**रोज फास्टर** खोलींत जाऊन मंडळी पुनः मुकाट्यानें बसल्यावर **आर्थर ईटन** न्यायाधिशास उद्देशून थोडें बोलणार होता. आपल्या निरपराधितेची खात्री असल्यामुळें त्याची चर्या स्थिर आणि शांत होती. परंतु तो पक्का उलट्या काळजाचा असल्यामुळें हें शांततेचें त्यानें नुसतें सोंग केलें आहे असें सर्वांना वाटलें. इतक्यांत न्यायाधीश ह्मणालाः " ह्या खटल्यांतील पुराव्यांत ज्या गोष्टी बाहेर पडल्या त्यांजबद्दल येथें थोडें विवेचन केलें पाहिजे. खून झाल्यानंतर आपण पुढें धांवत येऊन पाहिलें तों एक स्त्री उत्तरेकडच्या वाटेनें धांवत गेली असें **ईटन**नें प्रथम सांगितलें; परंतु **रोज फास्टर**ला तर दक्षिणेच्या वाटेंतच पकडून आणलें. शिवाय, ज्या चाकूनें **डडले**चा खून झाला तो त्याचा स्वतःचाच असून, त्याजशीं निकट संबंध असलेल्या गृहस्थाच्या मात्र तो हातीं लागण्याचा संभव आहे; आणि ह्या सुरीचें मोडकें पातं **आर्थर ईटन**च्या खोलींत सांपडलें; तेव्हां ह्या सर्व गोष्टींवरून पाहतां ह्या गुन्ह्याचा वहीम **ईटन**वरच पडतो. ह्यासाठीं माझा असा हुकूम आहे कीं, पुढील सेशनांत **ईटन**ची ह्या गुन्ह्याबद्दल चवकशी व्हावी, आणि तोंपर्यंत गुन्हेगारांच्या तुरुंगांत त्याला ठेवावें. "

**ईटन**—न्यायाधीशसाहेब, सेशनामध्यें माझी चौकशी होई तोंपर्यंत तुरुंगांत माझी वस्ती व्हावी असा आपण हुकूम करीत आहां, आणि तो हुकूम मान्य करणें मला भाग आहे; तरी पण आतां निर्दोष ठरलेल्या आरोपीप्रमाणेंच मी सर्वथैव निर्दोष आहें, एवढें आपणास कळविण्याची मला परवानगी असावी. मजकडूनच हा भयंकर गुन्हा घडला असावा असा आपला समज होण्यास पुष्कळ कारणें आहेत हें खरें आहे. ह्या वेळपर्यंत ज्या निरनिराळ्या गोष्टी बाहेर आल्या आहेत त्यांजमुळें मजवर पुरावा होत असून, ह्या पुराव्याचे दुवे कसे

एकांत एक आडकलेले दिसतात, यांची संख्याही मक्रम होत आहे; पण आज जें आपणाला यथासांग दिसत आहे यांत स्वर्गे आहेत असें आपल्या प्रत्ययास येईल; आणि माझी निर्दोषता आपल्या नजरेस येऊन, आज जी मंडळी मजवर चरफडत आहे आणि माझा धिक्कार करीत आहे तीच मजवर व्यर्थ आरोप झाला आहे असें कबूल करून मजवर दया करूं लागेल. पण न्याया-धीशसाहेब, ह्या प्रकरणाच्या बुडाशीं जी गोष्ट असल्याचें आतां स्पष्ट दिसतें ती गोष्ट बाहेर फोडून अथवा येथें सांगून उपयोग नाहीं. वरिष्ठ कचेरींत माझी च-वकशी होईल तेव्हां सर्व हकीकत मी कळवीन. सध्यां आपल्या हुकमाप्रमाणें मी तुरुंगांत जाण्यास सिद्ध आहें.

असें ह्मणून तो शिपायांच्या स्वाधीन झाला व त्यांनीं त्यास तुरुंगाकडे चालविलें.

याची ही स्थिति पाहून लोकांची याज-विषयींची वृत्ति पालटली आणि त्यांना या-दया ची येऊं लागली. तरी ज्याला झाला, ह्याला कांहींतरी वेड लागलेलें असावें, आणि त्या वेडाच्या भरांत त्यानें हा खून केला असावा असेंच वाटून, तसे उद्गार चोहोंकडून निघूं लागले. ते उद्गार ह्याच्या कानीं पडतांच याच्या मेंदूला धक्का बसल्यासारखें होऊन त्याला अगदीं चक्कर आलें, व तो पडलाच असता; परंतु बरोबरच्या शिपायांनीं त्याला सा-वरून धरल्यामुळें तसा प्रकार घडून आला नाहीं.

---

# भाग १२७.

## पोलिस कचेरींतील खोली.

ब्रेसनाईबरोबर रोज फास्टर कचेरीच्या मुख्य दिवाणखान्याशेजारील खोलींत जा-ऊन बसल्यावर थोडा वेळ गेल्यानंतर तिचें मन पुनः स्थिर होऊन, पुढें आपण काय करावें हा विचार तिच्या मनांत आला; व पूर्वीच्या सर्व गोष्टींची तिला पूर्ण आठवण होऊन, आपली तानडतोब सुटका होण्यास कमी किंवा जास्त मानानें ब्रेसनाईच कारण आहे; तेव्हां पालमाल रस्त्यांतील वाड्यांत पुनः येण्याविषयीं ती आपणास आग्रह करते कीं काय, ह्याची तिला धास्ती पडून, घाबऱ्या दृष्टीनें तिनें तिजकडे पाहिलें.

ह्या तिच्या पाहण्याचा अर्थ समजून ब्रेसनाई तिला उत्तर देणार, इतक्यांत पिटर ग्रम्ले दार उघडून आंत आला व ह्मणालाः "बाईसाहेब, ह्या धाकट्या बाईसाहेब सुटल्या. आणि धाकट्या ताई, ह्या गोष्टीबद्दल मला फार आनंद वाटतो."

रोज—तुह्माला मजविषयीं इतकी का-ळजी वाटली आणि माझी सुटका होण्यासाठीं तुह्मीं एवढी खटपट केली ह्याबद्दल मी तुमची आभारी आहें. पण ईडनसाहेबांच्या संबंधानें काय निकाल झाला?

पिटर त्यांची सेशनांत चवकशी व्हावी असा हुकूम झाला आहे. पण त्यांजकडून हा गुन्हा घडला कीं नाहीं हें कांहींच सा-गवत नाहीं. एकंदर प्रकाराकडे पाहिलें

तर फारच चमत्कारिक दिसतें. तथापि सध्या तुह्मी सुटला आहांत, आणि तुम-च्यावर आतां कांहींच येणार नाहीं एवढें पुष्कळ आहे.

ह्या त्याच्या भाषणास रोज उत्तर देणार, इतक्यांत दारावर पुनः टिचकी मारण्यांत आली, व ग्रम्लेनें तें उघडलें. तेव्हां बाहेर त्याचा स्नेही माकज उभा होता, तो ह्मणालाः " कोणा गृहस्थाला ताईशीं बोलावयाचें आहे."

" माझ्याशीं बोलावयास कोणी आ-लें आहे!" रोज ह्मणाली. पण आलेला गृहस्थ मॉगल्स असेल (त्यास हद्दपारि के-ल्याची बातमी तिला लागली नव्हती.) असें वाटून, ती पुनः ह्मणाली:"ठीक आहे, येऊं द्या त्याला आंत ह्यांच्या समक्षच मी त्याची गांठ घेईन."

पण त्या दुष्ट बाईच्या तावडींतून मॉगल्सनें आपणास सोडविलें असत पुनः तिजशीं आपण अशा मित्रभावानें वागत आहों हें पाहून त्याला राग येईल असें वाटून, ती पुनः भ्यालल्यासारखी झाली.

पण लवकरच तिची ही काळजी नाहींशी झाली. कारण ह्या तिला भे-टावयास आलेला गृहस्थ मॉगल्स नसून पूर्वी तिला डेसबरोच्या अर्लच्या वा-ड्यांत एके प्रसंगीं भेटलेला उंच, सड-पातळ, पण सुरूप तरुण गृहस्थ होता.

डेसबाईनें ह्याला पूर्वी पाहिलें होतें पण कोठें आणि केव्हां ह्याची तिला मुळींच आठवण होईना; तेव्हां ती त्याज-कडे मोठ्या साशंक मुद्रेनें पाहूं लागली.

पिटर ग्रम्लेला ह्या नव्या प्रकाराशीं कांहींच करावयाचें नव्हतें, ह्मणून तो शेजारच्या खिडकींत जाऊन, पूर्व रात्रीं दारूच्या गुत्त्यांत शिकलेलें एक गाणें गुणगुणत उभा राहिला.

हा तरुण गृहस्थ रोज फास्टर-जवळ आल्यावर आपली टोपी मोठ्या मर्यादेनें काढून ह्मणालाः " फास्टर ताई, तुह्मीं मला पूर्वी पाहिल्याचें तुह्माला खास आठवत नसेल."

रोज—तसें ह्मणणें ह्मणजे उगीच नसतें सोंग करणें आहे. मी तुह्माला पाहिलें असल्याचें मला आठवतें. डेस-बरोच्या अर्लसाहेबांच्या येथें आपली पूर्वी थोडा वेळ गांठ पडली होती.

गृहस्थ—होय. आतां रस्त्यानें जात असतां आंत कचेरींत चाललेल्या चव-कशीबद्दल लोक बोलतांना ऐकून, को-णावर आरोप आहे हें पाहण्याची सहज मला इच्छा उत्पन्न झाली, आणि मी त्या गर्दीतून आंत शिरलों. त्या वेळीं मीं पूर्वी एकवार पाहिलेल्या तरुण व सुरूप मुलीवर अशा गुन्ह्याचा आरोप असेल ही कल्पनासुद्धां माझ्या मनांत नव्हती. मी आंत आलों त्याच वेळीं तुह्मी ह्या बाईबरोबर ह्या खोलींत शिरत होतां. पण तुह्मी माझ्या दृष्टीस पडतांच मीं तुह्माला ओळखलें.

हें बोलतांना त्याच्या स्वरांत एक प्रकारची मधुरता आणि चर्येवर विशेष आदरबुद्धि ह्यांचा भास होत होता. तो पुढेंही ह्मणालाः " मीं तुह्माला त्या दिवशीं एकदांच पाहिलें

खरें; पण तेव्हांपासून आजपर्यंत तुमची मला पुष्कळ वेळां आठवण झाली आहे."

तो खऱ्या अंतःकरणानें आणि विलक्षण मर्यादेनें आपला असा गौरव करीत आहे हें पाहून **रोज** लाजली. पण तो इतक्या योग्य मर्यादेनें बोलला होता कीं, त्याच्या त्या भाषणाचा कोणालाही राग येण्यास जागा नव्हती. तरी तिनें भीतभीत **ब्रेस**बाईकडे पाहिलें

पण ह्याच वेळीं **ग्रस्ले** खिडकींत उभा होता, तो **ब्रेस**बाईकडे येऊन ह्मणालाः "बाईसाहेब, मला वाटतें मला आतां गेलेंच पाहिजे. तेव्हां तुमच्याशीं थोडें बोलावयास सांपडेल तर बरें."

**ब्रेस**बाई लागलींच उठली, आणि ह्याजबरोबर बोलण्यासाठीं खिडकींत गेली.

इकडे हा तरुण गृहस्थ थोडा पुढें सरून **रोज**च्या जवळ गेला, आणि मंद स्वरानें ह्मणालाः "आजच्या ह्या दिवसाच्या विलक्षण व दुःखकारक खटल्यांतील मुख्य नायिकेचा भाग तुह्माकडे होता हें पाहून मला किती वाईट वाटलें, आणि माझें काळीज किती चरारलें, ह्याची तुह्मास कल्पनाही होणार नाहीं. खरेंच, आपली पहिली गांठ पडून आपलें थोडा वेळ भाषण झालें, तेव्हांपासून माझें मन तुम्हाकडे किती ओढत आहे हें तुम्हाला कोठून ठाऊक असणार ?"

हे त्याचे शब्द ऐकतांच **रोज** आश्चर्यानें चकित झाली. आणि त्याजकडे रागानें पाहून वळून तिनें आपली दृष्टि खालीं लावली, व लज्जेनें तिचें तोंड किंचित् लाल झालें.

"असें, तुह्मी मजवर रागावूं नका." तो इतक्या कांहीं कोमल स्वरानें बोलला कीं, तिला कितीही राग आला असता तरी तो बिलकूल टिकला नसता. "तुह्माला मजकडून यत्किंचित् दुःख झालें तरी मला तें मरणापेक्षांही असह्य होईल. कारण आज तुम्हाला फारच दुःख भोगावें लागलें आहे; तेव्हां मजकडून तरी त्यांत नवीन भर पडावयास नको तरी पण आपली पूर्वी गांठ पडली, तेव्हांपासून तुमची मूर्ति माझ्या अंतःकरणांत सारखी वास करीत असल्यामुळें येथें आरोपीच्या पिंजऱ्यांत उभी असलेली **रोज फास्टर** आणि पूर्वी **डेसबरो**च्या वाड्यांत भेटलेली तरुण कुमारी ह्या एकच आहेत हें पाहून माझ्या मनाला अतोनात धक्का बसला. तरी तुह्मावरील आरोप नाशाबीद झाला असून, तुमची निर्दोषता उत्तम रीतीनें सिद्ध झाली हें ऐकून मला पराकाष्ठेचा संतोष झाला—आनंदानें माझ्या डोळ्यांत टिपें आलीं; आणि मजशेजारीं उभे असलेले लोक तर, "मी तुमचा भाऊच आहें" असें ह्मणूं लागले. पण दुसरे कित्येक तुह्मास ओळखणारे गृहस्थ तेथें उभे होते, ते ह्मणाले: "छिः, ह्या मुलीला आई आणि बाप नाहींत इतकेंच नाहीं; तर तिला भाऊही नाहीं आणि बहिणही नाहीं." ही बातमी मी ऐकली तेव्हां मीही तुमच्यासारखाच ह्या जगांत एकटाच असल्या कारणानें

तुमचा मी भाऊ झालों असतों तर किती बरें झालें असतें, असें मला वाटलें."

हे त्यानें अशा कोमल स्वरानें उच्चारलेले शब्द ऐकून रोजचें अंतःकरण अत्यंत द्रवलें. तिनें आपलें डोकें वर उचलून त्याजकडे दयार्द्र दृष्टीनें पाहिलें. आपण दोघेही जगांत सारखेच एकटे आहोंत ही याची उक्ति ऐकून, आपला आणि त्याचा स्नेहभाव जमण्यास हें एक जबर कारण आहे असें तिला वाटलें—एकमेकांस एकमेक परके असल्यामुळें वागणुकींत जो तुटकपणा असतो तो नाहींसा झाला; आणि एकाद्या अर्लनें किंवा डचेसनें जरी त्याला पोकळ अर्थाची-पण उगीच मोठमोठीं-भाषणें बोलून तिला भेटविलें असतांही तिच्या मनांत याजविषयीं जी प्रेमबुद्धि उत्पन्न झाली नसती, ती "ह्या जगांत मीही एकटाच आहें." ह्या शब्दांनीं उत्पन्न झाली.

ती आपणाकडे अशा कोमल दृष्टीनें पाहत आहे असें पाहून त्या तरुण गृहस्थास उत्तेजन मिळाल्यासारखें होऊन तो ह्मणाला: "होय, तुमचा मी भाऊ अशा नात्यानें जर तुमच्याजवळ मला यावयास सांपडलें असतें तर खरोखरच मला आनंद झाला असता. परंतु ह्याविषयीं माझ्या मनांत विचार घोळत आहेत तोंच मजजवळ असलेल्या गृहस्थानें तुमच्या आईबापांचा किती दुःखांत अंत झाला ह्याविषयींची गोष्ट शेजारच्या लोकांना सांगितली; आणि ती ऐकतांच माझें अंतःकरण अगदींच फाटून गेलें; व तुमच्या जवळ येऊन तुमची सुटका झाल्याबद्दल आपणास झालेला आनंद तुह्मास कळवावा, व ह्यापुढें मला तुह्मी आपला खरा स्नेही समजा, अशी तुह्माजवळ विनंति करण्याचा मीं निश्चय केला."

तिच्या बाह्य सौंदर्याप्रमाणेंच तिचें पावित्र्यही अत्यंत निर्दोष आहे असें ओळखून तो तरुण गृहस्थ हे शेवटचे शब्द भीत भीत व संशयाच्या स्वरानें बोलला. त्याचा तिला राग येईल कीं काय अशी त्याला धास्ती वाटूं लागली, आणि काळजीच्या मुद्रेनें तो तिजकडे पाहूं लागला.

याचे ते शब्द ऐकून आणि एकंदर तऱ्हा पाहून रोजचेंही अंतःकरण व्यग्र झालें, आणि कांपऱ्या स्वरानें ती ह्मणाली: "आपण मजविषयीं अशी काळजी वाहतां ह्याबद्दल मी आपली ऋणी आहें. पण आपल्याला जसें माझें नांव ठाऊक आहे तसें मलाही आपलें ठाऊक असावें, ह्यासाठीं तें विचारण्याची मला परवानगी असावी. आणि आपण मजविषयीं जो इतका स्नेहभाव दाखवीत आहां याचें मला केव्हांही विस्मरण होणार नाहीं, एवढेंही आपणास कळवून ठेवण्याची मला मोकळीक द्या."

"माझें नांव जार्ज वुडफाल असून, मी तसबिरी काढण्याचा धंदा करतों. पण तुमचा खरा स्नेही अशाच नात्यानें वागण्याचा माझा संकल्प ठरला असल्यामुळें आपण तुमच्याच संबंधानें बोलूं. सांगा, तर मग ताई, आहेत का तुह्माला कोणी खरे स्नेही? आज तुह्माला जाऊन रहावयास एकादें बंदोबस्ताचें घर आहे का?

मनात्यास मीही तुह्माप्रमाणेंच ह्या जगांत एकटा आहें; तेव्हां माझें खरें कर्तव्य मला बजावूं द्या. नुसत्या स्वतःच्या सोयीकडे आणि फायद्याकडे दृष्टि देऊन माणसें वागूं लागतील तर जगांतला मनुष्यपणाच गेला असें ह्मटलें पाहिजे."

"घर? मला पोरक्या पोरीला घर!" रोज हळू हळू पुटपुटली; आणि तिला अगदीं हुंदका येण्याचा रंग दिसूं लागला

जार्ज वुडफाल अत्यंत प्रेमाच्या व खरेपणाच्या स्वरानें ह्मणाला: "तर मग ताई, मला तुमची सेवा करतां येईल तुमच्या अंतःकरणाला यत्किंचितही धक्का न लागूं देण्यासाठीं आपला जीवही खर्ची घालण्यास तयार होईल असा अकृत्रिम स्नेहबुद्धीनें तुह्माशीं वागणारा मी तुमचा खरा मित्र आहें एवढें कृपा करून आपण ह्यापुढें लेखून, माझी विनंति मान्य करा, एवढीच माझी प्रार्थना आहे."

"घर" हा शब्द ऐकतांच आलेला हुंदका आवरून आणि डोळे पुसून रोजनें एकदां वुडफालकडे पाहिलें. तिची त्या वेळची चर्या इतकी कांहीं कोमल व मधुर दिसत होती कीं, वुडफालचें अंतःकरण अगदीं द्रवून जाऊन, बाळपणापासूनच तिजवर आपलें प्रेम जडलें होतें कीं काय असें त्याला वाटूं लागलें

ती त्याला ह्मणाली: "वुडफाल, तुह्मी अत्यंत निरपेक्षतेनें व माझ्या ध्यानींमनींही नसतां हा जो मजविषयीं स्नेहभाव दाखवीत आहांत त्याजबद्दल तुमचे उपकार मीं कसे मानावे ह सुद्धां मला कळत नाहीं. असो. तुह्मी जशा मोकळ्या मनानें मजशीं बोलत आहांत, तशाच मोकळेपणानें मी आपल्याला कळवितें की, ह्या जगांत मला कोणी स्नेहीही नाहीं, आणि मला कोठें रहायला घरही नाहीं. ज्या बाईसाहेबांजवळ मी आतां बोलत होतें त्यांजबद्दल तुह्माला कांहीं वाटेल; परंतु, त्यांच्या येथें मी पूर्वी नौकरीस होतें. पण कांहीं गोष्टी घडल्यामुळें त्यांच्या येथून मी निघालें; आणि त्या गोष्टींविषयीं जास्त खुलासा करणें जरी ह्या वेळीं नीट नाहीं, तरी त्यांच्या वाड्यांत मी पुनः पाऊलही ठेवणार नाहीं, एवढें मात्र खरें आहे."

वुडफाल—तर मग फास्टरताई, मजवर तुमच्यानें विश्वास टाकवेल काय? जगाचा तुह्माला इतका का वाईट अनुभव आला आहे, कीं परक्याच्या येथें पाऊल टाकण्याचें तुह्माला धैर्य होणार नाहीं?

रोज—वुडफालसाहेब, तुमचा हा उदारपणा पाहून माझ्या मनाचा काय ग्रह झाला आहे हें तुह्मास न कळवितां, तुह्माला विनाकारण गोंधळांत पाडण्याचें पातक माझ्या हातून क्षणभरही होणार नाहीं. छिः, मला तुमच्याविषयीं काय वाटतें हें तुह्माला तावडतोब सांगितलेंच पाहिजे, आणि तें मी सांगतें तुमचें हें औदार्य पाहून तुमचें मन फारच मोठें आहे आणि तुह्मी थोर अब्रूचे गृहस्थ आहांत अशी माझी पक्की खात्री झाली आहे. तुमच्यावर माझा

पूर्ण विश्वास बसला आहे. आणि आपण दोघेही ह्या जगांत अगदीं पोरके—अगदी एकटे—आहोंत; तरी त्या स्थितींतील मंडळींचें जिणें किती दुःखाचें असतें हें आपण दोघेही पक्कें ओळखून आहोंत. आणि ह्या दुःखांत आणखीही भर पडावी अशी कल्पनासुद्धां आपल्या मनांत येणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

बुडफाल—अशी कुकल्पना माझ्या मनांत देवा एक क्षणभरही येऊं देऊं नकोस! फास्टरताई, मजवर विश्वास ठेवण्यास तुह्मी सिद्ध आहांत असें तुह्मीं सांगितलें; आणि हे तुमचे मजवर फारच उपकार आहेत. माझा आश्रय करण्यास तुह्माला काडीचीही शंका वाटत नाहीं, तर मीही तुह्माला सांगतों कीं एकादा भाऊ आपल्या सुशील बहिणीवर जसें प्रेम करतो, तसेंच मीही तुह्मावर करीन; आणि तो तिला जितका जपतो तितकाच मीही तुह्माला जपेन. मी आपला गरीब—चित्रें काढणाराच आहें; पण आलीकडे लार्ड आणि लेडी बेसबरो ह्यांची मजवर विशेष कृपा झाल्यामुळें थोरथोर सरदारांत माझी चांगली ओळख झाली आहे, आणि माझा धंदा विशेष जोरानें चालण्याची मला फार आशा आहे. ह्या सर्व सरदार मंडळींत बेलन्डनच्या मार्चिआनेस साहेबांची ओळख झाल्याचा तर मला फारच आनंद वाटतो. त्या थोर आणि उदार अंतःकरणाच्या बाईचें नांव तुह्मीं कधीं ऐकलें आहे काय!"

रोज—होय, ऐकलें आहे मीं त्याचें नाव. आमचें पूर्वी घर होतें, तेथून जवळच त्यांचा वाडा होता; आणि माझ्या आईनें व बापानें नेहमीं त्यांच्या थोर गुणांबद्दल वाखाणणी करावी. माझे बाबा ह्मणत "ह्या बाईसाहिबांना ह्यांच्या बड्या पदवीपासून कांहींही मोठेपणा प्राप्त झाला नसून, उलट ह्या अशा थोर पदवीच्या मंडळींत त्या आहेत, ह्यामुळें त्या सान्या वर्गाला विशेष शोभा आली आहे.

बुडफाल—तुमच्या आईबापांनीं त्यांची योग्य परिक्षा केली होती. पण त्या बाईसाहिबांच्या वाड्यांत रहावयास येण्यास तुमची कबुली आहे का? मात्र मजबद्दल भलतीसलती शंका घेऊं नका.

त्याजकडे थोड्या साशंक मुद्रेनें प्रथम पाहून, आपली तो उगीच थट्टा करीत असला तर त्याची निर्भर्त्सना करण्याची आपली तयारी असल्याचें तिनें प्रथम दाखविलें; पण लागलींच ह्या आपल्या शंका आवरून रोज ह्मणाली: "बुडफाल, मला क्षमा करा. माझ्या उपयोगी पडण्याची तुह्माला विशेष उत्कंठा असल्यामुळें न घडण्यासारख्या गोष्टीही घडविण्यास तुह्मी तयार व्हाल, अथवा तुमच्यासारखींच सर्वांचीं अंतःकरणें उदार आहेत अशी तुमची खोटीच समजूत झाली असेल असें मला वाटलें खरें."

आपण ह्मणतों त्याप्रमाणें खास घडेल अशी खात्री असल्याच्या स्वरानें बुडफाल ह्मणाला: "बेलन्डनच्या बाईसाहेब खऱ्या उत्साहानें तुमचें स्वागत करतील. तमच्यावर हीं अशीं मंडळी

असें त्यांना कळलें ह्मणजे तेवढ्यानेंच तुमच्यावर त्यांचें प्रेम जडेल; आणि तुमचें नांव जरी मला आजच कळलें आहे, तरी तुमची सारी हकीकत ह्यापूर्वीच मीं त्यांना कळविली आहे.

त्यास वाईट वाटेल अशा मार्मिक मुद्रेनें पुनः त्याजकडे पाहून रोज ह्मणाली: "मजविषयीं तुम्ही त्यांजजवळ पूर्वींच बोलला आहांत ?"

किंचित् त्रासून व थोडें रागावून वडफाल ह्मणाला: "पुनः तुह्मी मजविषयीं व्यर्थ शंका घेत आहांत. तरी पण हें स्वाभाविकच आहे. मी परका मनुष्य आहें."

आपल्याशीं खऱ्या स्नेहानें व निरपेक्षबुद्धीनें वागत असता आपण पुनः त्याजविषयीं व्यर्थ शंका घेतल्याबद्दल रोजला पुनः वाईट वाटून ती ह्मणाली: "वडफालसाहेब, मला क्षमा करा. मला पुनः विनाकारण शंका आली. अथवा शंका नव्हती ती. आश्चर्य आणि चमत्कार ह्याच विकारांचा तो परिणाम होता."

इतकें बोलून तिनें पुढें केलेला हात मोठ्या प्रेमानें आपल्या हातांत धरून वडफाल ह्मणाला: "तुमच्याविषयीं मी त्या बाईसाहेबांजवळ बोललों ह्याचें तुह्माला नवल वाटलें ना ? पण तुमची आणि माझी हेसबरोच्या वाड्यांत पहिल्यानें गांठ पडली तेव्हांपासून तुमची मूर्ति माझ्या अंतःकरणांत वास करीत आहे हें मीं तुह्मास मघांच सांगितलें नाहीं काय ? मग ज्या बाईसाहेब मजवर लोभ करीत असून, माझ्या हितार्थ रात्रंदिवस झटत आहेत त्याजजवळ मीं तुह्माविषयीं सांगितलें तर त्यांत नवल तें कोणतें ? पण तुमच्याविषयीं माझें मत असें अनुकूल कां झालें इत्यादि गोष्टींबद्दल आपण पुढें केव्हां तरी बोलूं. आतां वेळ बरीच झाली आहे. हे पहा, माझ्या घड्याळावर सात वाजले आहेत; आणि ह्या जागीं—जेथें तुम्हाला इतका त्रास सोसावा लागला तेथें—अधिक वेळ बसण्याची तुह्माला मोठीशी हौस वाटत असेल असें नाहीं. तर चला आपण जाऊं."

ह्या बोलण्यावर रोजनें तावडतोब उत्तर दिलें नाहीं. तिनें कपाळाला हात लावून आपली एकंदर स्थिति कशी आहे हें मनांत आणलें. ब्रेसबाईच्या दुकानीं पुनः पाऊलही टाकावयाचें नाहीं असा तिचा सकल्प झाला होता. तिजपासून मेहेरबानीदाखल कांहीं रक्कम घेणें ह्मणजे आपलें बिऱ्हाड असेल तेथें तिला येण्याची परवानगी देणेंच होय असें तिनें ओळखून, तीही गोष्ट करण्याचें तिच्या मनांत येईना. पूर्वीच विचार न करितां तिचा आश्रय घेतल्यानें आपल्या सर्वस्वाचा नाश होण्याची वेळ आली होती, आणि मेगिलस व मेलमाथ ह्यांनीं उपकार केल्यामुळेंच आपण सुटलों ह्याची तिला आठवण होऊन, तिचा पुनः संबंधही नको, असा तिचा निश्चय झाला. मेगिलसच्या घरीं जावें तर तो अविचार होईल. व मेलमाथवर पुनः आपलें ओझें क्षणभर सुद्धां पडूं देण्याचें तिच्या मनांतही येईना. तसेंच, ह्यांची काय स्थिति होती ह्याचीही तिला माहिती नव्हती.

ह्याप्रमाणें इतर कोठेंही आश्रय नस-ल्यामुळें हल्लींच्या ऐन अडचणीच्या वेळीं ईश्वरानेंच हा आपणास मित्र पाठविला आहे, असें वाटून रोजनें त्याच्या येथें जाण्याचा विचार ठरविला व त्याच्या येथें आपणास कांहींही धक्का न लागतां स्वस्थ राहतां येईल अशी तिला आशा वाटली.

**बुडफाल**—देवा देवा! फास्टरबाई, तुह्माला अद्यापि मजविषयीं शंकाच वाटते ना? मजवर तुमचा अद्यापिही विश्वास बसत नाहीं? तुमच्याविषयीं मला इतकी काळजी न वाटती—तुमच्याविषयीं माझे विचार इतके पवित्र नसते—तर मोठ्या दुःखानें तुह्मास सलाम ठोकून मीं तुमची तावडतोब रजा घेतली असती!

**रोज**—अरेरे! तुह्मी मजशीं इतक्या उदार अंतःकरणानें वागत असतां तुम-च्या मनाला दुःख व्हावें अशी वागणूक मजकडून किती तरी घडत आहे! पण मी अगदीं पोरकी आहें, आणि 'मला दुसरें कोणी मित्रही नाहीं; तेव्हां तुमचें ह्मणणें मला कबूल केलेंच पाहिजे.

**बुडफाल**—कशाला तर तुह्मी माझें ह्म-णणें कबूल? ठीक आहे. ह्या ह्या बाई-साहेबांचा निरोप. **वेलम्बन**च्या बाईसा-हेब तुह्माला आपल्या मुलीप्रमाणें किंवा बहिणीप्रमाणें वागवितील अशी माझी पक्की खात्री आहे.

**रोज**—आतां फक्त एक शब्द तुह्माला सांगावयाचा आहे. आपण कोठें जाणार ह्याबद्दलची बातमी ग्रेसबाईला कळूं द्याव-याची नाहीं ... ... ... ... —आपली चांगली ओळख झाली ह्मणजे मी कळवीन.

**बुडफाल**—तुमची इच्छा असेल त्या-अर्थी जास्त विश्वास मजवर ठेवा असें मी कधींही ह्मणणार नाहीं. मीं जो तुमच्याशीं स्नेहभावानें वागत आहें त्या-जबद्दल कोणात्यही प्रकारची तुमच्याकडून फेड व्हावी किंवा स्वतःला हक्क अथवा अधिकार प्राप्त करून घ्यावा असें माझ्या मनांत बिलकूल नाहीं. भावाची बहिणीवर ज्या प्रकारची प्रीति असते, त्याच प्रकारचें हें प्रेम आहे, एवढें लक्षांत ठेवा ह्मणजे झालें.

त्याच्या भाषणांतील आणि वाग-णुकींतील मर्यादा, प्रौढता वगैरे गुण पाहून रोजला फारच संतोष होऊन ती ह्मणाली: " आणि मी तरी तसेंच सम-जत असून, तशाच बेतानें तुमच्याशीं वागणार आहें. "

---

## भाग १२८.

### ग्रेसबाई आणि पिटर ग्रन्ले.

मागील भागांत कळविलेला संवाद ज्या खोलींत चालला होता ती चांगलीच मोठी असल्या कारणानें त्यांतील एका शब्दही, ग्रेसबाई व **पिटर ग्रन्ले** खिडकींत बोलत उभे होते, तेथें त्यांना ऐकूं आला नाहीं. असो. ह्या जोडींत काय भाषण चाललें होतें तें आपणास समजून घेतलें पाहिजे.

**पिटर**—बाईसाहेब, ह्या कामाचा शेवट

खास वाईट वाटणार नाहीं. पण हल्लींच्या कामांत मला माझी करामत मुळींच दाखवावी लागली नाहीं, किंवा कांहीं लबाडी करावी लागली नाहीं. सर्व काम वाजवी वाजवी रीतीनेंच चाललें होतें.

ब्रेसबाई—ह्या कामाचा असा शेवट झाला ह्याचा तर मला फारच संतोष वाटत आहे. पण तुम्ही हें जें शेवटीं बोललां त्याचा अर्थ तरी काय ? मला ह्या तुमच्या बोलण्याचें फारच नवल वाटतें!

पिटर—बाईसाहेब, ईडन साहेब जे घोटाळ्यांत सांपडले आहेत ते अगदीं स्वाभाविक रीतीनें सांपडले आहेत. त्यांचें काम बरोबर चाललें होतें त्याला आम्हांकडून रास्त तीच मदत मिळाली, व कोणत्याही प्रकारची आडकाठी घालण्यांत आली नाहीं.

ब्रेसबाई—तुमच्या ह्मणण्याचा अर्थ खरोखर मला कांहींच कळत नाहीं! अहो, आर्थर ईडनवर ही घोरपड यावी ह्मणूनच ना सुरीचें मोडलेलें पात त्याच्या खोलींतून आणण्याची खटपट तुम्ही केली ?

तिच्या बोलण्याचा तिरस्कार वाटून पिटर ग्रम्ले ह्मणाला: “ अशा भानगडी करणारा मनुष्य मी नाहीं. शिवाय, ह्या सुरीस बरोबर लागेल असें मोडकें पात मला कोठून हो सांपडणार ? ”

ब्रेसबाई थोडें हासून ह्मणाली: “बरें बरें, आपण कशा खटपटी करतों हें तुमच्या मनांत सांगावयाचें नसेल तर नका सांगूं. तुम्हाकडून त्याजविषयींची बातमी काढण्याची खटपट मी करणार नाहीं. पतकरलेलें काम तुम्ही उत्तम रीतीनें बजावलें ह्याचा, तुम्हाला काम मागणारांनीं संतोष मानून स्वस्थ बसावें हेंच त्यांना योग्य आहे. तरी पण आपल्या मर्जीप्रमाणें कामाचा शेवट लावण्यासाठीं तुम्ही हिकमती योजतां असांतलें कांहीं तुम्ही एकदा बोलला होतां.

त्या वेळीं त्या खोलींत बरेंच उकडत असल्यामुळें ब्रेसबाईनें आपल्या अंगावरील उंची शाल थोडी एका बाजूला केली होती. तेव्हां अर्थातच तिचे पुष्ट उरोज किंचित् उघडे पडले होते. त्यांजकडे सारखी दृष्टि लावून व तिजशीं हळू हळू बोलण्यासाठीं किंचित् खालीं वाकून पिटर ह्मणाला: “ तर मग दुपारच्या एकंदर चवकशीचा खरा अर्थच तुम्हाला समजला नाहीं. अशा हिकमती प्रत्येक शहाणा मनुष्य करतो. रोजकडून हा गुन्हा झाला नाहीं असें मला खात्रीनें वाटत होतें, आणि शार्पलेच तिचा खटला नीट चालवील असें मला पक्कें ठाऊक होतें. पहिल्यापहिल्यानें जरी हा खटला रोजबाईवर शेकेल असें वाटूं लागलें होतें तरी खून करणारी बाई उत्तरेकडे गेली, आणि ह्या ताई दक्षिणेकडे सांपडल्या आहेत असें बाहेर पडलें तेव्हांच सारा रंग पालटला. तेव्हां ईडननें उगीच कांहीं तरी खोटेंच सांगितलें असावें अशी कल्पना सहजच शार्पलेच्या मनांत आली. इतक्यांत सुरीच्या मुठीवरील अक्षरेंही त्याच्या दृष्टीस पडलीं; आणि ब्यारिस्टरानें लागलींच

खटला तहकूब ठेवून ईटनच्या खोलीचा झाडा घ्यावयास मला वेळ देवविला. ह्या झाड्यांत मला कांहीं सांपडलें नव्हतें, तरी त्याच्या पेटीच्या खणांत कपड्याच्या घडीखालीं तें पात आह्माला सांपडलें. तरी पण खरा गुन्हेगार कोण असावा ह्याची बरोबर कल्पना करणें ह्यांतच आमची अब्रू आहे. आमचा आजमास चुकणें हें आह्मास चांगलें नाहीं. तथापि ईटननेंच हा गुन्हा केला असावा कीं नाहीं, असें मला कोणीं विचारलें तर त्याचें उत्तर मी चटकन् देणार नाहीं. तथापि आपण निर्दोष असल्याबद्दलची जुरीची खात्री करून देण्याचें ईटनला बरेंच जड जाईल. मात्र पंचांनीं त्याला दोषी ठरविलें तरी त्याचें नशीब शिकदर असल्या कारणानें तो फाशीं जाणार नाहीं. ''

ब्रेस—तर मग वेगळ्याच मनुष्यानें हा खून केला असावा असेंच तुह्माला वाटत असून, त्याच्या त्या अपराधाबद्दल त्याला कांहींही शिक्षा होणार नाहीं, असाच तुमचा तर्क आहे.

पिटर—माझ्या बोलण्याचें एकंदर तात्पर्य हेंच. पण पुराव्याच्या कामांत आमची कांहीं सुद्धां लबाडी नाहीं अशी आतां तुमची खात्री झालीच असेल. हें पहा, एकाद्याकडून गुन्हा झाला असतांही त्याला सोडविण्यासाठीं जरी मी वेळेस पाहिजे त्या खटपटी करीत असतों, तरी भलत्याच्याच डोक्यावर गुन्ह्याची तोहोमत घालून त्याला शिक्षा ठोठावण्याचा पाजीपणा मी करीत नाहीं. ह्या फारेस्टबाईच्या खटल्यांत आपण कांहीं एक न करीतां काय काय होतें तें पहावें असा माझा बेत होता आणि पुढें जर त्या बाईवर हा घोरपड शेकतेच असें मला वाटलें असतें तर मग आपल्या खटपटी सुरू करण्याचा माझा इरादा होता. पण तिजकडे कांहीं सुद्धां दोष नाहीं असें पुढें आपोआपच बाहेर पडलें, आणि मला कांहींही करावें लागलें नाहीं हें झालें ह्या खटल्याच्या संबंधानें पण दुसऱ्याच्या—ह्मणजे क्यारोलाईन बाल्टरच्या—संबंधानें आतां तुह्मास सांगितलें पाहिजे. तिला सोडवीन असें मीं तुह्मास वचन दिलें आहे; आणि हें माझें वचन मीं पुरें केलें तर मला आणखी पांचशें पौंड बक्षिस देण्याची तुमची कबुली आहेना? तशी कबुली असेल तर माझें काम झालेंच असें समजा. आणि माझ्या खिशांत पिवळें धमक सोनें उद्यां रात्रीं टाकण्याची तयारी ठेवा. तरी पण ह्या खटल्यांतील पुरावा फारच भक्कम आहे, आणि क्यारोलाईनला सोडविण्याचें काम साध्या व सरळ रीतीनें होणार नाहीं.

ब्रेस—तुह्मीं काय खटपटी केल्या आणि तिला कसें सोडविलें ह्याची मी चवकशी सुद्धां करणार नाहीं. ती सुटली ह्मणजे झालें. पण आजच तिची चवकशी कां झाली नाहीं?

पिटर—आज ———

बाड्यांत आपलें बोलणें झाल्यावर मी न्यायाधीशाकडे निरोप पाठवून, उद्यांपर्यंत मला पुरी चवकशी करावयास वेळ मिळाला पाहिजे असें कळविलें; आणि बाहेरून तर तिजवर आपण हा गुन्हा शेकविणार असा भाव दाखविला आहे. तसें केल्यावांचून मला सोयच नाहीं. तथापि ती आपली सुटणार अशी तुह्मी गांठ बांधून ठेवा.

**ब्रेस**–ती सुटल्याबरोबर तिला तुह्मी पन्नास गिनी द्या; आणि ह्या देशांतून पार निघून जावयास सांगा.

**पिटर**–मी तिला ती रकम देऊन, शिवाय वेष पालटण्यासाठीं अवश्य लागणाऱ्या जिनसाही देईन. मी अर्धी अर्धी कामें करणारा मनुष्य नाहीं. पण बाईसाहेब, तुह्मी ह्या आजच्या पोरीची पुढें व्यवस्था कशी लावणार? तो तरुण गृहस्थ तर तिजवर खूपच खूष झाला आहे असें दिसतें. पहा तो तिजकडे कसा पहात आहे आणि बोलत आहे. मला वाटतें तो तिच्याशीं लग्न लावण्याची गोष्ट काढीत आहे.

**ब्रेस**–तिची मर्जी असेल तिकडे तिला जाऊं देण्यास मी हरकत करणार नाहीं असें कबूल केलेंच आहे, आणि त्याप्रमाणेंच मी वागणार आहें. तेव्हां ह्या गृहस्थानें तिच्याशीं लग्न लावण्याचा निश्चय करून तिला आपल्याबरोबर नेलेंच तर त्याचा मला संतोषच वाटेल. मग मला आपल्या निढळच्या घामानें मिळविलेल्या पैशांतून कांहीं पैसे तिला देऊन तिची पुढील व्यवस्था लावण्याची जरूर पडणार नाहीं.

**पिटर**–ठीक आहे बाईसाहेब, घेतों मी आपला निरोप. उद्यां रात्रीं दहा आणि अकरा वाजण्याच्या दरम्यान तुह्मी एकट्या असाल तर मी तुह्माला येऊन भेटेन, आणि **क्यारोलाईन वाल्टर** सुटल्याची खबर कळवीन.

**ब्रेस**–व आपले पांचशें पौंडही खिशांत टाकाल!–ठीक आहे, मोठ्या आनंदानें मी तुमची वाट पहात बसेन.

**ग्रम्लेनें** तिजकडे सकाम दृष्टीनें पाहिलें, आणि त्यांचें जरी थोडाच वेळ भाषण झालें, तरी तेवढ्यांत सुद्धां तिनें आपलें मन अगदीं वश करून टाकलें असें त्या पाहण्याच्या तऱ्हेवरून दर्शविलें. या तसल्या हेंगाड्या, हिडिस आणि आगडबंब पुरुषालाही आपण चटका लावून दिला ह्याचें **ब्रेस**बाईलाही कौतुक वाटून, ती हळूच मोठ्या खुबीनें हांसली. तरी पण तो मोठ्या सरदार घराण्यांतील सुरेख तरुण गृहस्थ नसतांही असा सकाम दृष्टीनें आपणाकडे पहात आहे ह्याचा तिला थोडा रागही आला. मात्र आपण रागावलों आहोंत असें दाखविण्याची त्या वेळीं तिची छाती नसून, त्याची त्याबद्दल थोडी थट्टा करण्याशिवाय तिला दुसरी गतिच नव्हती.

मोठा सुस्कारा टाकून **पिटर ग्रम्ले** तेथून निघून गेला. जातांना त्यानें धाडकन् दार लावलें. तें ऐकून **रोज फास्टर** व **जार्ज बुडफाल** हीं दोघेंही दचकलीं.

आणि लागलींच त्यांनीं आपलें भाषण बंद केलें.

**ग्रम्ले** गेल्यावर **ब्रेस**बाई **रोज**जवळ आली, आणि मोठें वात्सल्य दाखवून तिनें तिला विचारलें: "कसें काय? माझ्या आवडते मुली, तुझा पुढचा कसा काय विचार ठरला आहे? आणि तुझ्या उपयोगीं पडण्यासाठीं मीं काय केलें पाहिजे?"

मन यत्किंचितही अस्वस्थ न होऊं देतां, **रोज** मोठ्या शांतपणानें ह्मणाली: "बाईसाहेब, ह्या गृहस्थाचें नांव **वुड-फाल** असें आहे. ह्यांनीं मोठ्या मेहेरबा-नीनें मला आपल्या ओळखीच्या एका बाईच्या येथें नेऊन ठेवण्याचें कबूल केलें आहे."

पुढें कसें वागावें ह्याविषयीं तिचा कांहीं तरी पक्का निश्चय ठरला आहे असें ओळखून, आणि आपण कोणाच्या येथें रहावयास जाणार, व तो वाडा कोठें आहे वगैरे कांहीं एक तिनें सांगि-तलें नाहीं हें पाहून, **ब्रेस**बाईला थोडा राग आला. तरी तिनें तो लागलींच आवरून ह्मटलें: "मुली, तूं पुढें काय करणार हें विचारण्याचा मला हक्क नाहीं हें खरें; तरी, आज तुजवर जीं नसतीं संकटें आलीं त्यांचा शेवट गोड होऊन आतां तुला बरे दिवस येण्याचा रंग दि-सत आहे, ह्याचा मला संतोष वाटतो."

"येतें तर आतां मी बाईसाहेब." असें ह्मणून **रोज**नें तिचा निरोप घे-ण्यासाठीं आपला हात पुढें केला.

**ब्रेस**बाईनें तिचें चुंबन घेऊन ह्मटलें: "झालेल्या गोष्टी कृपा करून विसरू-न जा."

**रोज**—होय, तसें करण्याविषयीं मीं तुह्मास वचन दिलेंच आहे— आणि तें मी विसणार नाहीं.

ह्याप्रमाणें बोलणीं झाल्यावर **ब्रेस**-बाई निघून गेली; आणि **रोज फास्टर** व **जार्ज वुडफाल** अशीं दोघेजण एका भाड्याच्या गाडींत बसून **वेलन्डन**च्या कौन्टेसच्या वाड्याकडे निघालीं. **रोज** गाडींत बसत असतां तिला पाहण्यास लोकांची मोठी गर्दी झाली, व सर्वांनीं तिचा मोठा जयजयकार केला. लवकरच हीं त्या वाड्यांत जाऊन पोहोंचलीं. ह्याच सुमारास **ईटन** हा तुरुंगांत जाऊन पोहोंचला.

---

## भाग १२९.

### क्यारोलाईन वाल्टर.

मागील भागांत घडलेल्या गोष्टींनंतर दुसऱ्या दिवशीं दुपारीं साडेबारा वाजून गेल्यावर पांचसात मिनिटांनीं **हार्समांगर** गल्लींतील तुरुंगाच्या जवळ एक गाडी उभी राहिली; आणि तिज-मधून **पिटर ग्रम्ले** व **माऊन** हे उतरले. तुरुंगाच्या दरवाजावरील पहारेवाल्यानें चालीप्रमाणें त्यांना हासून सलाम के-ल्यावर "**क्यारोलाईन वाल्टर**ला ने-ण्याकरितांच आपण आलां ना?" असें विचारलें. त्यांनीं होय ह्मणून उत्तर देऊन "ती तुरुंगांत कशी काय वा-गली" असा उलट प्रश्न केला. "**ती**

कोणाशींच फारशी कोलली नाहीं, व अगदीं ताव्यांतच होती" असें त्यानें उत्तर दिलें. आणि ह्मणालाः "ती मोठी देखणी–फारच देखणी पोर आहे खरी. पण एखादे वेळीं ती अशी कावरी-बावरी पडते कीं, तिच्या डोक्यांत जसें कांहीं भूतच शिरलें आहे! तिचे डोळे पाहिले तेव्हां मला असें वाटलें कीं, जर कोणी हिच्या जवळ आलें तर ही त्याचा खून केल्याशिवाय खास राहणार नाहीं. ती कालच्या साऱ्या दिवसांत कोणाशीं कांहीं बोलली नाहीं. तुरुंगावरील बाईनें तिच्याशीं बोलण्याची पुष्कळ खटपट केली; पण ती एक शब्दसुद्धां बोलली नाहीं. तेव्हां कोणाशीं कांहीं एक न बोलतां जें होईल तें होऊं द्यावें असा तिनें बेत केल्याचें दिसतें."

**पिटर**—तर मग तिची हौस लवकरच फिटेल. पक्क्या चवकशीकरितां तिचा खटला सेशनांत तर खास जाईल.. ति-जवर पुरावा कसा भक्कम आहे.

ह्याप्रमाणें ह्यांचीं भाषणें होत आहेत तों, **क्यारोलाईन वाल्टर**ला तिच्या कोठडींतून आणून **ग्रस्ले** व **मारज** ह्यांच्या ताब्यांत दिलें. त्यांनीं तिला गाडींत घालून म्याजिस्ट्रेटच्या कचेरीकडे नेलें.

**क्यारोलाईन** अगदीं निस्तेज झाली होती. तिचे डोळे कावरेबावरे झाले होते, व तिनें ओठ गच्च आवळून धरले होते. आणि ह्या एकंदर प्रकारांवरून स्वतःच्या संबंधानें तिचा कांहीं तरी पक्का निश्चय ठरला असून, तिचा कोणावर तरी अतोनात राग झालेला आहे असें स्पष्ट दिसत होतें.

गाडी चालू लागल्यावर **ग्रस्ले**नें आपल्या बाजूची खिडकी लावली, आणि **मारज**नेंही तसेंच केल्यावर **ग्रस्ले** ह्मणालाः "**वाल्टर**ताई, आपण लवकरच पोलिसकचेरींत जाऊन पोहोंचूं. तेव्हां बोलावयाला आपणांस कांहीं फारसा वेळ नाहीं. ह्यासाठीं मी काय सांगतों तें ऐका. तुमचा खटला फार वाईट आहे. तुमच्यावर भक्कम पुरावा आहे; आणि तुमची पक्की चवकशी होण्यासाठीं हा खटला सेशनांत पाठविल्याशिवाय राहणार नाहींत. तो इकडून तिकडे गेला कीं, तुम्हावर आरोप शाबीत झाला असेंच समजा; आणि तसें झालें कीं, तुम्हाला फाशीची शिक्षा देण्यात येईल."

**क्यारोलाईन**—काय काय पुरावा येणार आणि त्याचें वजन किती पडेल ह्या सर्व गोष्टी मीं ओळखून ठेवल्या असून, काय जी शिक्षा होईल ती भोगण्यास माझी तयारी आहे. पण ब्रेसबाईसारख्या जहांबाज मालकिणीच्या हाताखालीं जो बडा कुंटणखाना आज बरींच वर्षें चालला आहे, आणि ज्याजमुळें **लिडले**बाईला चांगलेंच काम सारखें मिळत गेलें होतें, त्यांतलीं सारीं कृत्यें उघडकीस आणण्याची मला भरपूर संधि मिळणार आहे, ह्याचा मात्र मला संतोष वाटत आहे. तसेंच, ज्या चांडाळानें पहिल्यानें मला गोड गोड थापा मारून माझें पाऊल वाकडें पाडलें आणि मग माझाच गळा कापला, त्याचेंही नांव न्यायाधीशासमक्ष मी सर्वांस

कळतील. तात्पर्य, माझ्या एकट्याच्या तोंडाला मी काळोखी लावून घेणार नाहीं. आपल्याबरोबर मी दुसऱ्यांचींही नांवें बाहेर काढून, सर्वांच्या तोंडाला चांगलें काळें फासवीन, आणि त्यांची लोकांत छी थू करवीन!

**पिटर**—वाल्टरताई, हा आपला बेत सोडून द्या, आणि वेगळ्याच मार्गानें जाण्याचा हेतु धरा. पहा, तुमची मर्जी असेल तर हल्लींच्या अडचणींतून मी तुम्हास सोडवीन—तुमच्या गळ्याभोंवतालचा फास चुकवीन.

"काय? मला सोडवाल? माझा फास चुकवाल?" **क्यारोलाईन**ला नवीन आशा उत्पन्न होऊन ती ह्मणाली.

**पिटर**—होय, चुकवीन तुमचा फास—मग तुह्मी निरपराधी असा कीं अपराधी असा. तुमच्या विरुद्ध भक्कम पुरावा गोळा केला आहे, असें तुमच्या नजरेस येईल. पण सरकारी हुद्द्याच्या नात्यानें जरी मी ह्याप्रमाणें आपलें काम चोख बजावतों, तरी माझ्या मनांत आल्यास कोणावर दया करून त्याजशीं स्नेहभावानें वागण्यास मी मोकळाच आहें. आणि तुमची माझी जरी बिलकुल ओळख नाहीं, तरी माझ्याकडून होईल तेवढें करून तुमची सुटका करविण्याबद्दल मला **ब्रेस**बाईनें सांगितलें आहे.

अत्यंत तिरस्काराच्या स्वरानें **क्यारोलाईन** ह्मणाली: "ब्रेसबाईनें सांगितलें! हं, समजलें मी. आपलीं काळीं कृत्यें बाहेर पडण्याचा तिला धाक वाटत आहे, आणि तेवढ्यासाठीं माझ्याशीं एवढी लाडीगोडी ती लावीत आहे."

**पिटर**—हें पहा, वाल्टरताई, **ब्रेस**बाईचीं कारणें कांहींही असोत—तुमचा खटला त्यांनीं हातीं धरला आहे, आणि तुमच्यासाठीं खर्च करण्याचा त्यांचा पूर्ण हेतु आहे. तुमचा खटला मांडण्यासाठीं **शार्पले**साहेबांना आह्मी ठरवून ठेवलें आहे; आणि होईल तें होवो, तुह्माला वांचवावें असा माझा निश्चय झाला आहे. पण हे आमचे हेतु सिद्धीस जावयास तुमची अनुकूलता पाहिजे, मी सांगेन तसें तुह्मीं वागलें पाहिजे, आणि दाखवीन त्या मार्गानें गेलें पाहिजे.

जीव वांचण्याची आशा उत्पन्न होऊन नव्हे, पण आपण वांचल्यास आपला सूडही चांगलाच उगवावयास सांपडेल असें वाटून, **क्यारोलाईन** मोठ्या उत्कंठेनें ह्मणाली: "मला वांचविण्याचें जर तुह्मी वचन देत असाल तर तुमच्या सांगण्याबाहेर मी काडीभर सुद्धां जाणार नाहीं. जसें तुह्मी सांगाल तसें वागेन, आणि जी वाट दाखवाल तिच्याबाहेर पाऊलही टाकणार नाहीं."

**पिटर**—तर मग ऐका ताई. पहिल्यानें ह्या माझ्या दुय्यमाची साक्ष होईल; आणि तो देतांना तुमच्याविरुद्ध जेवढें ह्मणून सांगतां येईल तेवढें तो सांगेल. त्यांतून एक शब्दही तो गाळणार नाहीं. पण ह्याबद्दल तुह्माला अगदीं सुद्धां नवल वाटूं देऊं नका. तो आमचा धंदाच आहे, आणि आह्मांला तसें केलेंच पाहिजे. आह्मीं थोडी जरी कसूर केली तरी आह्मांवर [illegible]

सोडविण्याचा आमचा पहिल्यापासू-नच इरादा होता, असें सर्वांना वाटेल. पण तसें होणें ठीक नाहीं. ह्यासाठीं आम्ही तुमच्या पुरे पुरे वि-रुद्ध आहोंत असें दाखवूं, आणि तुम्ही सुटलां तरी ती गोष्ट आमच्या चुकीमुळें झाली नाहीं असें सर्वांस ह्मणावयास लावूं. तरी पण आज रात्रीं नऊ वाजले नाहींत तोंच तुझी सुटका झाल्याचें तुझ्या नजरेस येईल. आणि माझ्या-सारख्या कोंवळ्या मनाच्या मनुष्याच्या हातीं तुझा खटला चालविण्याचें काम आलें ह्याबद्दल तुला आनंद वाटून तूं देवाचे उपकार मानशील. पण ह्या-प्रमाणें घडून येण्यासाठीं तूं मात्र मी सांगतों तसें कर. आमच्या बाजूनें आह्मी पुरावा भक्कम करूं, आणि तुजवर आरोपाची पुरी शाबिती होत आहे असेंच दाखवूं. ह्याप्रमाणें आह्मांकडून झालें ह्मणजे न्यायाधीश तुला तुझें ह्मणणें काय आहे असें विचारील. त्यानें तसें विचारलें कीं, "मी सर्वथैव निर-पराधी आहें, आणि मला कांहींही मा-हीत नाहीं." असें तूं जोरानें व स्पष्टपणें बोल. आणि ह्याप्रमाणें बोल-ल्याशिवाय सोय नाहीं. तूं तसें ह्मटलेंस म्हणजे, "तुझा काय पुरावा आहे?" असें न्यायाधीश साहेब तुला विचारतील; आणि त्यांनीं तसें विचारलें कीं, माझे पुढले बेत काय आहेत ते तुझ्या ब्या-रिस्टराना ठाऊक नसल्या कारणानें, आ-पली बाजू काय आहे ती लागलींच न सांगण्याबद्दल तुला ते शिफारस कर-तील. पण त्यांनीं तशी शिफारस केली तरी तूं तो ऐकूं नकोस. तूं धीटपणें बोल; आणि "ज्या घरांत खून झाला आहे तेथपर्यंत जाण्याची परवानगी मि-ळाल्यास आपण अगदीं निर्दोष अस-ल्याबद्दल सर्वांची उत्तम रीतीनें खात्री करून देण्यास ठीक पडेल" असें सांग. पण धीटपणानें आणि निश्च-याच्या स्वरानें आपण अगदीं निर्दोष आहोंत असा भाव दाखवून ह्याप्रमाणें तूं बोलशील का?

**क्यारोलाईन**—बोलेन मी ह्याप्रमाणें-आणि खरोखरच मजकडे कांहीं सुद्धां दोष नाहीं. पण पुढें मी काय करूं?

**पिटर**—त्याची तुला कांहींच पंचाईत नको. पुढली व्यवस्था मी ठेवीन. मात्र, तुला खात्रीनें एवढें सांगतों कीं, आज रात्रीं तुला तुरुंगांत निजावें ला-गणार नाहीं. आणि तूं सुटलीस कीं, तुला लागलींच पन्नास गिनी द्यावयास ब्रेसबाईनें सांगितलें आहे. त्या बाई-साहेब तुझी फारच काळजी वाहतात. तूं कचेरींत, खून झालेल्या लिंडले-बाईचा किंवा ब्रेसबाईसाहेबांचा अगर तुला ज्यानें फसविलें त्याचा सूड घेण्या-साठीं तरमळत आहेस, वगैरे एक अक्षर-सुद्धां बोलूं नकोस. तसें तूं बोललीस तर तुझें ह्मणणें न्यायाधीश कबूल कर-णार नाहीं, आणि सारी खटपट वाया जाईल. समजलीस? आहो! हे आपण कचेरीच्या दरवाजापाशीं येऊन पोहोंचलों.

ज्या वेळची आह्मी हकीकत लिहीत आहों त्या वेळीं राजधानीच्या कोणत्याही

भागांत वेगळी अशी म्याजिस्ट्रेटची कचेरी नव्हती. न्यायाधिशाच्या घरींच आरोपीला न्यावें लागत असे; व या संप्रदायाप्रमाणें **क्यारोलाईन वाल्टर**लाही एका न्यायाधिशाच्या घरींच चवकशीसाठीं नेलें. ह्यानें आपल्या घरीं कचेरीचा सर्व थाट केलेला होता; आणि येथील कचेरीच्या दिवाणखान्यांतही लोकांची अतोनात गर्दी जमली होती.

एक वाजल्याबरोबर चवकशीस प्रारंभ झाला. **शार्पले**साहेब आपल्या जागीं बसले होते, आणि **क्यारोलाईन** अगदींसुद्धां न डगमगतां स्थिरपणानें पिंजऱ्याच्या पायऱ्या चढली. ही तिची स्थिरवृत्ति पाहून बहुतेक लोकांना जरी तिच्या हातून गुन्हा घडला असून, ती पटाईत गुन्हेगाराप्रमाणें निर्दोष असल्याचें सोंग दाखवीत आहे असें वाटलें, तरी कांहीं थोड्यांनीं आपलीं डोकीं हळूच हालवून आपली साशंकता व्यक्त केली.

आपल्या ओळखीचे कोणी आले आहेत कीं काय हें पाहण्यासाठीं **क्यारोलाईन**नें झटकन् चोहोंकडे एकदां नजर फेकली. तेव्हां **लिडले**बाईचे दोन नोकर एका बाकावर एका शिपायाशेजारीं बसलेले तिच्या दृष्टीस पडले.

चालीप्रमाणें **क्यारोलाईन**चें नांव, वय व धंदा ह्यांजविषयीं प्रश्न विचारण्यांत आले. ह्याच वेळीं तिच्या बाजूनें काम चालविण्यास हजर असल्याचें **शार्पले**नें कळविलें. नंतर **प्रस्ले**नें **लिडले**बाई- कठड्यांत यावयास सांगितलें. त्याप्रमाणें तिनें पुढें होऊन हकीकत सांगण्यास आरंभ केला. ती ह्मणाली: "मी **लिडले**बाईच्या येथें बारा वर्षें नोकरीस होतें. या सुइणीचें काम करीत; व ज्यांना बाहेर फारसा बोभाटा न होऊं देतां बाळंत होण्याचें आवडत असे त्या त्यांच्या येथें येत. ह्याप्रमाणें हल्लींची आरोपी थोड्या महिन्यांपूर्वीं त्यांच्या येथें बाळंत व्हावयास आली होती. बाळंत होण्याच्या वेळीं तिचा **लिडले**बाईवर फारच राग झाला होता; व त्या वेळीं ज्या डाक्टरास बोलावलें होतें त्यानेंही आरोपीला, सुईणबाईच्या सांगण्याप्रमाणें वागण्याविषयीं व त्यांजशीं न भांडण्याविषयीं पुष्कळ उपदेश केला."

त्या वेळीं **क्यारोलाईन** वर पाहून मध्येंच ह्मणाली: "न्यायाधीशसाहेब, **लिडले**बाईचा एवढा तिरस्कार मला कां वाटत होता आणि त्यांचा संताप कां आला होता, ह्याचीं कारणें आपली परवानगी असेल तर मी आपल्यास कळवितें."

पण न्यायाधिशानें तिला बोलूं दिलें नाहीं. **शार्पले**नें तिजकडे थोड्या रागानें पाहिलें, व **लिडले**बाईचा आपणास राग आला होता असें कबूल केल्यामुळें तिच्यावर खटला शेकण्याचा चांगलाच संभव आहे असें तिला दर्शविलें. तेव्हां ती पुन: खालीं पाहूं लागली.

साक्षीदाराची जबानी पुन: चालू झाली ...

आरोपीचें चांगलेंच भांडण झालें असावें असें वाटतें. कारण, त्यांनीं तिला त्या रात्रीं आणि दुसरा सारा दिवस कोंडून ठेवलें होतें. त्या दिवशीं हिच्या जेवणाचीं दोनही वेळचीं ताटें मीं इच्या खोलींत नेऊन पोहोंचविलीं. ही मोठमोठ्यानें कपाळावर मारून घेत होती; आणि **लिडले**बाईला व ज्यानें हिचें पाऊल वांकडें पाडलें त्याला सारख्या शिव्या देत होती. खून झाला त्या दिवशीं रात्रीं—ह्मणजे परवां रात्रीं—नऊ वाजतां मी हिचें ताट घेऊन इच्या खोलींत गेलें; आणि तें मेजावर ठेवून परत आलें. व येतांना सुईणबाईच्या ताकिदीप्रमाणें मीं खोलीला कुलूप घातलें. पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास सुईणबाईनीं आह्मांस निजायला जावयास सांगून, आपणास कांहीं वेळ काम असल्यामुळें आपण जागत बसणार असें कळविलें. त्यावर मीं पुनः त्यांना जिवंत पाहिलें नाहीं. सवा अकरा वाजून गेल्यावर मी आणि मजशेजारींच निजलेली दुसरी मोलकरीण अशा आह्मी दोघीजणी दचकून जाग्या झालों, आणि कोणी तरी खालच्या मजल्यावरून अगदीं शेवटल्या मजल्यावर घाईघाईनें पळून जात आहे असें आह्मांस वाटलें. आह्मीं दार उघडलें आणि मांजरी मोठमोठ्यानें ओरडत आहे असें आह्मीं ऐकलें. तेव्हां कांहीं तरी दगा आहे अशी आह्माला शंका आली, आणि लागलींच आह्मी जिना उतरून खालीं येऊं लागलों. उघडें असल्याचें आमच्या नजरेस पडलें. तें कसें उघडलें होतें हें आह्मीं न पाहतां तसाच खालीं गेलों. तों **क्यारोलाईन** एकाद्या वेड्यासारखी धावतांना आमच्या दृष्टीस पडली. आह्मांला पाहतांच मोठ्यानें किंकाळी मारून ती बेशुद्ध पडली. माझी सोबतीण तिजजवळ उभी राहिली, आणि मी खालीं माजघरांत गेलें, व पहातें तों माझ्या यजमानीणीचा खून झाला असून, ती रक्तानें न्हालेली आहे. लागलींच मीं ओरडाओरड केली. तेव्हां शिपाई आले, आणि आह्मीं **क्यारोलाईन**ला त्यांच्या ताब्यांत दिलें.''

पुढें दुसऱ्या मोलकरणीची साक्ष घेतली, तेव्हां तिनेंही ह्या पहिलीच्या प्रमाणेंच हकीकत कळविली.

तिसरी साक्ष डाक्टराची झाली. त्यानें **क्यारोलाईन**चा सुईणबाईवर फारच राग झाला असून, ती तिजवर खूपच चरफडत होती असें कळविलें. ह्याच डाक्टरानें प्रेताची तपासणी केली होती; व खून एकाद्या खंजिरानें झाला असावा, आणि जखम काळजापर्यंत झाली असून, सुईणबाईचा प्राण तावडतोब गेला असावा असें त्यानें सांगितलें.

ह्या प्रत्येक साक्षीदाराला **शार्पले**नें उलटसुलट प्रश्न केले. परंतु त्यांच्या पहिल्या सांगण्यांत व ह्या उत्तरांत कांहींच अंतर पडलें नाहीं.

नंतर **माडन**ची जबानी झाली. तो ह्मणाला: '' माझ्या वरिष्ठाच्या हुकमा-

घरीं गेलों. तेथें आरोपी रहात होती त्या खोलीचा मी झाडा घेतला. खोलीचें कुलूप उखळून काढलें असून, मग दरवाजा उघडला असावा असें माझ्या नजरेस आलें. कुलूप आंतल्या अंगानें होतें, व त्याचे सारे स्क्रू काढलेले होते. ”

**माळ**ची ह्याप्रमाणें जबानी झाल्यावर तो कठड्यांतून खालीं उतरला.

**न्यायाधीश**—ह्या खटल्याची चवकशी कालच व्हावयास पाहिजे होती. परंतु पुरावा गोळा करण्यासाठीं पोलीसाला वेळ पाहिजे होता ह्मणून काल काम चाललें नाहीं. असो. आणखी कांहीं पुरावा आहे काय ?

**पिटर**—आरोपीची पक्की चवकशी होण्यासाठीं तिला वरच्या अंमलदाराकडे पाठविण्याइतका पुरावा झाला आहे असें आपणास वाटत असेल.

न्यायाधिशानें स्वतः विचारल्यावरून “ आपणास काय बोलावयाचें तें आपण वरच्या कोर्टांत बोलणार ” असें **शार्पलेनें** कळविलें.

**न्यायाधीश—क्यारोलाईन वाल्टर,** तुझी चवकशी होण्यासाठीं तुझा खटला सेशनांत पाठवूं नये असें सांगावयास तुला कांहीं कारणें आहेत काय ?

आपणाविरुद्ध असा भक्कम पुरावा आणला आहे, तेव्हां **पिटर ग्रस्के**चे विचार कांहीं पालटले आहेत कीं काय हें समजून घेण्यासाठीं **क्यारोलाईननें** हळूच त्याजकडे पाहिलें. पण त्यानेंही तशाच रीतीनें तिजकडे पाहून तिला डोळ्यांनीं खूण केल्यावरून, ती धैर्य धरून ह्मणाली: “ न्यायाधीशसाहेब, हा जो घाणेरडा आरोप मजवर केला आहे तो सर्वथैव खोटा आहे. महाराज, मी अगदीं निर्दोष—सर्वथैव दोषरहित आहें. मला सुईणबाईनें कोंडून ठेवलें होतें हें खरें आहे. पण तिच्या येथें राहण्यास मी नाकबूल असून, मी तेथून निघून जाण्याचा आग्रह करीत होतें, ह्मणून मला त्या ह्मातारीनें कोंडून ठेवलें, आणि माझे कपडे व माझे पैसे तिनें माजघरांत आपल्या कुलपांत ठेवले होते. तिच्या घरांतून निघून जाण्याचा माझा निश्चय झालेला होता, ह्मणून हळूच मीं कुलूप उखळलें; व त्या रात्रीं आपले कपडे व पैसे घेण्यासाठीं माजघरांत चोरून गेलें. पण तेथें बाईचा खून झालेला माझ्या दृष्टीस पडून मी घाबरलें—भ्यालें—आणि पळून जाऊं लागलें. सरकार, एवढ्याचवरून मजवर हा भयंकर आरोप आला आहे. पण मजकडे कांहीं सुद्धां दोष नाहीं, अशाविषयीं मी आपली खात्री करून देईन. सरकारानें मला तशी संधि द्यावी, ह्मणजे एका तासाच्या आंत मी ह्या गोष्टीविषयीं खात्री करून देईन. खून झालेल्या घरापर्यंत मला एकवार जाण्याची परवानगी द्यावी; ह्मणजे मजबरोबर जो अंमलदार येईल त्याची, हा खून दुसऱ्याच्या हातानें झाल्याची मी खात्री करून देईन. आणि मी तेथें गेल्याशिवाय नुसत्या तोंडानें येथें सांगून [illegible]

कोणाच्या मनांत मला उतरून देतां येणार नाहीं."

काय करावें ह्याविषयीं म्याजिस्ट्रेटचा निश्चय होईना. तरी, यानें आपल्या शिरस्तेदाराशीं बराच वेळ हळूहळू विचारपूस केली. शेवटीं तो ग्रम्लेला ह्मणाला: "करें काय? तुह्माला काय वाटतें? आरोपीचें हें ह्मणणें कबूल करावें काय?"

पिटर-खाविंदांपुढें मला कांहींही बोलतां येत नाहीं. तरी पण उद्यांपर्यंत खटला तहकूब ठेवण्याचा आपण हुकूम केला तरी माझी हरकत नाहीं. आणि आपला हुकूम असेल तर मी ह्या आरोपीला खून झाला त्या जागीं घेऊन जाऊन, ती काय पुरावा दाखविते तो पाहतों.

न्यायाधिशानें ह्याप्रमाणें करण्याविषयीं याला हुकूम करून, खटला दुसरे दिवशीं आकरा वाजेपर्यंत तहकूब ठेवला.

लागलेंच लोकांची गर्दी हळूहळू मोडूं लागली; व क्यारोलाईनला घेऊन पिटर ग्रम्ले आणि माळज जवळच्या खोलींत गेले. तेथें तिजसाठीं फराळाची तयारी केलेली होती. व फराळ होत असतां काम फार चांगलें केल्याबद्दल ग्रम्लेनें तिला शाबसकी दिली.

नंतर त्यानें घड्याळ काढून पाहिलें तों बरोबर साहा वाजले होते. हें पाहून तो ह्मणाला: "देवा! ह्या कचेऱ्यांतून वेळ किती सपाट्यानें जातो! पण हरकत नाहीं. गर्दी मोडली पाहिजे ह्मणून साडेआठ वाजेपर्यंत आपण येथेंच राहूं. पावणेनऊ वाजतां होडी यावयाची आहे,"

होडीचें नांव ऐकतांच क्यारोलाईनला भय वाटून ती ह्मणाली: "होडी कशाला?"

पिटर-होय, होडी. आमचा पुढचा जो बेत ठरला आहे त्यांत होडीची जरूर आहे. पण ताई, तुह्मी भिऊं नका. ये माळज, हा मद्याचा शिसा आहे, यांतून आपापले पेले आपण भरून घेऊन साडे आठ वाजेपर्यंत चैन करूं.

ह्याप्रमाणें बोलून ग्रम्लेनें आपली विडी पेटविली. माळजनेंही तोच कित्ता उचलला. इकडे क्यारोलाईन वाल्टर आपल्या पूर्वींच्या, हल्लींच्या व पुढील स्थितीविषयीं विचार करण्यांत अगदीं गर्क झाली.

---

## भाग १३०.

### सुईणीच्या घरीं पुनः खेप.

रात्रीचा साडे आठ वाजण्याचा ठोका पडतांच ग्रम्ले आणि माळज हे अगदीं गडबडीनें उठले आणि क्यारोलाईनला बरोबर घेऊन कचेरीच्या मागच्या दरवाजानें बाहेर पडले. रात्रीची वेळ असल्या कारणानें थंडी बरीच पडली होती. आणि क्यारोलाईनला कैद करून पोलिसच्या ताब्यांत पहिल्या दिवशीं दिल्यावर त्यांनीं तिला तुरुंगांत नेलें, त्या वेळीं तिची टोपी किंवा अंगावरची शाल मागून घेण्याची त्यांजकडून व्यवस्था न झाल्यामुळें ह्या वेळीं तिच्या अंगावर उबदार वस्त्र

कांहींच नव्हतें. थंडीनें ती लट लट कांपूं लागली, आणि तिचे दांत कडकड वाजूं लागले. ते ऐकून **पिटर** ह्मणाला: " अरेरे, ही पोरगी अगदीं उपाशी मरत आहे! "

**माव्ज**–मग तिनें मघाशीं लोणी आणि भाकरी खावयाची होती कीं नाहीं.

**पिटर**–गाढवा, भुकेनें नाहीं ती उपाशी मरत. थंडीमुळें मरत आहे.

**क्यारोलाईन**–जाऊं द्या तें. त्याची तुह्मी नका काळजी करूं.

" ठीक आहे, चल तर मग लवकर. " असें ह्मणून **पिटर**नें तिला आपला हात दिला, आणि तिघांनीं-ही सपाट्यानें पाय उचलले.

थोड्या अवकाशांत ते सुइणीच्या घराजवळ येऊन पोहोंचले, व **ग्रम्लेनें** दारावर थाप मारतांच साक्षीस आलेल्यांपैकीं एका मोलकरणीनें तें उघडलें. तिच्या हातांतील दिव्याच्या उजेडानें **क्यारोलाईन**चें तोंड तिच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ती त्रासून ह्मणाली: " आलीस बया पुनः येथें ! साऱ्या घराला तूं सुतक आणलें आहेस! "

" हां, चूप बैस. मी अगदीं निर्दोषी आहें. " **क्यारोलाईन** रागानें ओरडून ह्मणाली.

**ग्रम्ले**–हं, कज्जा करूं नका. ती निर्दोषी आहे बरें ह्मातारे. चल आंत आणि दरवाजा बंद कर.

ह्याप्रमाणें **ग्रम्लेनें** ताकीद दिल्यावर सारें भांडण मिटलें, व मंडळी आंत शिरली. नंतर **ग्रम्लेनें** " कोणत्या खोलींत जावयाचें आहे? " असें विचारण्याचें सोंग केल्यावर **माव्जनें** हळूच इशारा केल्यावरून " माझ्या " असें **क्यारोलाइन**नें उत्तर दिलें.

मोलकरीण दिवा दाखविण्यासाठीं बरोबर येऊं लागली. परंतु **ग्रम्लेनें** तिच्या हातचा दिवा घेऊन तिला तेथेंच बसावयास सांगितलें, आणि तिनें-ही तसेंच केलें.

ह्या वेळीं हें सारें घर अगदीं ओस पडल्यासारखें झालें होतें. **लिब्लेबाईचा** खून झाला त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं, बाळंत होण्यासाठीं तिच्या येथें आलेलीं सर्व गिऱ्हाइकें भराभर आपली सोय दुसरीकडे लावून तिकडे निघून गेलीं. त्यामुळें सर्व घर उदास दिसूं लागून, प्रेत पडून राहिलेल्या घराची त्याला कळा आली. **क्यारोलाईनला** तर तेथल्या जमिनीला आणि भिंतींना चिकटा आल्यासारखें वाटून, आपल्या हातालाही तो लागल्यासारखें वाटूं लागलें.

असो. वर कळविल्याप्रमाणें तिच्या पूर्वीच्या खोलींत पोलीस कामगारांसह ती गेल्यावर तिनें " पुढें काय करावयाचें? " असें त्यांना विचारलें. तेव्हां **ग्रम्लेनें माव्जला** " होडी आली कीं नाहीं पहा " असें ह्मटलें.

होडीचें नांव पुनः ऐकतांच **क्यारोलाईन** घाबरली, व कांहीं तरी दगा आहे असें तिला वाटून ती थर थर

कांपूं लागली. आणि " होडी कशाला पाहिजे ? " असें तिनें विचारलें.

**पिटर**—होडीना ? ती पुढील बेत शेवटास न्यावयासाठीं पाहिजे आहे; पण तिजबद्दल तुला श्यावयास नको. तूं म्हणशील तेथेंच ही होडी तुला घेऊन जाईल. तुझ्याविरुद्ध पुरावा किती भरपूर आहे हें तुला ठाऊक आहेच; आणि तुला आपला जीव वांचवावयाचा असेल तर ह्या खिडकींतून खालीं नदींत तूं उडी टाक. तूं उडी टाकतांच होडीवाला तुला होडींत घेईल, आणि तेथें तुला वेष पालटण्यासाठीं दुसऱ्या पोषाखाची तयारी करून ठेविली आहे, इतकेंच नाहीं; तर तोंडाला लावण्यासाठीं रंगही तयार करून ठेवला आहे. तूं शहाणपणानें वागशील आणि दुसऱ्या कोणत्या तरी देशांत जाशील तर, हलींचें तुजवरचें अरिष्ट खास टळेल.

बापानेंसुद्धां आपल्याबद्दल इतकी काळजी वाहिली नाहीं, असें **क्यारोलाईन**ला वाटून तिनें **ग्रम्ले**कडे आनंदित मुद्रेनें पाहिलें, व त्याच्या म्हणण्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें.

खिडकी उघडून तिनें नदीकडे पाहिलें, तों नेहमींप्रमाणें ह्या घराच्या तळमजल्याच्या भिंतीवर तिचें पाणी आपटत असून, बाहेर अगदीं काळोख होता. तरी ह्या काळोखांत उभी असलेली होडी तिच्या नजरेस पडून, होडीवाला वर खिडकीकडे पहात आहे असेंही तिच्या दृष्टीस पडलें.

नंतर तिनें आपली तयारी असल्याचें **ग्रम्ले**ला कळविलें. तेव्हां **ग्रम्ले** म्हणाला: " ठीक आहे. टाक तर उडी. तूं उडी टाकल्यावर तुला होडींत घेतलें कीं, फाशीं जाण्यापेक्षां नदींत उडी टाकून जीव देणें बरें असें तुला वाटून, तूं आह्मांस इकडे तिकडे पहावयाच्या नादीं लावलेंस; व नदींत उडी टाकून जीव दिलास, असा आह्मी पुकारा करूं. आणि उद्यां साऱ्या **लंडनां**त सर्व लोकांच्या तोंडीं हीच बातमी होऊन, तुजबद्दल कोणी जास्त तपास करणार नाहींत. पण ह्या घे पन्नास गिनी. ह्या तुला **ब्रेस**बाईनें दिल्या आहेत. "

**क्यारोलाईन**—**ब्रेस**बाईनें पन्नास गिनी दिल्या आहेत! या हडळीकडचा एक फुटका पितळी फार्दिंगसुद्धां मला नको !

**पिटर**—पण मी अशी दगाबाजी करणार नाहीं. तिनें ह्या गिनी. तुला देण्यासाठीं मजजवळ दिल्या आहेत, आणि त्या मी तुला दिल्याशिवाय राहणार नाहीं.

हीं बोलणीं होऊन तदनुसारें वर्तन झाल्यावर **क्यारोलाईन**नें खोलींतून बेलाशक नदींत उडी टाकली. आणि तिनें तसें करतांच **पिटर ग्रम्ले** व त्याचा दुय्यम **माडज** ह्यांनीं अगदीं घाबरून गेल्याचें हुबेहूब सोंग करून "**क्यारोलाईन**नें जीव दिला; **क्यारोलाईन**नें जीव दिला " असें ओरडत सपाट्यानें ते घराबाहेर पडले.

---

## भाग १३२.

### बेलन्डन मठ.

आमच्या वाचकांना आतां वरील मठांत आमच्याबरोबर थोडा वेळ येण्याची

तसदी दिली पाहिजे. जार्ज वुडफालनें भाविष्य केल्याप्रमाणें ह्या सुंदर वाड्याच्या धनसंपन्न मालकिणीनें रोज फास्टरचें अत्यानंदानें स्वागत करून, तिला आपण अगदीं आपल्या घरींच आहों असें भासविलें.

ज्या वेळची आह्मी हकीकत लिहीत आहों त्या वेळीं लंडनच्या पश्चिमेकडील भागांत एका अत्यंत सुंदर व जुनाट वाड्यांतीलच हा एक भाग आहे अशी ह्याची ख्याति होती. एजवेअर रस्त्याला लागून ह्या वाड्याची पुढील बाजू होती. बागेच्या भिंतीच्या मध्यभागीं ह्याचा मोठा दरवाजा असून, त्याला खिळे मारलेले होते; आणि त्याच्या शेजारींच घांट ओढण्याची लोखंडी तार होती. हा वाडा एकाच वेळीं बांधलेला नसल्या कारणानें त्याच्या निरनिराळ्या भागांची बांधणी निरनिराळ्या तऱ्हेची होती. पुढील भाग सगळ्यांत नवा असून, त्याच्या खिडक्या उंच पण अरुंद होत्या. मुख्य दरवाजा जमिनीपासून बऱ्याच पायऱ्या उंच असून, त्याजवर गच्ची होती. आंतील संगमरवरी दिवाणखान्यांत उत्तम उत्तम दगडी पुतळे असून, सर्व भिंतींना चिलखतें व हत्यारें टांगलेलीं होतीं. हा भाग उत्तरेच्या बाजूस असून, एजवेअर रस्त्याकडे ह्याचें तोंड होतें. मागील—ह्मणजे दक्षिणेकडील—भाग सर्वांत जुना असून, भव्य गंभीर होता. पूर्वेकडील बाजू दगडाची असून, एलिझाबेथ राणीच्या वेळच्या तऱ्हेप्रमाणें बांधलेली होती. पश्चिमेकडील बाजूला कित्येक खोल्या असून, एक मोठा तबेलाही होता.

ह्याप्रमाणें हा वाडा मोठा असून, निरनिराळ्या वेळीं बांधलेला असल्या कारणानें ह्याला दरवाजेही पुष्कळ होते, आणि जिनेही भरपूर होते. तरी पण वाड्याच्या पुढल्या बाजूच्या सर्व खोल्यांतून त्यांना शोभेल अशा तऱ्हेनें सर्व सामान मांडलेलें होतें.

तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं, वाड्याच्या भव्य शोभेंत यत्किंचितही उणेपणा न येऊं देतां, त्यांत श्रीमंती थाटाचें ह्मणून जेवढें सुरेख व भपकेदार सामान मनोरंजनार्थ व सुखार्थ ठेवतां येईल तेवढें ठेवलें होतें.

ह्या वाड्याच्या बंधकामास प्रारंभ पहिल्या रिचर्ड राजाच्या कारकीर्दींत झाला असून, तेव्हांपासून ह्याची मालकी बेलन्डनच्याच घराण्याकडे होती. पण ह्याप्रमाणें जरी ह्या वाड्याची मालकी शेंकडों वर्षें ह्या घराण्याकडे होती, तरी ह्या घराण्याचे, मान्ट गामरी ह्यांजसारख्या फार प्राचीन घराण्याशीं लग्नसंबंध झालेले असल्या कारणानें सुमारें तीस वर्षांपासून ह्या वाड्याच्या मालकीच्या संबंधानें उभय घराण्यांत तंटे लागले असून, फिर्यादीही सुरू झाल्या होत्या. त्याचप्रमाणें ह्या घराण्याचा जमीनजुमला वगैरे आणखीही पुष्कळ मालमत्ता वार वुइकशायरमध्यें होती; आणि हिजबद्दलही त्याच घराण्याशीं तंटे सुरू असून, त्यांतून तर त्या घराण्याची सरशी होण्याचा चांगलाच रंग होता. असो. ह्या तंट्यांच्या संबंधानें विशेष खुलासा करण्याचें ——

तेव्हां येथें त्याजबद्दल विशेष ल्याहाव-याची नको.

वाड्याची मालकीण ह्या वेळीं सदतीस वर्षांच्या उमरींत होती. तिचें उत्तम सौंदर्य, तिनें संपादन केलेले उत्कृष्ट गुण आणि तिचें थोर औदार्य ह्यांजबद्दल तिची सर्व लोकांत ख्याति होती. तरी पण वाचकांना तिचें पूर्व वृत्त कळविल्याशिवाय तिची जी हकीकत आम्ही सांगणार आहों ती नीटपणें कळणार नाहीं.

हिचें जन्म मार्ड गामरी घराण्यांत झालें असून, लहानपणींच हिचे आईबाप वारले होते; त्यामुळें तिची सर्व काळजी वाहण्याचा भार तिच्या एका दूरच्या आतेवर पडला होता. ही बाई मोठी खटपटी व द्रव्यावर दृष्टि देणारी होती; आणि आपल्या भाचीचें एकाद्या थोर घराण्यांतल्या पुरुषाशीं लग्न लावून देऊन तिला थोर पदवी मिळवून द्यावयाचा तिनें निश्चय केला; व सतरावें वर्ष पुरें झालें नाहीं तोंच ह्या सुंदर व निष्कपट वृत्तीच्या पोरीला बेलंडनच्या अर्लसाहेबांच्या मागणीस मान द्यावयास लावलें. यांचें वय त्या वेळीं पासष्ट वर्षांचें होतें. असल्या म्हाताऱ्याशीं आपलें लग्न न लावतां, ज्याजवर आपलें प्रेम बसलें होतें त्यालाच आपणास देण्याविषयीं तिनें आपल्या आतेची फार विनंती केली, पण ती व्यर्थ गेली. आत्याबाई ऐकेना. त्या म्हाताऱ्याशीं ह्या पोरीचें लग्न लागलें तर उभय घराण्यांत सुरू झालेल्या फिर्यादींचा आपसांत निकाल लागेल अशी आत्याबाईस आशा वाटून—निदान तिनें तरी तसें कारण सांगून—ह्या पोरीचें त्या म्हाताऱ्याशीं लग्न लागलेंच पाहिजे असा आग्रह धरला; आणि विवाहमंडपांत या पोरीचा जणूं कांहीं बळीच दिला! वैवाहिक सुखाच्या प्रथम उपभोगार्थ ह्या नवरबुवानीं आपल्या नववधूस वारवुइकशायरमध्यें नेलें; आणि तिकडे कांहीं दिवस त्या कोमल सुखांचा आस्वाद घेतल्यावर हें जोडपें लंडनांतल्या आपल्या वाड्यांत येऊन राहिलें. येथें आल्यावर हे म्हातारे नवरे आपल्या तरुण पत्नीचा कायमचा निरोप घेऊन परलोकचे रहिवासी झाले. —आणि आपल्या तरुण कुटुंबाच्या मर्जीविरुद्ध तिजशीं लग्न लावून, दुसऱ्यावर जडलेल्या तिच्या प्रेमाचा सर्वस्वी घात करून तिचा पूर्णपणें उन्हाळा केल्याबद्दल जशी कांहीं यांना योग्य शिक्षाच झाली!—अशा रीतीनें तो एकाएकीं मरण पावला. डोक्यांत कांहीं रोग होऊन यामुळें अर्लसाहेब असे एकाएकीं वारले असा त्यांच्या नेहमींच्या डाक्टरांनीं अभिप्राय दिला; व त्यांचा और्ध्वदेहिकविधि मोठ्या थाटानें वारवुइकशायरमध्यें झाला.

पुत्र न होतां अर्लसाहेब वारल्यामुळें पूर्वीच्या फिर्यादींना जास्तच जोर आला. तरी पण वाड्याचा ताबा बेलंडनबाईकडेच होता. तिचें मन वळवून सर्व तंटा आपसांत तोडून घेण्यासाठीं आत्याबाईनीं पुष्कळ खटपट केली; पण तिला यत्किंचितही यश आलें नाहीं.

तसदी दिली पाहिजे. जार्ज वुडफालनें भाविष्य केल्याप्रमाणें ह्या सुंदर वाड्याच्या धनसंपन्न मालकिणीनें रोज फास्टरचें अ- त्यानंदानें स्वागत करून, तिला आपण अ- गदीं आपल्या घरींच आहों असें भासविलें.

ज्या वेळची आह्मी हकीकत लिहीत आहों त्या वेळीं लंडनच्या पश्चिमेकडील भागांत एका अत्यंत सुंदर व जुनाट वा- ड्यांतीलच हा एक भाग आहे अशी ह्याची ख्याति होती. एजवेअर रस्त्याला लागून ह्या वाड्याची पुढील बाजू होती. बागेच्या भिंतीच्या मध्यभागीं ह्याचा मोठा दरवाजा असून, त्याला खिळे मारलेले होते; आणि त्याच्या शेजारींच घांट ओढण्याची लोखंडी तार होती. हा वाडा एकाच वेळीं बांधलेला नसल्या कारणानें त्याच्या निरनिराळ्या भागांची बांधणी निरनिराळ्या तऱ्हेची होती. पुढील भाग सगळ्यांत नवा असून, त्याच्या खिडक्या उंच पण अरुंद होत्या. मुख्य दरवाजा जमिनीपासून बऱ्याच पायऱ्या उंच असून, त्याजवर गच्ची होती. आंतील संग- मरवरी दिवाणखान्यांत उत्तम उत्तम दगडी पुतळे असून, सर्व भिंतींना चिलखतें व हत्यारें टांगलेलीं होतीं. हा भाग उत्तरेच्या बाजूस असून, एजवेअर रस्त्या- कडे ह्याचें तोंड होतें. मागील—ह्मणजे दक्षिणेकडील—भाग सर्वांत जुना असून, भव्य खंबीर होता. पूर्वेकडील बाजू दगडाची असून, एलिझाबेथ राणीच्या वेळच्या तऱ्हेप्रमाणें बांधलेली होती. पश्चिमेकडील बाजूला कित्येक खोल्या

ह्याप्रमाणें हा वाडा मोठा असून, निरनिराळ्या वेळीं बांधलेला असल्या कारणानें ह्याला दरवाजेही पुष्कळ होते, आणि जिनेही भरपूर होते. तरी पण वाड्याच्या पुढल्या बाजूच्या सर्व खोल्यां- तून त्यांना शोभेल अशा तऱ्हेनें सर्व सामान मांडलेलें होतें.

तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं, वाड्याच्या भव्य शोभेंत यत्किंचितही उणेपणा न येऊं देतां, त्यांत श्रीमंती थाटाचें ह्मणून जेवढें सुरेख व भपकेदार सामान मनो- रंजनार्थ व सुखार्थ ठेवतां येईल तेवढें ठेवलें होतें.

ह्या वाड्याच्या बंधकामास प्रारंभ पहिल्या रिचर्ड राजाच्या कारकीर्दींत झाला असून, तेव्हांपासून ह्याची मालकी बेलन्डनच्याच घराण्याकडे होती. पण ह्याप्रमाणें जरी ह्या वाड्याची मालकी शेंकडों वर्षें ह्या घराण्याकडे होती, तरी ह्या घराण्याचे, मान्ट गामरी ह्यांज- सारख्या फार प्राचीन घराण्याशीं लग्न- संबंध झालेले असल्या कारणानें सुमारें तीस वर्षांपासून ह्या वाड्याच्या माल- कीच्या संबंधानें उभय घराण्यांत तंटे लागले असून, फिर्यादीही सुरू झाल्या होत्या. त्याचप्रमाणें ह्या घराण्याचा जमीन- जुमला वगैरे आणखीही पुष्कळ मालमत्ता- वार वुइकशायरमध्यें होती; आणि तिजबद्दलही त्याच घराण्याशीं तंटे सुरू असून, त्यांतून तर त्या घराण्याची सरशी होण्याचा चांगलाच रंग होता. असो. ह्या तंट्यांच्या संबंधानें

तेव्हां येथें त्याजबद्दल विशेष ल्याहावयास नको.

वाड्याची मालकीण ह्या वेळीं सदतीस वर्षांच्या उमरींत होती. तिचें उत्तम सौंदर्य, तिनें संपादन केलेले उत्कृष्ट गुण आणि तिचें थोर औदार्य ह्यांजबद्दल तिची सर्व लोकांत ख्याति होती. तरी पण वाचकांना तिचें पूर्व वृत्त कळविल्याशिवाय तिची जी हकीकत आह्मी सांगणार आहों ती नीटपणें कळणार नाहीं.

हिचें जन्म मार्टह गामरी घराण्यांत झालें असून, लहानपणींच हिचे आईबाप वारले होते; त्यामुळें तिची सर्व काळजी वाहण्याचा भाग तिच्या एका दूरच्या आतेवर पडला होता. ही बाई मोठी खटपटी व द्रव्यावर दृष्टि देणारी होती; आणि आपल्या भाचीचें एकाद्या थोर घराण्यांतल्या पुरुषाशीं लग्न लावून देऊन तिला थोर पदवी मिळवून द्यावयाचा तिनें निश्चय केला; व सतरावें वर्ष पुरें झालें नाहीं तोंच ह्या सुंदर व निष्कपट वृत्तीच्या पोरीला बेलंडनच्या अर्लसाहेबांच्या मागणीस मान द्यावयास लावलें. ह्यांचें वय त्या वेळीं पासष्ट वर्षांचें होतें. असल्या म्हाताऱ्याशीं आपलें लग्न न लावतां, ज्याजवर आपलें प्रेम बसलें होतें त्यालाच आपणास देण्याविषयीं तिनें आपल्या आतेची फार विनंति केली. पण ती व्यर्थ गेली. आत्याबाई ऐकेना. त्या म्हाताऱ्याशीं ह्या पोरीचें लग्न लागलें तर उभय घराण्यांत सुरू झालेल्या फिर्यादींचा आपसांत निकाल लागेल अशी आत्याबाईस आशा वाटून—निदान तिनें तरी तसें कारण सांगून—ह्या पोरीचें त्या म्हाताऱ्याशीं लग्न लागलेंच पाहिजे असा आग्रह धरला; आणि विवाहमंडपांत ह्या पोरीचा जणूं कांहीं बळीच दिला! वैवाहिक सुखांच्या प्रथम उपभोगार्थ म्हातारेबुवानीं आपल्या नववधूस बार वुइकशायरमध्यें नेलें; आणि तिकडे कांहीं दिवस त्या कोमल सुखांचा आस्वाद घेतल्यावर हें जोडपें लंडनांतल्या आपल्या वाड्यांत येऊन राहिलें. येथें आल्यावर हे म्हातारे नवरे आपल्या तरुण पत्नीचा कायमचा निरोप घेऊन धडग्याचे रहिवासी झाले.—आणि आपल्या तरुण कुटुंबाच्या मर्जीविरुद्ध तिजशीं लग्न लावून, दुसऱ्यावर जडलेल्या तिच्या प्रेमाचा सर्वस्वी घात करून तिचा पूर्णपणें उन्हाळा केल्याबद्दल जशी कांहीं त्यांना योग्य शिक्षाच झाली!—अशा रीतीनें तो एकाएकीं मरण पावला. डोक्यांत कांहीं रोग होऊन त्यामुळें अर्लसाहेब असे एकाएकीं वारले असा त्यांच्या नेहमींच्या डाक्टरांनीं अभिप्राय दिला; व त्यांचा और्ध्वदेहिकविधि मोठ्या थाटानें बार वुइकशायरमध्यें झाला.

पुत्र न होतां अर्लसाहेब वारल्यामुळें पूर्वीच्या फिर्यादींना जास्तच जोर आला. तरी पण वाड्याचा ताबा बेलंडनबाईकडेच होता. तिचें मन वळवून सर्व तंटा आपसांत तोडून घेण्यासाठीं आत्याबाईनीं पुष्कळ खटपट केली; पण तिला यत्किंचितही यश आलें नाहीं

केवळ आपलें हित साधण्यासाठीं ज्यांनीं तिचा सर्वस्वी घात करून तिच्या जन्माचें मातेरें केलें त्यांचें बिलकूल ऐकावयाचें नाहीं, असा तिचा संकल्प ठरला; आणि फिर्यादीचें काम सावकाशपणें **चान्सरी** कोर्टमध्यें नेहमींच्या संप्रदायाप्रमाणें चाललें होतें. आपसांत तंटा मिटविण्याविषयीं भाचीजवळ बोलण्याचा आत्याबाईंना कंटाळा तरी आला--किंवा ती ऐकत नाहीं असें पाहून आपली मानहानि करून घेण्याचें त्यांना आवडलें तरी नाहीं--म्हणून त्या बाजूचा त्यांचा सर्व प्रयत्न बंद पडला होता.

असो. अशा रीतीनें वीस वर्षे गेलीं होतीं, **बेलन्डन**च्या मार्चिओनेसनें हा सर्व काळ वैधव्यांत घालविला होता. **लंडनां**तला बाग आणि **बार्कशायर**मधील मालमत्ता अद्यापि हिच्याच ताब्यांत असून, फिर्यादीचा अद्यापि पहिलाच दिवस होता म्हटलें तरी चालेल.

**बेलन्डन**बाईचीं हीं वीस वर्षे जरी वैधव्यांत गेलीं होतीं, तरी आपला दुःखसूचक पोषाख घालण्याचा क्रम तिनें कायमच ठेवला होता. ह्या क्रमावर तिची ही इतकी निष्ठा कां बसली होती ह्याचें कोणासही कारण कळलें नव्हतें. साठी उलटून गेलेला जो म्हातारा तिचा थोडे महिने नवरा बनला होता, त्याजवर म्हणजे आपलें निःसीम प्रेम जडलें होतें, असें खुद्द तीही म्हणत नव्हती. तिचें त्याजवर केव्हांही प्रेम जडलेलें नव्हतें, आणि तिच्या इच्छेविरुद्ध त्याजशीं तिचा--

व तो तिला केव्हांही आवडत नव्हता. तसेंच त्याचें नेहमीं स्मरण राखण्यासही तिला कांहीं कारण नव्हतें; आणि ह्यांतील कोणत्याही कारणामुळें तिचा हा दुःखवेष करण्याचा क्रम सुरू होता असें म्हणावयास जागा नव्हती.

धनसंपन्न, गुणसंपन्न आणि रूपयौवनसंपन्न असल्यामुळें हिजशीं लग्न लावावयास पुष्कळ गृहस्थ तयार झाले होते. परंतु त्यांतील प्रत्येकाचा तिजकडून अव्हेर होण्यास जरी कांहींही कारण नव्हतें, तरी ह्यांतील एकाचेंही म्हणणें तिनें कबूल केलें नव्हतें. "आपली वैधव्यवृत्ति सोडून देऊन पुनः वैवाहिक सुखांचा अनुभव घेण्यास तिची नाकबुली कां असावी" असा कोणीं प्रश्न विचारला, तर ती आपल्या पोषाखाकडे पाही; आणि त्याच पोषाखांत आपली ह्या लोकची यात्रा संपवावयाची असा आपला निश्चय असल्याचें ती सांगे.

ही बाई रूपानें फारच सुंदर होती. तिच्या शरीराची काठी थोडी उंच असून, अंगानें ती किंचित् स्थूल होती. तरी पण तिचें सौंदर्य इतकें निर्दोष होतें कीं, मोठमोठ्या चिकित्सकांनादेखील त्यांत दोष काढण्यास जागा नव्हती. तिचे उरोज विस्तीर्ण व वर्तुलाकृति होते. स्कंधप्रदेश निमुळता होता; आणि बाहु जरी थोडे सणसणीत होते तरी तिच्या सौंदर्यांत कमीपणा आणणारे नव्हते. तिच्या पोषाखानें तिच्या शरीराचे कांहीं भाग झांकलेले होते: तरी [illegible]

तिचा चेहेरा फारच सुरेख होता. आणि वैधव्याच्या पोषाखानें जरी दुसऱ्या पोरी उतार दिसतात, तरी हिचें वय तिसांहून जास्त आहे असें कोणासही वाटत नव्हतें. तिचे डोळे मोठे असून काळे होते. तिचे केस सोन्याच्या रंगाचे होते, आणि त्यांचा मोहकपणा न झाकला जाईल अशा बेताची तिची टोपी असे. तिची दंतपंक्ति शुभ्र असे; आणि तिच्या गालांवर उत्तम लाली असून, त्यांचें वरचेवर चुंबन घेण्यांत येत नाहीं, ह्याबद्दल कोणासही वाईट वाटण्यासारखें होतें.

हिची वागणूक थाटाची व झोकदार असे, तरी पोकळ डौल तिजमध्यें नव्हता. तसेंच, ती नसत्या आरेरावीनेंही वागत नसे. तिजकडे येणारांशीं ती मोठ्या प्रेमानें व मोकळेपणानें वागत असे.

**जार्ज वुडफाल**नें **रोज फास्टर**ला ज्या सरदारणीकडे नेलें ती हीच. आणि तिचा एकंदर तऱ्हा एकाद्या सुतक्याप्रमाणें होता.

चित्रकारानें प्रथम भविष्य केल्याप्रमाणें **रोज**चें स्वागत मोठ्या प्रेमानें झालें. तिला दक्षिणेच्या भागांत एक उत्तम खोली रहावयास मिळाली. आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं ती उठली नाहीं तोंच तिजसाठीं उत्तम पोषाखाची खरेदी झाली; व आणखी तिला जे जे कपडे पाहिजे असतील ते ते ताडतोब तयार करण्याविषयीं शिंपिणीला हुकूम झाला.

दुपारीं **जार्ज वुडफाल** सरदारणीच्या भेटीस आला, व **रोज**च्या प्रकृतीबद्दल त्यानें विचारपूस केल्यावर, सरदारीणबाईनें आग्रह करून त्याला भोजनास राहून घेतलें. सारांश, **क्यारोलाईन वाल्टर**ची न्यायाधिशापुढें चवकशी चालली होती, त्या वेळीं **रोज फास्टर बेलन्डन** वाड्यांतील भव्य माजघरांत त्याच्या सुंदर व धनाढ्य मालकिणीच्या व **जार्ज वुडफाल**च्या पंक्तीस बसून सुग्रास जेवण जेवत होती.

---

## भाग १३२.

### कामातुर कोतवाल.

रात्रीचा आकराचा ठोका पडतो न पडतो इतक्यांत **ग्रम्ले** आणि **माऊज** ब्रेसबाईच्या दुकानाच्या दरवाजाजवळ येऊन पोहोंचले. तेथें येऊन पोहोंचतांच **ग्रम्ले**नें आपल्या जोडीदारास सलाम ठोकून ह्मटलें: "ती तरुण पोर पळून गेल्याची बातमी **ब्रेस**बाईला कळवावयाची आहे. शिवाय, ती बाईही मोठी फक्कड आहे; आणि तिजजवळ गप्पा मारण्यांत माझा अर्धा पाऊण तास गेला तरी मला त्याची हरकत वाटणार नाहीं. ह्यासाठीं तूं जा, आणि सकाळीं मला कचेरींतच भेट."

**माऊज**–ठीक आहे. भेटेन तेथें. तुह्मी तर द्या लाट मारून!

तो जातांच **ग्रम्ले**नें दारावर थाप मारली. लागलींच **ह्यारियट**नें दार उघडून त्याला माजघरांत **ब्रेस**बाईकडे नेलें, आणि बाहेर जाऊन दार बंद केलें.

तो जातांच **ब्रेस**बाईनें विचारलें:

" कसें काय ? काय बातमी ? काय झालें? क्यारोलाईन झाली मोकळी ! "

**ग्रम्ले**—काय झालें ह्मणून काय विचारतां ? अगदीं फत्ते आहे. आपण ज्याप्रमाणें मोकळे आहोंत त्याचप्रमाणें तीही आहे; आणि ती जर शहाणपणानें वागेल तर तिला पुनः त्रासही होणार नाहीं.

ग्रम्लेनें ही बातमी सांगतांच ब्रेसबाईची सारी काळजी दूर होऊन ती ह्मणाली: "शहाणपणानें ती वागेल ह्याजबद्दल माझी खात्री आहे—पण त्या खुर्चीवर बसा, आणि ह्या मेजावरील बाटल्यांवर मर्जीस वाटेल तशी चैन मारा, व एकीकडे सारी हकीकत सांगा.

ग्रम्लेनें तिचे आभार मानून आणि तिच्या सांगण्याप्रमाणें कामही यथास्थित बजावून ह्मटलें: " काम खूप मजेचें झालें आहे. बाईसाहेब, या पोरीवर पुरावा अगदीं भक्कम होता. आणि बऱ्या रीतीनें ती सुटण्याची मुळींच आशा नव्हती. तेव्हां युक्ति योजून तिला सोडवावें असा मीं बेत केला; आणि तिला शिकवून ठेवून, आपण निर्दोष असल्याबद्दलचा पुरावा आणण्यासाठीं खून झालेल्या घरीं पुनः एकवार जाण्याची म्याजिस्ट्रेटाकडून परवानगी घेवविली. तेथें गेल्यावर तिला सारी व्यवस्था सांगितली. तेव्हां तिनें नदींत उडी टाकली. तेथें होडी तयार होतीच, आणि त्या होडींत तोंडास लावण्यासाठीं रंग आणि पालटण्यासाठीं पोषाख वगैरेंची व्यवस्था करून ठेवली होती. पोरीन उडी टाकताच होडीवाल्यानें तिला उचलून घेतलें, आणि काम शेवटास गेलें. पण बाईसाहेब, तिनें आपण होऊन जर उडी टाकली नसती तर मीं तिला खालीं लोटून दिलें असतें. "

**ब्रेस**—तुह्मीं तिचा खून केला असता तर मग! पण होडीवाल्यानें तिला उचललेंना ? आणि सर्व काम निर्विघ्नपणें शेवटास गेलें ना ?

**पिटर**—अगदीं सुरेख रीतीनें शेवटास गेलें. तुह्माला याची मुळीं सुद्धां काळजी नको. पाणबुड्यासारखें न भितां आणि मांजरासारखी झटकन तिनें उडी टाकली; आणि होडीवाल्यानेंही तिला ताबडतोब उचलून घेतलें. मग मीं आणि माझ्या जोडीदारानें घाबरून गेल्यासारखें दाखवून, आह्मी मोठमोठ्यानें ओरडत बाहेर निघून गेलों. आह्मीं होडीवरून नदींत इकडे तिकडे शोध करण्याचें पुष्कळ सोंग केलें; आणि पोर सांपडत नाहीं असा पुकारा करून जास्त तपास करण्याचा नाद सोडून दिला. आतां लोकांना वाटेल कीं, तिनें जीव दिला. उद्यां पहा वर्तमानपत्रांतून कशी चटकदार हकीकत येते ती. आपणावर खटला शेकणार अशी तिची खात्री झाली, तेव्हां तिनें जीव देण्याचा इरादा करून सर्वांना खूप ठकाविलें असेंच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होईल.

असें ह्मणून त्यानें ब्रेसबाईकडे कामातुर दृष्टीनें पाहिलें—पण तिनें [illegible] विशेषसें

तुमच्यावर तर कांहीं येणार नाहींना ?"

**पिटर**—नाहीं; त्याजबद्दल मला कांडीचीही काळजी नाहीं. मीं सारी व्यवस्था इतक्या खबरदारीनें केली आहे कीं, मजबद्दल कोणाच्याची मनांत थोडीसुद्धां शंका येणार नाहीं. आह्मी तिला या सुईणबाईच्या घरीं नेत असतां वाटेनें जर तिला पळून जाऊं दिलें असतें, तर मात्र आह्मांवर तोहोमत आली असती. पण तिला जर आह्मी आपल्याबरोबर नीटपणें या घरीं घेऊन गेलों तर तेथें ती खिडकी उघडून नदींत उडी टाकील अशी कल्पना तरी आमच्या मनांत कशा येणार?

असें ह्मणून पुनः त्यानें तिला हळूच डोळा घातला.

**ब्रेस**—हं, समजलें मी आतां तुह्मीं कसकशी खबरदारी घेतली होती ती. पण चवकशीच्या वेळीं मजबद्दल तर कांहीं अक्षर निघालें नव्हतें ना ?

**पिटर**—छिः, एक अक्षरही निघालें नाहीं. त्याविषयींची खबरदारी मीं पहिल्यानेंच घेतली होती. मीं त्या पोरीला शिकवून ठेवलें होतें. तिच्या मनांत पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या होत्या; पण मीं तिचें तोंडच बंद केलें होतें.

हें बोलतांना **ग्रस्के**नें पुनः तिजकडे सकामदृष्टीनें पाहण्याचा क्रमचालविला होता.

हा प्रकार **ब्रेस**बाईला आवडला नाहीं, आणि तिला नवीनच धास्ती पडल्यासारखें झालें. तेव्हां झटकन् उठून ती ह्मणाली: "वा:! चांगलें काम केलें तुह्मीं. तुमची राहिलेली रक्कम तुह्माला दिली पाहिजेना आतां?"

असें ह्मणून ती उठली, आणि आपल्या लिहावयाच्या पेटीकडे जाऊं लागली.

तिचा तो झोकदार पोषाख आणि तिचें तें उत्कृष्ट सौंदर्य पाहून **ग्रस्के**ची वासना अधिकच जोरावली. तशांत त्यानें नुकतेंच मद्य प्राशन केलें होतें; ह्यामुळें तर त्याच्या शिरांतलें रक्त चांगलेंच गरम झालें इतक्यांत ती पेटीच्या खणांतून नोटा घेऊन परत आली आणि आपल्या खुर्चीवर बसली. तेव्हां त्याची कामानें धुंद झालेली चर्या तिच्या दृष्टीस पडून ती अधिकच घाबरली. असल्या विद्रूप व भिकार पोषाख केलेल्या त्या धटिंगणास आपण त्याच्या ह्मणण्यास कबूल होऊं असें क्षणभर वाटलें हीसुद्धां कल्पना तिच्या मानी स्वभावास आवडेना.

नंतर थोड्या डौलानें हसून व नोकरास काम केल्याबद्दल धन्याकडून बक्षिस देण्यांत येतें तसा झोक दाखवून ती हासत ह्मणाली: "तुह्मीं आपलें काम नीट बजावलें आहे, आणि ही बक्षिशीही खरोखर हक्कानें मिळविली आहे. मला तुमच्यापेक्षां दुसरा चांगला माणूस ह्या कामाकडे योजतां आला नसता अशी आतां माझी खात्री झाली आहे.

नोटा घेतांना तिचा हात मोठ्या प्रेमानें दाबून आणि पुनः तिजकडे विषयातुर दृष्टीनें पाहून **पिटर** ह्मणाला: "गोडशा बाईसाहेब, तुह्माला माझी

काम पसंत पडलें हें पाहून मला फार संतोष वाटतो."

ब्रेसबाईनें झट्कन् आपला हात ओढून घेतला आणि त्याजकडे रागावून पाहिलें. पण पिटर ग्रम्लेनें थोडें हासून त्या नोटा मोजून घेण्यास सुरुवात केली. नोटा मोजणें झाल्यावर त्यानें त्या नीट खिशांत घातल्या; आणि पुनः तिच्या तोंडाकडे सारखी टक लावून ह्मटलें: " बाईसाहेब, तुह्मी मोठ्या सुरेख—फारच सुरेख आहांत; आणि—देवाची शपथ वाहून मी तुह्माला सांगतों—तुह्माला पाहून आज माझें मन जसें गोंधळून गेलें आहे तसें ह्यापूर्वी कोणालाही पाहून तें गोंधळलें नव्हतें."

पहिल्यानें रागानें लाल पडून, पण लागलींच मन शांत करून ब्रेसबाई ह्मणाली: " ग्रम्ले, ह्या तुमच्या बोलण्याचें मला मोठें नवल वाटतें ! पण तुह्मी माझी थट्टा करीत आहां !

पिटर—थट्टा ? आज तर मी थट्टा मुळींच करीत नाहीं. तुह्मी खरोखरच फार सुरेख आहां; आणि तुह्माला पाहिल्यापासुन माझें मन अगदीं बावरून गेलें आहे.

त्याचे डोळे कामवासनेनें अगदीं धुंद होऊन गेले, आणि तिजकडे त्यानें सारखी टक लावली; ह्यामुळें तर ती अधिकच घाबरली, आणि आपल्या जागेवरून जलदीनें उठून ह्मणाली: " ह्याचा अर्थ तरी काय ग्रम्ले ? "

ग्रम्लेही आपल्या खुर्चीवरून उठला, आणि हात पुढें करून ह्मणाला: " ह्याचा अर्थ दुसरा कांहीं नाहीं. मला तुमचा मुका पाहिजे, आणि तो मी घेणार! मग ह्या कामीं मरण आलें तरी पतकरलें ! "

पण ह्या त्याच्या बोलण्यावर उत्तर देण्यापूर्वीच—किंवा तिच्या तोंडांतून एक अक्षरही निघण्यापूर्वी—ग्रम्लेनें आपल्या दांडग्या हातांनीं तिला विळखा घातला; आणि त्याचें तें बोजड तोंड तिच्या तोंडास लागून तिच्या अधराचें चुंबन घेण्यास त्याजकडून सुरुवात झाली.

त्यानें तिला सोडल्यावर ब्रेसबाई रागानें थरथर कांपूं लागली. तिच्यानें साफ उभेंही राहवेना. तेव्हां तेथील पडद्याला धरून ती ह्मणाली: " हं, आतां तुह्मी मला सोडणार कीं नाहीं ? "

पण तिच्या अधराचें एकवार चुंबन मिळाल्यामुळें ग्रम्ले जास्तच कामातुर झाला, आणि तिच्या उरोजांचा पुनः आपल्या छातीला स्पर्श व्हावा अशी त्यास इच्छा उत्पन्न होऊन तो ह्मणाला: " तुह्माला सोडणार ? छिः, उद्यां सकाळपर्यंत तर ती गोष्ट होणार नाहीं! "

त्याचा तो अनावर झालेला काम पाहून ब्रेसबाई जास्तच भ्याली आणि त्रासली, व मोठ्या शांतपणानें ह्मणाली: " आतां फारच पाजीपणा होत आहे तुह्माकडून! आणि ह्याची उपेक्षा करणें नीट नाहीं, "

असें ह्मणून तिनें घांटेची दोरी ओढण्याकरितां हात पुढें केला. पण

ही गोष्ट होणार हें ग्रस्लेनें पूर्वींच ओळखलें होतें. सबब, त्यानें तिचा हात धरून तिला पुनः आपल्या उराशीं घट्ट आवळलें, आणि पुनः तिचे दहा बारा मुके घेतले.

रागानें तिचे गाल आणि तोंड हीं तापून गेलीं होतीं. त्याजकडून ह्याच्याहीपेक्षां पाजीपणा होणार अशी तिला धास्ती वाटूं लागली. आणि तसल्या हिडिस्स पुरुषाचा आपल्याला स्पर्शही व्हावा ह्याचा तिला अतोनात कंटाळा वाटून ती अगदीं बेशुद्ध झाल्यासारखी खुर्चीवर पडली.

कामोत्कंठेनें पिटर ग्रस्लेचें सर्वांग धगधगूं लागून तो ह्मणाला: "उगीच वटवट कशाला करतां? माझें मन तुमच्यावर बसलें आहे, आणि तुह्मी ह्मणजे मोठीशी चवकसखोर बायको आहांत असें नाहीं हें मला ठाऊक आहे. तुमच्या घरीं कोणी परका पुरुष निजला तरी तो कांहीं नवीन गोष्ट घडत आहे असेंही तुमच्या घरच्या मंडळीला वाटणार नाहीं. क्यारोलाईननें मला थोडथोडी हकीकत सांगितली; पण तिनें सांगावयाच्या पूर्वींच मीं सारा तर्क केला होता राजपुत्राच्या वाड्यांत तुह्मीं मला नेलें, तेथें त्यानें तुमच्याबद्दल काळजी दाखविली, आणि त्या पोरींची सुटका करविण्याबद्दल त्याजकडून मला सांगविलें, ह्यावरून मीं साऱ्या गोष्टी ओळखल्या."

बेस–हं, पुरे करा आतां. एक शब्दही जास्त बोलूं नका. सांगा मी आणखी किती रक्कम तुह्माला देऊं, ह्मणजे तुह्मी येथून तावडतोब चालते व्हाल?

ग्रस्ले–देवा देवा! पैशासाठीं आशाळलेलें भूत मी आहें असें तुह्मास वाटतें काय? छुट्! मी आतां एक पैंडही तुह्मापासून घेणार नाहीं. मात्र, तुमचे पुष्कळसे मुके घेतल्याखेरीज मी आतां राहणार नाहीं!

बेस–हं, खबरदार! एक पाऊल देखील पुढें टाकूं नका. जर तुह्मी पुढें आलांच तर मी आतां गलबला करून साऱ्या मंडळींना जागें करीन.

पिटर–वेडे, जिवावर उदार झालेल्या दरवडेखोरांशीं आणि चोरांशीं झटापट करावयाला जो भीत नाहीं, तो पडल्या अशा बायकांच्या रागाला भिईल काय? राहूं दे तर तुझी बडबड. हो सारी रात्र तुझ्या पलंगावर घालवायाचा माझा निश्चय ठरला आहे. मग उगीच उशीर कशाला करतेस;

"देवा! हें असें घडणारच काय?" मोठ्या कष्टानें बेसबाई असें बोलत आहे, तोंच हारियट दरवाजा उघडून आंत आली.

आपली विश्वासू दासी अशा घाईघाईनें आंत आलेली पाहून बेसबाईला नवीनच धाक पडून तिनें विचारलें: "कां? काय काम आहे?"

"बाईसाहेब, आपल्या भेटीला बाहेर कोणी आलें असून, 'तुमची गांठ पडणार नाहीं,' असें कितीही

सांगितलें तरी त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं. ती ह्मणत मी गांठ घेणारच. ती तुमच्याकडे ह्यापूर्वी एकदां आलीच होती." हारियट ह्मणाली.

ती इतकें बोलत आहे तोंच सुळाची बोल्को आंत शिरली. तिला पाहतांच पिटर ग्रम्ले चटकन् तिच्या अंगावर धावून जाऊन, त्यानें तिची गचांडी धरली. सुटका करून घेण्यासाठीं तिनें पुष्कळ झटपट केली. पण त्यानें तिला हिसडा मारून मटकन् खालीं बसविलें, आणि ह्मटलें: "हं, गप्प बैस नाहीं तर मी तुझी चांगलीच खोड मोडीन!"

आपलें आतां कांहीं चालणार नाहीं असें पाहून ती कांहीं एक गडबड न करतां मुकाट्यानें बसली.

---

## भाग १३३.

### तोडजोड.

ही नवी आलेली बाई आपल्या नवऱ्याची रखेल आहे ही गोष्ट ब्रेस बाईनें तत्काळच ओळखली. तिनें ह्यावेळीं आपला नेहमींचा विधवेचा पोषाख केलेला नव्हता. स्याण्डमनला तुरुंगांतून सोडविण्याच्या कामांत मदत केल्या दिवसापासून तो आपला नेहमींचा पोषाख तिला सोडून देणें भाग झालें होतें. आणि जरी हल्लीं तिनें अगदीं साधा पोषाख केला होता तरी तिला ओळखण्यास कांहींच पंचाईत पडत नव्हती. आपलें आणखी कांहीं बिंग बाहेर पडतें कीं काय ह्याची ब्रेसबाईला धास्ती वाटूं लागली. आपलें खरें नांव बाहेर फोडून, आपण स्याण्डमनची लग्नाची बायको असल्याचें पिटर ग्रम्लेच्या देखतही सांगते कीं काय असें तिला वाटूं लागलें; आणि न्यूगेटच्या तुरुंगांतून स्याण्डमनला सोडविण्याच्या कामीं आपली मदत असल्याचा बोभाट करून, आपली अब्रू वाटेल तेव्हां घेऊन, आपणास कैदेंत टाकण्याचीही त्याला सोय करून देते कीं काय असें तिला भय वाटूं लागलें. ह्या साऱ्या गोष्टी त्याच्या कानावर गेल्या ह्मणजे तो ह्मणेल त्या गोष्टीला आपणास राजी झालें पाहिजे; आणि कोणतीही गोष्ट नाकारण्याची सोय उरणार नाहीं अशी तिची अगदीं खात्री होऊन, ती अगदीं घाबरून गेली.

ती तिच्या मनाची स्थिति पिटर ग्रम्लेच्या लक्षांत तेव्हांच आली. तसेंच, ती तेथें तशा वेळीं आली, ह्यावरूनच ह्या थोर दिसणाऱ्या बाईची चालचलणूक चांगली नसावी असें मानण्यास त्याला भरपूर जागा झाली. आणि तो कांहीं हेव्यानें आणि कांहीं विषयातुरतेनें तिजकडे पाहून ह्मणाला: "आपणां दोघांत जें मजेचें भाषण चाललें होतें त्यांत हा एक विलक्षणच घोटाळा आला ह्मटलें पाहिजे."

आपलें मन स्थिर करून ब्रेसबाई ह्मणाली: "ह्या तरुण बाईवर कोणत्या गुन्ह्याचा आरोप आहे?"

पिटर—बाईसाहेब, तो दरवडे खोरांच्या एका टोळीची मिळाफी आहे, आणि हिजवर पाहिजे त्या गुन्ह्यांचा मला पुरावा करतां येईल पण साक्षीपुरावा करण्याच्या भानगडींत न पडतां, उगे म्याजिस्ट्रेटला पळून जाण्याच्या कामी मदत केल्याची हिजवर शाबिती करतां येईल.

लिझी—बाईसाहेब, एवढ्याच गुन्ह्याची मजवर शाबिती करण्याचें कारण, ह्याला पन्नास गिनी त्याबद्दल बक्षिस मिळतील, हें आहे पण ग्रस्के, तुह्मी लक्षांत ठेवा कीं, हें तुह्माला शेवटीं फार जड जाईल.' ज्या टोळींत मी आहें तिजशीं आपण लढाई मांडली आहे. पण ह्यांत तुह्माला जय येणार नाहीं. बाईसाहेब, तुह्मी ह्यांना पन्नास गिनी द्या, ह्मणजे हा मला जाऊं देईल. तुह्मी ह्याप्रमाणें न कराल तर मला पुष्कळ गोष्टी सांगतां येतील हें तुह्मास ठाऊकच आहे.

ब्रेसबाई बरीच घाबरून घाईनें ह्मणाली: ' हं, गप्प बैस. पण ग्रस्केसाहेब, ही बाई मला भेटावयास आली असतां तुह्मी तिला माझ्या येथें पकडलें अशी उद्यां शहरांत बातमी पसरली कीं, माझा दुर्लौकिक होईल. बाकी तिला ह्मणजे मी भितें अशांतील कांहींच भाग नाहीं ''

आपली सरशी झाल्याचा लिझीला आनंद होऊन ती गालांतल्या गालांत हासत आहे असें पाहून ग्रस्के ह्मणाला: " बरें बरें, ठीक आहे, समजलों मी. त्या एलिझाबेथ मार्कस ऊर्फ सुळयाच्या गल्लीचा आणि पालमाल रस्त्यांतील श्रीकृदार दुकानदारीण ब्रेसबाई ह्यांचा दाट स्नेह असून, ह्या दरवडेखोरणीला अशा दुकानदारणीची वाटेल तेव्हां गांठ घेतां येते ही गोष्ट बाहेर प्रसिद्ध झाली कीं, सर्व लोकांना मोठा विस्मय वाटेल ह्यांत नवल नाहीं."

हें त्यानें मोजक्या शब्दांनीं मोठ्या विमेषपणानें केलेलें भाषण ऐकून ब्रेसबाई अगदींच भिऊन गेली, व आपण त्याच्या तावडींत पुरे सांपडलों असें तिचें तिलाच दिसून आलें.

आपल्या बोलण्याचा कसा काय परिणाम घडतो हें पाहण्यासाठीं ग्रस्के थोडा वेळ थांबला होता तो पुन: बोलूं लागला: " हं, बाईसाहेब, तुमचा आणि ह्या दरवडेखोरणीचा असा स्नेह आहे ही गोष्ट बाहेर पडली असतां लोकांना फार खेद होईल, आणि म्याजिस्ट्रेट साहेबही तुह्मास बोलावणें पाठवून तुमची सारी हकीकत विचारतील. पण हें असें होऊं देणें चांगलें नाहीं. तेव्हां मीं गप्प बसलें पाहिजे नाहीं कां ? मग माझ्या ह्मणण्याप्रमाणें करण्यास तुह्मी कबूल व्हाल ? कां मी सांगतों तें नाकाराल ? "

लिझी हासून ह्मणाली: " नाहीं, त्या नाहीं नाकबूल करणार. तुमच्या साऱ्या अटी त्या कबूल करतील. "

आपलें मन स्वस्थ आहे असें दाखविण्याकरितां ब्रेसबाई जरी बाहेरून पुष्कळ खटपट करीत होती, तरी तिच्या मनांत अतोनात दु:ख होत असल्याचें

स्पष्ट दिसत होतें. तों घाईवाईनें ह्मणाली: " हं, सांगा तुह्माला काय पाहिजे तें; आणि हा घाणेरडा प्रसंग संपवून टाका कसा एकदांचा ! "

लिझी—तुह्मीं त्यांचें ह्मणणें कबूल केलें तर ते मला खास सोडून देतील.

पिटर—खास सोडीन. पण पहिल्यानें बाईसाहेबांनीं मला पन्नास गिनी देऊन माझें नुकसान भरून काढलें पाहिजे. आणि शिवाय, मजवर जी मेहेरबानी करण्याबद्दल मी ह्यांना मघांपासून ह्मणत आहें ती ह्यांनीं करण्याचें कबूल केलें पाहिजे.

त्याच्या पाहण्याची तऱ्हा आणि ब्रेसबाईच्या चर्येवरून व्यक्त झालेला कंटाळा व लज्जा ह्या सर्वांवरून ही मेहेरबानी कोणत्या प्रकारची असावी ह्याचा तर्क लिझीनें तावडतोब केला; व तिला एके प्रकारें संतोष वाटून, ब्रेसबाईची चांगलीच फजिती उडत आहे असेंही तिच्या मनांत आलें. ह्या वेळीं तिच्या चर्येंत जो फरक पडला त्याजवरून, ग्रम्ले आपल्याजवळ काय मागत आहे हें तिनें ओळखलें, अशी ब्रेसबाईची खात्री झाली, व ती मोठ्या दुःखाच्या स्वरानें ह्मणाली: " देवा ! देवा !! मी मेलें असतें तरी बरें झालें असतें. पण आतां उगीच वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं. ह्यासाठीं ग्रम्लेसाहेब, तुमचीं सारीं ह्मणणीं मी कबूल करतें. "

ग्रम्ले—शाबास! छान झालें हें. हें पहा मी या पोरीला सोडलें.

सुटका होतांच उपरोधिक स्वरानें लिझी ह्मणाली: " बाईसाहेब, माझी सुटका करविलीत ह्याजबद्दल मी तुमची ऋणी आहें. माझें काम विशेष होतें असें नाहीं. मला थोडे पैसे पाहिजे होते. पण मजसाठीं तुह्मीं ह्या कोतवालसाहेबांना पन्नास गिनी देऊन, शिवाय ह्यांचें दुसरेंही ह्मणणें—तुह्माला अगदीं आवडत नसतांही—कबूल केलें आहे; तेव्हां आतां मला पैसे नकोत. पण मघाशीं मजविषयीं इतका तिरस्कार दाखवीत असतां, आतां इतक्यांतल्या इतक्यांत माझ्या समक्षच ह्या साहेबांच्या मर्जीप्रमाणें तुह्माला वागावें लागत आहे हें मात्र कसें काय होत आहे ह्याचा तुमचा तुह्मीच विचार करा! सलाम बाईसाहेब, आतां मारा ह्यांजबरोबर चैन! "

असें ह्मणून ती निघून गेली. बाहेर पडतांना ती आपल्या नेहमींच्या तऱ्हेप्रमाणें मोठ्यानें हासली. ह्या हासण्याचा स्वर ब्रेसबाईच्या कानीं पडतांच तिला अगदीं मरणप्राय दुःख झालें. पण तिचा कांहींच उपाय नव्हता.

---

## भाग १३४.

### मद्याचा पेला.

लिझी गेल्याला दहा मिनिटें झालीं. ब्रेसबाईचें दुकानांत अगदीं सामसूम झालें, तेव्हां माजघराचें दार हळूच उघडून ब्रेसबाई हातीं दिवा घेऊन बाहेर आली; आणि तिच्या पाठोपाठ पिटर ग्रम्लेही आला. त्या वेळीं दुकानदारीण बाईचें तोंड अगदीं उतरून जाऊन ·

पडलें होतें. तरी कपाळास पडलेल्या आठ्या, चढलेल्या भोंवया, आवळून धरलेले ओठ, अगदीं स्थिर असलेले डोळे आणि काडीभरही कंप न पावणारे उरोज, यांजवरून तिचा कांहीं तरी पक्का बेत ठरलेला असावा असें उघड दिसत असून, ग्रस्लेला पक्की निशा चढलेली नसती तर त्यालासुद्धां फारच शंका आली असती.

ग्रस्लेचे डोळे लाल पडले होते, चर्या धुंद होती, आणि आपला हेतु पूर्ण झाला अशी त्यास घमेंड वाटावयास लागली असून, तो थोडा हासत होता; आणि तो तिच्या मागून जरी तिच्या निजावयाच्या खोलींत जाण्यासाठीं जिना चढत होता, तरी दोघांच्या चर्येंत फारच तफावत दिसत होती.

ग्रस्ले हा बेतानेंच जिना चढत होता, तरी त्याच्या जोरानें पडणाऱ्या पावलांखालीं जिन्याच्या पायऱ्या करकरा वाकत होत्या. मधून मधून त्याचे झोंक जाऊन तो कठड्यावर पडत होता, आणि त्यामुळें कठडाही करकरत होता. ब्रेसबाईनें त्याला मोठ्या रागानें हळू चालावयास सांगितलें. शेवटीं एकदाचें हें जोडपें वर खोलींत जाऊन पोहोंचलें; आणि ब्रेसबाईच्या त्या रतिमंदिरांत—जेथें ती आपल्या आवडत्या प्रियकरांशीं विलास करीत असे तेथें—ही आगडबंब स्वारी प्रविष्ट झाली. निशा चढलेल्या माणसाच्या नेहमींच्या तऱ्हेप्रमाणें त्यानें एकदां साऱ्या खोलीकडे पाहिलें. पाहतां पाहतां त्याची नजर ब्रेसबाईच्या पलंगाकडे, त्याजवरील पराच्या गादीकडे, पांढऱ्या शुभ्र पलंगपोसाकडे व मऊ मऊ गिरद्यांकडे गेली, आणि पुनः त्याच्या कामवासनेस जबर भरतें आलें.

लागलाच तो खुर्चीवरून उठला, आणि त्यानें ब्रेसबाईला उराशीं घट्ट आवळून धरून आपलें तापलेलें आणि दारूनें घाणत असलेलें तोंड तिच्या तोंडावर ठेवलें. मग स्वारी पुनः आपल्या खुर्चीवर बसली, आणि बळेंच त्यानें तिला आपल्या मांडीवर घेतलें.

त्याच्या अंतःकरणांत भडाडलेल्या कामाग्नीनें त्याचा शब्द अधिकच जड होऊन तो ह्मणाला: "अहाहा! किती तरी आज तूं सुंदर दिसत आहेस लाडके! खचित तूं आतां माझ्याशीं भांडणार नाहींस; आतां आपला समेट झाला आहे."

आपल्या पुढील बेतासाठीं त्याजशीं गोड बोलणें तिला जरूर असल्यामुळें, बाहेरून मोठा स्नेहभाव दाखवून ब्रेसबाई ह्मणाली: "तुह्मीही तसेंच दिसतां. तुमचे ओठ अगदीं कोरडे पडले असून तोंडही तसेंच झालें आहे. त्या कपाटांत निरनिराळ्या प्रकारचीं मद्यें आहेत, व तशींच दुसरींही पेयें आहेत. त्यांतील तुह्मास एखादें देऊं?"

एकाद्या माजलेल्या रेड्याप्रमाणें तिजकडे सकाम दृष्टीनें पहात राहून ग्रस्ले ह्मणाला: "अहाहा! किती तरी प्रेमानें वागते आहेस तूं. मला तहान लागली आहे खरीच. माझा घसा अगदीं कोरडा पडला आहे. तेव्हां तुला वाटेल त्या जातीचें मद्य आणि पेय तूं मला प्यावयास दे. मला त्यांचीं नांवेंही ठाऊक नाहींत—